## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६४७
निर्णय दिनांकः १६-१२-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा.नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देगलूर, जि. नांदेड. : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देगलूर, जि.नांदेड.

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. गवलवाड संजय चंदु, श्री.कानपट्टे दिगांबर शंकर, श्री. वाघमारे संजय नागोराव, श्री गंगलोड नागन्ना रामनाथ,श्री. कोकणे जीवन गंगाधर, श्री. जांबले संजय रामजी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देगलूर यांच्याकडे दि. २१.०१.२००८ रोजीचा अर्ज पोस्टाने पाठवून दिला असता, त्यांना मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी प्रथम अपिलेट अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,देगलूर यांच्याकडे प्रथम अपील दि. ०८.०४.२००८ रोजी पोस्टाने पाठवून

दिले. परंतु त्यांच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता निर्णय प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - "त्रयस्थ पक्ष श्री. संजय गवलवाड, श्री. दिगांबर कानपट्टे, संजय नागोराव वाघमारे, गंगलोड नागन्ना नागनाथ,कोकणे जीवन गंगाधर, जांबले संजय रामजी, शांतविर नागलिंगाप्पा या सात लोकांना दिल्या गेलेल्या जातीच्या प्रमाणपत्रासाठी त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रती, तसेच जातीचे प्रमाणपत्र दिल्या गेल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या जावक रजिस्टरच्या सत्यप्रती व सदरील जातीची प्रमाणपत्रे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून दिली गेली आहेत किंवा नाही, याबद्दल लेखी स्वरुपात माहिती" - अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये सातही त्रयस्थ पक्षास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे दिल्या गेलेल्या जात प्रमाणपत्राचा संदर्भ क्रमांक दिला आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी संबंधित संचिका उपविभागातील संबंधित तहसीलदार यांच्याकडे वर्ग करण्यात आल्या असल्यामुळे त्यांनी संबंधित तहसीलदारांकडे संपर्क साधण्याचे सूचित केले व सात त्रयसथ पक्षांपैकी श्री. गंगलोड नागन्ना नागनाथ यांच्याशी संबंधित माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीस माहितीपोटीचे एकूण रु. १०५/- इतके शुल्क चलनाद्वारे बँकेत भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०८.०४.२००८ रोजी परत उपविभागीय अधिकारी, देगलूर यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेतल्यामुळे

व कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत आणि अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे न केल्यामुळे ते अपिलार्थीस अपेक्षित माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार करावयाचे प्रथम अपील उपविभागीय अधिकारी, देगलूर यांच्याकडे केले आहे. तथापि या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी हे अपर जिल्हाधिकारी, नांदेड हे आहेत. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने यासंदर्भातील त्यांचे प्रथम अपील अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे करणे त्यांना भाग होते. परंतु त्यांनी अशाप्रकारची कृती केलेली नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम १९(६) च्या तरतुदीनुसार सुनावणी होऊन कोणताही निर्णय पारित केला गेलेला नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करणे आयोगास गरजेचे वाटते. सबब उपविभागीय अधिकारी,देगलूर,जि.नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी प्रथमतः अपिलार्थीच्या दि. ०८.०४.२००८ रोजीच्या त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रथम अपील अर्जाची प्रत, अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे हे आदेश

निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत पाठवावा. तदनंतर या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, पंचेचाळीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांनी, अपिलार्थीच्या दि. ०८.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत, त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करु-न, पंचेचाळीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक: १६-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर,

बसस्टँडरोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,देगलूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०५०
निर्णय दिनांक: १६-१२-२००९

१. श्री. सुनिल श्रावण बनसोडे, : अपिलार्थी
रा.नळदुर्ग, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, कार्यालय,
तुळजापूर,जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, कार्यालय,
तुळजापूर,जि.उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तुळजापूर तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीचे सर्व ग्रामसेवक
जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे या अर्जामध्ये नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये दलीतवस्ती सुधार योजनेच्या संदर्भात समाजकल्याण विभागाकडून प्राप्त झालेल्या निधीसंदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एप्रिल, २००५ ते ऑगस्ट, २००८ या कालावधीशी संबंधित होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. परंतु विहित मुदतीत संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अपूर्ण व अर्धवट माहिती प्राप्त झाल्याचे कारण दर्शवून अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सर्व संबंधित ग्रामसेवकांना सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतर अपिलार्थीस संबंधितांच्याकडून माहिती प्राप्त झाली किंवा कसे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. परंतु अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

अपिलार्थीने आयोगाकडे दि. १५.१२.२००८ रोजी द्वितीय अपील नोंदविल्यानंतर आजपर्यंतच्या कालावधीमध्ये अपिलार्थीस सर्व संबंधितांच्याकडून माहिती प्राप्त झाली किंवा कसे, हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अभावी आयोगास कळण्यास मार्ग नाही. तसेच अपिलार्थीने केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी, 'संपूर्ण' माहिती प्राप्त न झाल्याने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे. तथापि अपिलार्थीने त्यांना द्वितीय अपील करेपर्यंत कोणकोणत्या ग्रामसेवकांनी माहिती दिली नाही, याचा कुठल्याही प्रकारे उल्लेख त्यांनी आयोगाकडे

केलेल्या विचाराधीन द्वितीय अपील अर्जामध्ये केलेला नाही अथवा आज रोजीपर्यंत कोणत्याही लेखी/तोंडी युक्तिवादाद्वारे आयोगास या मुद्यासंदर्भात अवगत केलेले नाही, हे पाहता, आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक: १६-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुनिल श्रावण बनसोडे,मु.पो.नळदुर्ग, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तुळजापूर तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींचे सर्व ग्रामसेवक यांना (मार्फत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद) या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,तुळजापूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०५१
निर्णय दिनांकः १६-१२-२००९

१. श्री. विठ्ठल शिवदास धोंगडे, : अपिलार्थी
रा.वाघोली ता.कळंब, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, कळंब,जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, कळंब,जि.उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाघोली,
ता.कळंब,जि.उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १०.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे यशवंत ग्रामसमृध्दी योजनेअंतर्गत वाघोली ग्रामपंचायतीमध्ये झालेल्या

कामांची काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एप्रिल, २००५ ते दि. १०.१०.२००८ या कालावधीशी संबंधित होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज गट विकास अधिकाऱ्याला उद्देशून केला असल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मधील तरतुदीनुसार अपिलार्थीच्या अर्जाची मूळ प्रत, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,वाघोली,ता.कळंब यांच्याकडे दि.१५.१०.२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठवून दिली व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. यानंतर ग्रामसेवकाने अपिलार्थीस दि. १७.११.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १०२२/- इतके भरण्याचे सूचित केले. तथापि त्यांनी यापूर्वीच अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,कळंब, जि.उस्मानाबाद यांच्याकडे दि. १४.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि. ०१.१२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे संबंधित ग्रामसेवकाने अपिलार्थीस दि. १५.१२.२००८ रोजी माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने ही माहिती स्वीकारण्याचे नाकारले व यानंतर वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे त्यांनी दि. १५.१२.२००८ रोजी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देऊ केली असता, ही माहिती स्वीकारण्याचे अपिलार्थीने एकूण आठ लोकांच्या उपस्थितीत नाकारले. या घटनेचा पंचनामा त्यांनी केला असून, या पंचनाम्याची प्रत त्यांनी आयोगास

दाखविली. या पंचनाम्याच्या प्रतीमध्ये एकूण आठ साक्षीदारांनी असे निवेदन दिले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देऊ केली असता, त्यांनी माहिती स्वीकारण्याचे नाकारले व ते निघून गेले. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद मान्य करण्यात येऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देऊ केली असता, अपिलार्थीने स्वतः होऊन ही माहिती स्वीकारण्याचे नाकारल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः १६-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विठ्ठल शिवदास धोंगडे, मु.पो.वाघोली, ता.कळंब, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाघोली, ता.कळंब,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, कळंब, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०५२
निर्णय दिनांकः १६-१२-२००९

१. श्रीमती सुनिता धनाजी पाटील, : अपिलार्थी
रा.हर्सूल, जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,
ता.औरंगाबाद,जि.औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मागणी केलेली माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - मिटमिटा ते तीसगाव वळणरस्त्याचा, मौ.मिटमिटा येथील गट नं.२४४ च्या संयुक्त मोजणी नकाशाची प्रत- अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. अधिनियमाद्वारे विहित

केलेल्या मुदतीमध्ये माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि. २०.११.२००८ रोजी माहिती पुरविण्याचा निर्णय देऊनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि. ०७.१२.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,औरंगाबाद यांच्याकडून दि. १५.०६.२००९ रोजी आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्यामुळे त्यांची आता या प्रकरणी कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे आयोगाने त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्यास काहीही हरकत नाही. त्यामुळे आता अपिलार्थीस त्यांनी या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीस जरी आवश्यक ती माहिती आता प्राप्त झाली असली तरी ती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर झाली असल्याने, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने या प्रकरणी ज्यावेळी माहिती मागितली होती, त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. त्यावेळी श्रीमती सीमा देशमुख नावाच्या अधिकारी (सध्या निलंबित) कार्यरत होत्या. या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न पुरवून त्यांनी स्वत:ला

अधिनियमातील कलम २०(२) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (महसूल) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी,श्रीमती सीमा देशमुख यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी, श्रीमती सीमा देशमुख (सध्या निलंबित) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः १६-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती सुनिता धनाजी पाटील, ४७, पर्वती सहकारी गृह निर्माण संस्था, हर्सूल, औरंगाबाद.

२. श्रीमती सीमा देशमुख यांना (अधीक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांच्या मार्फत) या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,ता.औरंगाबाद,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२३७
निर्णय दिनांक १६/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मधुकर हिराजी मुळे,<br>रा. पूर्णा, जि. परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधिक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. मधुकर हिराजी मुळे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०४.०९.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.१७.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१)  अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक :  १६/१२/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१.  श्री.  मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, ता. पूर्णा, जि. परभणी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२३८
निर्णय दिनांक १६/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मोतीराम गयबू काळे,<br>रा. जानापूरी, पो. वडेपूरी, ता. लोहा, जि. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, लोहा, जि. नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, लोहा, जि. नांदेड | | |

**निर्णय**

श्री. मोतीराम गयबू काळे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.३१.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ९५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक :  १६/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोतीराम गयबू काळे, मु. जानापूरी, पो. वडेपूरी, एस.आर.टी., ता. लोहा, जि. नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२३९
निर्णय दिनांक १६/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मोतीराम गयबू काळे,<br>रा. जानापूरी, पो. वडेपूरी, ता. लोहा, जि. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, अर्धापूर, जि. नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, अर्धापूर, जि. नांदेड | | |

**निर्णय**

श्री. मोतीराम गयबू काळे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २०.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.२२.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १०४ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोतीराम गयबू काळे, मु. जानापूरी, पो. वडेपूरी, एस.आर.टी., ता. लोहा, जि. नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०४२

निर्णय दिनांक १६-१२-२००९

१ श्री. वाघचौरे सुरेश रामराव, : अपिलार्थी
मु. रामराई, पो. वाळूज, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत जोगेश्वरी,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे जोगेश्वरी ग्रामपंचायतीसंबंधी एकूण १२ मुद्दयाव्दारे काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर यांना उद्देशून केला होता. तथापि या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी हे ग्रामसेवक, ग्रामपंचायत, जोगेश्वरी, तालुका गंगापूर हे असल्यामुळे गट विकास अधिकाऱ्याने अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडील दिनांक २५-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना परत पाठविला व त्याची प्रत ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत जोगेश्वरी यांना दिली. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर यांच्याकडे दिनांक २४-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने प्रथम अपिलाचे कारण, त्यांना संबंधित ग्रामसेवकाने त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नसल्याचे सांगितले असे दिले आहे. अपिलार्थीच्या दिनांक २४-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर यांनी दिनांक ०६-११-२००८ रोजी आपले आदेश पारीत करुन सात दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी यांना सूचित केले. तथापि या कालावधीनंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २५-०९-२००९ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य दिली आहे व ही माहिती प्राप्त झाल्याची अपिलार्थीची दिनांक २५-०९-२००९ रोजीची पोचसही त्यांनी आयोगास सादर केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी  केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी अक्षम्य उपेक्षा केल्याचे आयोगास आढळून येत आहे.  अपिलार्थीने त्यांचा दिनांक १५-०९-२००८ रोजीचा मूळ अर्ज गट विकास अधिकाऱ्यास उद्देशून केला होता. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही गट विकास अधिकाऱ्याच्या ताब्यात नसल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधित ग्रामसेवकाला त्यांच्या पातळीवर, अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत  पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे  गरजेचे होते.  तथापि त्यांनी या प्रमाणे कार्यवाही न करता अपिलार्थीचा  माहितीसाठीचा मूळ अर्जच अपिलार्थीस परत पाठविला. त्यांची ही कृती माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीचा  भंग करणारी आहे.  यानंतर अपिलार्थीने गट विकास अधिकाऱ्याकडे दिनांक २४-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले असता, गट विकास अधिकाऱ्याने दिनांक ०६-११-२००८ रोजी अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केल्यानंतरही  संबंधित ग्रामसेवकाने अपिलार्थीस ही माहिती दिनांक २५-०९-२००९ रोजी म्हणजे, अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज केल्यानंतर एक वर्ष इतक्या विलंबाने पुरविली असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस माहिती पुरविल्याच्या संदर्भात गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर यांनी आयोगास दिनांक १६-०९-२००९ रोजीचे एक पत्र सादर केले असून त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस ग्राम विकास अधिकारी श्री. नरवडे, ग्रामपंचायत जोगेश्वर यांनी दिनांक २५-०९-२००८ रोजी माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले आहे.  गट विकास अधिकाऱ्याने त्यांच्या दिनांक १६-०९-२००९ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस माहिती दिल्याची खोटी तारीख दर्शवून आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे, असे या प्रकरणी आढळून येत आहे.  आयोगाने अपिलार्थीस पूरविलेल्या कथित माहितीच्या प्रतीची जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे विचारणा

केली असता, ते ही माहिती आयोगास सादर करु शकले नाहीत. यावरुन मूळात त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली किंवा कसे याबद्दल आयोग साशंक आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे अपिलार्थीस माहिती मिळविण्यामध्ये फारसे स्वारस्य नसावे, असे अनुमान काढून अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाही. परंतु या प्रकरणी गट विकास अधिकाऱ्याने प्रथमतः अपिलार्थीचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यानंतर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (एक) चा केलेला भंग आणि आयोगास दिनांक १६-०९-२००९ रोजी दिलेल्या पत्राव्दारे आयोगाची दिशाभूल करण्याचा केलेला प्रयत्न पाहता संबंधित गट विकास अधिकारी हे त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या व नितांत सचोटीच्या अभावाबद्दल विभागीय चौकशीस निश्चितपणे पात्र होत आहेत, असे आयोगाचे मत आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी या प्रकरणाशी संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी, असे आदेशित करण्यात येत आहे. केवळ वादाच्या प्रयोजनार्थ जरी अपिलार्थीस दिनांक २५-०९-२००९ रोजी ग्रामविकास अधिकाऱ्याने माहिती दिली हे गृहित धरले तरी, हा कालावधी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे माहिती देण्याच्या विहित केलेल्या कालावधीपेक्षा निश्चितपणे जास्त आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-११-२००८ रोजी निर्णय देऊन सात दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले असताना अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अंदाजे दहा महिने इतक्या विलंबाने माहिती दिल्याने ते देखील अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्याची कारणे व आज रोजी अपिलार्थीस त्यांनी कोणती माहिती दिली ती आयोगास सादर न करण्याची कारणे त्यांना विचारली असता व त्यांच्या बचावाची भरपूर संधी संबंधित ग्रामविकास अधिकारी श्री. नरवडे यांना दिली असता, या विलंबाबाबत कोणतेही स्पष्टीकरण ते आयोगास देऊ शकले

नाहीत. यावरुन या विलंबाचे समर्थनीय स्पष्टीकरण त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे सिध्द होत आहे. सबब जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, जोगेश्वरी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे त्यांना एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा त्यांनी जास्तीत जास्त २५ हप्त्यामध्ये शासकीय कोषागारात पुढील लेखशिर्षामध्ये करावा.

**लेखाशीर्ष- "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी संबंधित ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, जोगेश्वरी, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद श्री. नरवडे या शास्तीचा भरणा शासकीय कोषागारामध्ये एप्रिल२०१० पासून नियमीतपणे करतील, असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर यांच्यावर, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, हे आदेश निर्गमित होताच तीन महिन्याच्या आत प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी.

३. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, जोगेश्वरी, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल

विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेल्या विवेचनाप्रमाणे करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वाघचौरे सुरेश रामराव, मु. रामराई, पो. वाळूज, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत जोगेश्वरी, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोदणीकृत टपालाद्वारे)

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०४३

निर्णय दिनांक १६-१२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पाटील सुभाष आनंदराव,<br>रा. भोसले निवास, कैलास नगर, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०५-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर शहानिशा न करता व मोघम स्वरुपाची कारणे दर्शवून तहसीलदार, औरंगाबाद यांचा बचाव करण्याच्या दृष्टीने त्यांचे अपील नामंजूर केले. तसेच तहसीलदार व ज्वालादास मठाचे अध्यक्ष या नात्याने चुकीची माहिती पुरविली असताना सुध्दा, माहितीपोटी जास्तीची रक्कम स्वीकारली असताना सुध्दा त्यांच्या विरुध्द शासकीय व दंडात्मक कार्यवाही न करता अपिलार्थीचे अपील दिनांक २४-३-२००८ रोजी नामंजूर केले, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. तसेच त्यांना संबंधित

ज्वालादास मठाकडून पुरविलेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी असल्यामुळे तहसीलदार तथा अध्यक्ष, ज्वालादास मठ या नात्याने त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक व दंडात्मक कार्यवाही करावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-१२-२००७ रोजीच्या अर्जान्वये तहसीलदार, औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्वालादास मठ, कैलास नगर, औरंगाबाद या ट्रस्टचे अध्यक्ष या नात्याने ज्वालादास मठासंदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रतीसाठी एकूण ४०५ पृष्ठाची संख्या असलेल्या माहितीबाबत प्रतिपृष्ठ रु. १०/- प्रमाणे रुपये ४०५०/- इतके चलनाव्दारे शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा अपिलार्थीने दिनांक २२-०२-२००८ रोजी शासकीय कोषागार औरंगाबाद यांच्याकडे केला. अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०३-२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्याकडे माहिती तयार असल्याचे सूचित केले. तथापि ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी, तहसीलदार औरंगाबाद यांच्या कार्यालयात कधीही न गेल्यामुळे त्यांनी दिनांक ०५-०३-२००८ रोजी अपिलार्थीस ही माहिती पोस्टाने पाठविली. अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतूदीनुसार उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ०५-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०३-२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेल्या माहिती शिवाय इतर कोणतीही अतिरिक्त माहिती तहसीलदार औरंगाबाद यांच्याकडे उपलब्ध नाही, असे अपिलार्थीस लेखी कळविण्याचे तहसीलदार औरंगाबाद यांना

सूचित केले. अशाप्रकारे अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ अर्जातील ज्वालादास मठाविषयीच्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे नमूद केले. तसेच तहसीलदार औरंगाबाद यांनी त्यांना प्रतिपृष्ठ रु. २ /- प्रमाणे शुल्क आकारणे गरजेचे असताना देखिल प्रतिपृष्ठ रु. १० /- या दराने शुल्क आकारले असल्याचे आयोगास अवगत केले.

तहसीलदार औरंगाबाद यांनी असा युक्तिवाद केले आहे की, ज्वालादास मठ, कैलास नगर हे एक खाजगी ट्रस्ट असून या ट्रस्टचे माहिती अधिकारी म्हणून त्यांना एखाद्या आदेशाद्वारे नियुक्त केलेले नाही. तसेच ज्वालादास ट्रस्टचे अध्यक्ष या नात्याने त्यांच्याकडे या ट्रस्टविषयीची कोणतीही माहिती सहज उपलब्ध नसते. त्यामुळे केवळ सद्‌भावनेने त्यांनी ज्वालादास मठ या ट्रस्टकडून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मागवून घेतली व ती जशीच्या तशी अपिलार्थीस सशुल्क पुरविली. या माहितीतील सत्यासत्यतेविषयी त्यांना काहीही कल्पना नाही. या मठाचे अध्यक्ष म्हणून तहसीलदार यांची नेमणूक केल्याचे नेमणूक पत्र तहसीलदार औरंगाबाद यांच्याकडे उपलब्ध आहे काय, अशी आयोगाने विचारणा केली असता, केवळ पुर्वीचे तहसीलदार या मठाच्या बैठकीला अध्यक्ष या नात्याने उपस्थित राहत असल्यामुळे ते या मठाचे अध्यक्ष आहेत अशी त्यांची धारणा आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी तहसीलदार औरंगाबाद यांच्याकडे ज्वालादास मठाचे अध्यक्ष या नात्याने मागणी केलेली माहिती ही जरी अधिनियमातील तदतुदींशी सुसंगत असली तरीही माहिती अधिकार अधिनियम २००५ हा

मूळात खाजगी धर्मादाय संस्थेस लागू होत नाही, असा निर्वाळा मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांच्याकडील रिट याचिका क्रमांक ५२९४/२००८ मध्ये मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा जिल्हा बुलढाणा विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या संदर्भात दिनांक २८-०४-२००९ रोजीच्या आदेशाव्दारे दिलेला आहे. तसेच या ट्रस्टचे जन माहिती अधिकारी म्हणून तहसीलदारांची कोणत्याही सक्षम प्राधिकरणामार्फत नेमणूक केली गेलेली नाही. मूळात तहसीलदार हे या ट्रस्टचे अध्यक्ष कसे झाले या संदर्भात देखिल तहसीलदार औरंगाबाद यांच्याकडे कोणतीही माहिती नाही. केवळ पुर्वापार चालत आलेल्या संकेतानुसार ते या ट्रस्टचे अध्यक्ष असल्याची त्यांची धारणा आहे, असे आयोगास आढळून आले आहे. या प्रकरणी ट्रस्टकडून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जसजशी तहसीलदार औरंगाबाद यांना जशी प्राप्त झाली, तसतशी ती त्यांनी प्राप्त स्वरुपात अपिलार्थीस पुरविली आहे. या माहितीची शहानिशा करण्याचे अधिकार केवळ धर्मादाय आयुक्त यांनाच असू शकतात. त्यामुळे अपिलार्थीस या ट्रस्टविषयी जर अधिकच्या माहितीची आवश्यकता असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी, सहायक धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद यांच्या कार्यालयात त्यांच्याकडे माहितीचा प्रथम अर्ज करावा, व या मठाविषयीची माहिती सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना प्रतिपृष्ठ रु. १०/- या दराने शुल्क आकारल्याचे नमूद केले आहे. येथे असेही स्पष्ट करण्यात येत आहे की, राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ११-१०-२००५ रोजी पारित केलेल्या अधिसूचने-तील कलम ४ (1) A (B) मधील तरतुदीप्रमाणे प्रतिपृष्ठ रु. २ /- या दराने शुल्क आकारणे आवश्यक आहे. त्यामुळे या प्रकरणी तहसीलदार औरंगाबाद यांनी अपिलार्थीकडून २ रु. प्रतिपृष्ठ या दराने शुल्क आकारणे गरजेचे असताना देखिल अपिलार्थीकडून प्रतिपृष्ठ १० रुपये इतके जादाचे शुल्क आकारले असल्याचे दिसून येत आहे. सदर शुल्क माहिती अधिकार

अधिनियमातील तरतुदीपेक्षा जादाचे असल्यामुळे तहसीलदार औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीकडून त्यांनी माहितीपोटीचे जादा आकारलेले शुल्क प्रतिपृष्ठ रु. ८/- इतके त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत परत करावे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये तहसीलदार औरंगाबाद यांच्यावर दंडाची व शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची विनंती आयोगास केली आहे. तथापि या प्रकरणी तहसीलदार यांचे कर्तव्य फक्त त्यांनी संबंधित ज्वालादास मठाने दिलेली माहिती घेऊन ती अपिलार्थीस पुरविणे एवढ्याच मर्यादेपर्यंत असल्यामुळे आणि मुळात त्यांची या मठाची जन माहिती अधिकारी म्हणून त्यांची कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने नेमणूक केली नसल्याने, अपिलार्थीची तहसीलदार औरंगाबाद यांचेवर शास्तीची व शिस्तभंगाची कारवाई करण्याची विनंती आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले जादाचे शुल्क रु ३२४०/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पाटील सुभाष आनंदराव, रा. भोसले निवास, कैलास नगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०४४

निर्णय दिनांक १६-१२-२००९

१ श्री. गौतम भागु राऊत, : अपिलार्थी

रा. प्रबुध्दनगर, घर नं. १०६ पी, पानचक्की, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व

रुग्णालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : निवासी वैद्यकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : वैद्यकीय अधीक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही व तसेच जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची माहिती दिली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये, अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या प्रयोगशाळेत शुगर, युरिया, क्रियाटेनिन इत्यादी चाचण्या होत असतात तर येथील डॉक्टर बाहेरील पॅथालॉजीकडून रुग्णास रिपोर्ट आणण्याचा आग्रह धरतात तरी या डॉक्टरवर कारवाई होऊ शकते का ? याची माहिती द्यावी, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०९-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १६ इतके भरुन घेऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-११-२००८ रोजी अपिलार्थीस उद्देशून एक पत्र लिहिले आहे व या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती बरोबर असल्याचे नमूद केले आहे. या पत्रामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नसल्याचे आढळून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या कथित निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिनांक २४-०९-२००८ रोजी त्यांच्याकडून १६ रुपये इतके शुल्क आकारुन अपिलार्थीस प्रत्यक्षात हस्तांतरीत केली असून त्यांनी दिलेली माहिती बरोबर आहे. त्यांच्या महाविद्यालयातील कोणत्याही रुग्णास रुग्णालयाच्या बाहेरुन प्रयोगशाळेतून चाचण्या करुन घेण्यासाठी सूचना दिल्या जात नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती संबंधित अर्जदाराला देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे, एवढीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे खुलासे, स्पष्टीकरण अथवा त्यांची मते मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दल अर्जदाराने मागितलेले खुलासे, स्पष्टीकरण अर्जदारास देणे अशा प्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हीच अधिनियमातील तरतुदीशी विसंगत व त्यामुळे अवैध स्वरुपाची असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गौतम भागु राऊत, रा. प्रबुध्दनगर, घर नं. १०६ पी, पानचक्की, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी वैद्यकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०४५

निर्णय दिनांक १६-१२-२००९

१ श्री. खाजा बाहोद्दीन सिद्दीकी पिता गौस मोहियोद्दीन, : अपिलार्थी
रा. फ्रेंडस् सोसायटी, युसुफ कॉलनी समोर,
परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
कार्यालय शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार न केल्यामुळे त्यांनी, विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे शिक्षण विभाग, जिल्हा परिषद परभणी यांच्या दिनांक १०-११-२००५ च्या आदेशानुसार मुख्याध्यापक, डॉ. झाकीर हुसेन माध्यमिक शाळा, परभणी, गंगाखेड, सेलू, सोनपेठ, पूर्णा यांनी दिनांक १०-११-२००५ ते २५-०८-२००८ या कालावधीतील अदा केलेल्या दंडाच्या रकमेच्या पावत्या मिळण्याबाबत व्यक्तिशः माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. एवढेच नव्हे तर त्यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज केल्यानंतर देखील त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जाची सुनावणी घेतली नाही व आज रोजी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगाकडील सुनावणीस अनुपस्थित असल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई व्हावी.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने

जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये केलेल्या अर्जाच्या संदर्भातील दिनांक ३१-१०-२००५ रोजीच्या अपीलाच्या सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी मुख्याध्यापक, डॉ. झाकीर हुसेन माध्यमिक शाळा, परभणी, गंगाखेड, सेलू, सोनपेठ, पूर्णा यांना विलंब आकार म्हणून ११५०० रुपये इतका दंड आकारण्यात येऊन व पुढे माहितीस जो विलंब होईल तोपर्यंत प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे दंड आकारण्यात येईल असे आदेश दिले होते. तथापि या आदेशाची पुर्तता न झाल्याने अपिलार्थीने आता माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित मुख्याध्यापकांनी सदर दंड भरला आहे किंवा कसे हे जाणून घेण्यासाठी विचाराधीन अपिलाशी संबंधित मूळ अर्ज केला होता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ती माहिती देणे भाग आहे. या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे एकदा माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर या अर्जाशी संबंधित पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्यासाठी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधणे गरजेचे होते. अपिलार्थीने आयोगास आज सुनावणीच्या वेळी असे अवगत केले की, ते ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी किमान ८ ते १० वेळा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे गेले होते. परंतु त्यांना ही माहिती प्राप्त होऊ शकली नाही. अपिलार्थी हे शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयात जाऊनही त्यांना माहिती प्राप्त झाली नसल्याबाबतचा एखादा पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध आहे काय अशी आयोगाने विचारणा केली असता, त्यांच्याकडे असा पुरावा उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २५-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे या कालावधीमध्ये अपिलार्थीस ही

माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वत: उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घ्यावी लागेल. ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांचा कोणताही प्रतिनिधी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, परभणी यांच्या कार्यालयात पाठविणे अनुज्ञेय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

अपिलार्थीच्या दिनांक १४-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे आयोगास आढळून आले आहे. शिक्षण संचालक, पुणे यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी श्री. एम. जी. पवार यांच्या अशा प्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत व्यक्तिश: व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. खाजा बाहोद्दीन सिद्दीकी पिता गौस मोहियोद्दीन, रा. फ्रेंडस् सोसायटी, युसुफ

कॉलनी समोर, परभणी.

२ जन माहिती अधिकारी, कार्यालय शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०४६

निर्णय दिनांक १६-१२-२००९

१ श्री. अशोक उर्फ आसाराम नारायण मुळे, : अपिलार्थी
मु. पो. लिंबागणेश,
तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, लिंबागणेश, तालुका जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी संदिग्ध, अपूर्ण व खोटी माहिती जाणुनबुजून देऊन खरी माहिती देण्याचे हेतुपुरस्सर टाळले असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीचा पुनरुच्चार करुन ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिली नसल्याचे आयोगास अवगत केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या ग्रामपंचायतीकडील कार्यक्षेत्रामधील संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना व इतर योजनांच्या संदर्भात हजेरीपत्रकाच्या झेरॉक्स प्रती, निधी, झालेला खर्च, घरकुल दुरुस्त्या, अनुदानित वसुल्या, घरकुल देण्यात आलेल्या लाभार्थ्यांची यादी, धान्य इत्यादी मुद्दयासंदर्भात व्यक्तिशः माहिती मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये सन २००६ ते २००८ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली असून अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-११-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस काही माहिती देणे अद्याप बाकी असल्यास ती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या वतीने त्यांचे वकील, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अपिलार्थी औषधोपचारासाठी दवाखान्यात दाखल झाले असल्यामुळे सुनावणीसाठी मुदतवाढ देण्याची विनंती केली. त्यांची विनंती आयोगाने अमान्य केली.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, लिंबागणेश यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक ०३-०९-२००८ रोजी व तदनंतर दिनांक १०-०९-२००८ रोजी माहिती पुरविली आहे. दिनांक १०-०९-२००८ रोजी माहिती पुरविल्यापृष्ठ्यर्थ त्यांच्याकडे कोणताही पुरावा उपलब्ध नाही कारण अपिलार्थीने त्यांना हवी असलेली माहिती पाहून ही माहिती पाहिल्यापृष्ठ्यर्थ सही करण्यास नकार दिला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिंबागणेश ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील असलेल्या सर्व कामाची माहिती दिली आहे. तथापि अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या खर्चाच्या तारखा व महिन्याचा उल्लेख यामध्ये नाही. तसेच ग्रामपंचायतीच्या विविध योजनांमध्ये जे मजूर कामावर उपस्थित होते त्यांच्या हजेरीपत्रकाची प्रत अपिलार्थीस दिली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस ही उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये या योजनांच्या सामान खरेदीच्या पावत्या त्यांना दाखविण्यात याव्यात अशी जन माहिती अधिकारी यांच्याकडे विनंती केली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास या सर्व कथित पावत्या दाखवून त्यांनी आयोगास असेही अवगत केले आहे की, या पावत्या अपिलार्थीस अनेक वेळा दाखवूनही अपिलर्थी हे त्या पावत्या दाखविल्यापृष्ठ्यर्थ त्यांची सहीनिशी पोच देत नाहीत. यावर जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, ही माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तपासणी करुन घेण्यासाठी विनामूल्य व दोन त्रयस्थ

साक्षीदारांच्या उपस्थितीत उपलब्ध करुन द्यावी व जर अपिलार्थी ही माहिती तपासण्यापृष्ठ्यर्थ त्यांची सही करण्यास नकार देत असतील तर त्यांनी या घटनेचा पंचनामा करुन आपले अभिप्राय त्यावर नोंदवून ठेवावेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अशोक उर्फ आसाराम नारायण मुळे, मु. पो. लिंबागणेश, तालुका जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, लिंबागणेश, तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०४७

निर्णय दिनांक १६-१२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. काजी अजगरखाँ हयातखाँ,<br>मु. पो. खंडाळा, तालुका जिल्हा हिंगोली | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), हिंगोली | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडून त्यांना दिनांक ०३-०७-२००८ रोजी

प्राप्त झालेल्या अपिलार्थीच्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत काय कार्यवाही झाली आणि जिल्हाधिकारी यांच्या आदेशावर  कार्यवाही न झाल्याचे कारण" अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे दिनांक ०७-११-२००८ रोजी प्रथम अपील केले.  अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.  तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.  जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-१२-२००८ रोजी अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत विनामूल्य माहिती पुरविण्याचे आदेशित करुनही त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झालेली नाही.  त्यामुळे त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी तसेच या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जावर कोणतीही  कार्यवाही न केल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार शास्तीची अथवा शिस्तभंगाची कारवाई

व्हावी. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात किती वेळा व कधी गेले यासंदर्भात एखादा सबळ पुरावा उपलब्ध आहे काय, असे अपिलार्थीस आयोगाने विचारले असता, त्यांनी अशा प्रकारचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने माहितीसाठीचा प्रथम अर्ज ज्यावेळी केला त्यावेळी सुभाष शिंदे नावाचे अधिकारी या पदावर कार्यरत होते. ते सध्या विशेष भूसंपादन अधिकारी, बीड या पदावर जिल्हाधिकारी, बीड कार्यालयामध्ये कार्यरत आहेत. त्यांनी या पदाचा कार्यभार दिनांक १७-११-२००९ रोजी घेतला आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची त्यांना प्रथम कल्पना आयोगाकडील व्दितीय अपील सुनावणीची नोटीस प्राप्त झाल्या-नंतर आली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या दिनांक ०६-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण दोन मुद्दयावर माहिती मागितली होती. त्यापैकी पहिला मुद्दा म्हणजे जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही आणि दुसरा मुद्दा म्हणजे कार्यवाही न होण्याची कारणे, हा होय. याबाबत अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या आदेशावर कार्यवाही न झाल्याची कारणे ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही. कारण ती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबाबतची, निर्णयाबाबतची कारणे अथवा स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी ती

अर्जदारास देणे अशा प्रकारच्या प्रक्रियेचा समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक दोनशी संबंधित माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय होत नाही. परंतु जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या दिनांक ०३-०७-२००८ रोजीच्या प्राप्त झालेल्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही या मुद्दयावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती देय होत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेल्या या मुद्दयावरील माहिती म्हणजे, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दिनांक ०३-०७-२००८ ते ०६-१०-२००८ या कालावधीमध्ये अपिलार्थीच्या तक्रार अर्जावर सर्व संबंधितांशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या आणि याच विषयावर त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या अभिलेख्यावरील टिपणीच्या प्रती, ही होय. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ शी संबंधित वरील-प्रमाणे स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून ती त्यांच्या कार्यालयातून स्वतः हस्तगत करुन घ्यावी लागेल. अपिलार्थीने त्यांच्या या संबंधित मूळ अर्जावर कोणताही प्रतिसाद न दिल्याबाबत आयोगाकडे प्रतिपादन केले आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थी हे त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जातील माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे गेलेले नाहीत. ते आजतागायत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी कधी गेले याचा कोणताही लेखी पुरावा आयोगासमोर सादर न करु शकल्यामुळे, अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची व शिस्तभंगाची कारवाई करण्याची विनंती, आयोग अमान्य करत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती-तील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. काजी अजगरखाँ हयातखाँ, मु. पो. खंडाळा, तालुका जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०४८

निर्णय दिनांक १६-१२-२००९

१ श्री. पांडूरंग निवृत्ती मोने, : अपिलार्थी
रा. अंबाली निवास, समतानगर , औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक , ग्रामपंचायत, टेंभापुरी, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
गटविकास अधिकारी, पंचायत समिती
गंगापूर, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. तुकाराम मानसिंग ढोले

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या अपिलाची सुनावणी आज दिनांक १६.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १६.१२.२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी या प्रकरणाशी संबंधित मूळ

अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांची कोणतीही तक्रार शिल्लक राहिलेली नाही. तसेच या पत्रामध्ये अपिलार्थीने असेही नमूद केले आहे की, संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याने ते विचाराधीन अपील स्वखुषीने मागे घेत आहेत. याचबरोबर त्यांनी आयोगास विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २०४८/०८, दिनांक २६.१२.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पांडूरंग निवृत्ती मोने, रा. अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक , ग्रामपंचायत, टेंभापुरी, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, ता.

गंगापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०४९

निर्णय दिनांक १६.१२.२००९

१ श्री. भास्कर दगडू जाधवर, : अपिलार्थी

बी.ॲन्ड सी. क्वॉर्टरजवळ पार्डी रोड,

मु.पो.ता. भूम, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

प्राचार्य शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर

महाविद्यालय, कळंब, जि. उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

सचिव, ज्ञान प्रसारक मंडळ, कळंब,

जि. उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रबंधक, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, जि. उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांचे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांनी स्वीकारले नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण, चुकीची व

दिशाभूल करणारी माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी संस्थेमध्ये दिनांक १५.०६.१९७१ ते ०२.०८.१९८४ पर्यंतच्या कालावधीमध्ये अधिव्याख्यानात इंग्रजी या पदावर केलेल्या नोकरीप्रीत्यर्थ त्यांना मिळालेल्या पगारातून कपात केलेल्या भविष्यनिर्वाह निधीच्या संदर्भात काही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दिनांक २३.१०.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्यांचे वकील उपस्थित व जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा दिनांक २३.१०.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे आयोगास अवगत केले. तर अपिलार्थीने त्यांचा अपील अर्ज जन अपिलीय अधिकाऱ्याने स्वीकारला नाही, असे आयोगास स्पष्ट केले. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २३.१०.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. सबब सचिव, ज्ञान प्रसारक मंडळ, कळंब

तथा जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या दिनांक २३.१०.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत त्यांनी अपिलार्थीकडून प्रथमतः प्राप्त करुन घ्यावी व त्यानंतर ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २३.१०.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, सदर अपिलाची प्रत अपिलार्थीकडून घेऊन, त्यानंतर ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भास्कर दगडू जाधवर, बी. ॲन्ड.सी. क्वॉर्टरजवळ, पार्डी रोड, मु.पो.ता. भूम, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय,

कळंब, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, ज्ञान प्रसारक मंडळ, कळंब, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९०
निर्णय दिनांकः १७-१२-२००९

१. श्री. बस्वराज रामलिंगप्पा स्वामी, : अपिलार्थी
रा. नेकनाळ, ता.देवणी, जि.लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार,
तहसील कार्यालय, देवणी, जि.लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : १) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी, जि.लातूर
२) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर, जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्यामुळे कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १४.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. नेकनाळ येथील १९९१ ते १९९५ या कालावधीमध्ये मंजूर झालेल्या घरांची पहाणी करण्याचे व दि. २५.१०.२००७ रोजी उदगीर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी, पंचायत समिती, देवणी यांनी केलेल्या जवाहर विहिरींच्या व सिमेंट रोडच्या चौकशी अहवालाच्या प्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन १९९१ ते १९९५ असा होता. अपिलार्थीने त्यांचा मूळ अर्ज तहसीलदार,देवणी यांना उद्देशून केला होता. तहसीलदार, देवणी यांच्याकडून त्यांच्या दिनांक १७.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे हा अर्ज गट विकास अधिकारी,पंचायत समिती, देवणी यांच्याकडे पाठविण्यात आला. गट विकास अधिकारी,पंचायत समिती,देवणी यांच्याकडे सदर अर्ज दि. २०.११.२००७ रोजी प्राप्त झ ााल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २०.१२.२००७ रोजी  जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.०२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत संबंधित कर्मचाऱ्यामार्फत घरकुलांची पाहणी करण्यासाठीची व्यवस्था करण्याची आणि सन १९९३ ते ९५ या कालावधीतील घरकुलांची अचूक यादी देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अपेक्षेप्रमाणे माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेल्या त्यांच्या विनंतीशी सुसंगत युक्तिवाद आयोगासमोर केला.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी यांनी असा युक्तिवाद केला की, पूर्वीच्या उदगीर पंचायत समितीचे उदगीर व देवणी असे दोन भाग झाल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी त्यांच्या दि. १६.०२.२००८ रोजीच्या आदेशाद्वारे उदगीर व देवणी या दोन पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात आदेश दिलेले होते. यापैकी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती ही गट विकास अधिकारी, देवणी यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्याप्रमाणे त्यांनी या मुद्यासंदर्भात अपिलार्थीसाठी दि. २९.०२.२००८ रोजी घरकुलांची पाहणी करण्याची व्यवस्था केली होती व अपिलार्थीने या घरकुलांची पाहणी दि. २९.०२.२००८ रोजी केली आहे. अपिलार्थीने यावर असा युक्तिवाद केला की, दि. २९.०२.२००८ रोजी त्यांनी घरकुलांची पाहणी केलेली नाही.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील गट विकास अधिकारी, पंचायत समिती उदगीर यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित असलेली माहिती त्यांच्याकडे आता उपलब्ध असून, ही माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास त्या तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांच्या मते अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेली सर्व घरकुले त्यांनी दि. २९.०२.२००८ रोजी

अपिलार्थीस दाखविली आहेत व अपिलार्थीने या घरकुलांची तपासणी संबंधित कनिष्ठ अभियंता आणि इतर गावकऱ्यांच्या बरोबर केलेली आहे. या तपासणी अहवालाचे आयोगाने अवलोकन केले असता या तपासणी अहवालावर अपिलार्थीची स्वाक्षरी नाही. त्यामुळे आता गट विकास अधिकारी पंचायत समिती, देवणी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या सर्व घरकुलांच्या तपासणीची व्यवस्था अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थीने घरकुलांची तपासणी केल्यानंतर सदरच्या तपासणी अहवालावर अपिलार्थीची सही घेऊन सदर तपासणी अहवाल आपल्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध करुन ठेवावा. जर अपिलार्थीने स्वाक्षरी करण्याचे नाकारले तर, त्यांनी पंचांच्या उपस्थितीत तसा पंचनामा करुन त्यांच्या अभिलेख्यावर उपलब्ध करुन ठेवावा. ही कार्यवाही त्यांनी हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत करावी. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती, पूर्वीच्या उदगीर पंचायत समितीचे उदगीर व देवणी असे दोन भाग झाल्यामुळे व आता गट विकास अधिकारी, उदगीर यांच्याकडे उपलब्ध असलेल्या चौकशी अहवालाची प्रत अपिलार्थीस देण्याचे त्यांनी कबूल केले असल्यामुळे या चौकशी अहवालाची प्रत त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा

क्र. १ च्या संदर्भात अपिलार्थीस घरकुलांच्या तपासणीची व्यवस्था करण्याची कार्यवाही, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत करावी.

३. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित चौकशी अहवालाची प्रत अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होतच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः १७-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बस्वराज रामलिंगप्पा स्वामी,रा. नेकनाळ, ता.देवणी, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, देवणी, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८४५
निर्णय दिनांक: १७-१२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. धोंडीराम विश्वनाथ काडवदे,<br>रा.जानवळ, ता.चाकूर,जि.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत, जानवळ,<br>ता.चाकूर,जि.लातूर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, चाकूर,जि.लातूर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०२.२००९ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०१.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मौजे जानवळ येथील ग्रामपंचायत निधीतून करण्यात आलेल्या शेततळयाच्या कामाविषयी काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "जानवळ ग्रामपंचायत निधीतून शेततळयाचे काम झालेल्या लाभधारक शेतकऱ्यांची नावे व एकूण संख्या, ते शेततळे शासनाच्या नियमाप्रमाणे संपूर्ण खोली व लांबी रुंदीचे झाले का, अपूऱ्या शेततळयांच्या कामांची संख्या,मजुरांमार्फत आणि मशिनद्वारे काम करुन घेताना शासनमान्य रेकॉर्डमध्ये नोंदवण्यात आलेल्या संपूर्ण लिखित नोंदीवर आधारीत सत्यप्रती न्यायालयात सादर करण्यासाठी आवश्यक आहेत" - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०१.१०.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१४.०१.२००८ रोजी निर्णय देऊन त्यामध्ये माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिली आहे, असे नमूद केले आहे. परंतु या निर्णयामध्ये अपूर्ण माहिती अपिलार्थीस देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना सूचना नाहीत. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकाऱ्याकडून उर्वरित माहिती न मिळाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १८.०९.२००७ व २९.०९.२००७ रोजी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील बहुतांशी माहिती पुरविलेली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील, मजूरांमार्फत आणि मशीनद्वारे काम करुन घेत असताना घेतलेल्या नोंदींच्या प्रती , ही माहिती दिली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. अशाप्रकारचे कोणतेही अभिलेखे सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियमित अभिलेख्यात ठेवले जात नाहीत. मात्र अपिलार्थीस या मुद्यावर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडील या कामांच्या मोजमापपुस्तिकेच्या प्रती आवश्यक असाव्यात, असे अनुमान काढण्यात येत असून या पुस्तिकेच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे आयोगासमोर मान्य केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस वर स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्याकडील संबंधित कामांच्या मोजमापपुस्तिकांच्या प्रती हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, या कालावधीमध्ये त्यांनी स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी उपस्थित राहून ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) प्रमाणे विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे शास्ती लावण्यात यावी. यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थी हे त्यांच्याकडे वारंवार अशाप्रकारच्या माहितीची मागणी करुन त्यांना नेहमी ब्लॅकमेल करुन त्रास देण्याचा प्रयत्न करीत असतात. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडे

रु.६०,०००/- इतक्या रकमेची मागणी केली होती. तथापि अपिलार्थीची ही मागणी अमान्य केल्यामुळे अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे केलेले आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचा इन्कार केला.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांना आयोगाने, ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेल्याबाबतचा काही सबळ पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध आहे किंवा कसे याची विचारणा केली असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती हस्तगत करण्यासाठी गेल्याच्या उपस्थितीबाबतचा कोणताही पुरावा आयोगास दाखविता आला नाही. येथे अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती हस्तगत करुन घेण्याची प्रामुख्याने जबाबदारी ही अर्जदाराची असते. या प्रकरणी त्यांनी आपली जबाबदारी योग्यप्रकारे पार पाडल्याचा कोणताही पुरावा आयोगासमोर सादर केला नाही. त्यामुळे अपिलार्थीची, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीप्रमाणे शास्ती लावण्याची आयोगास केलेली विनंती, मान्य करता येणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहितीपैकी मोजमापपुस्तिकांच्या प्रती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्याव्यात.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**

**दिनांकः १७-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. धोंडीराम विश्वनाथ काडवदे,रा.जानवळ, ता.चाकूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्रामपंचायत, जानवळ, ता. चाकूर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, चाकूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८४६
निर्णय दिनांक: १७-१२-२००९

१. श्री. मिर्झा याकुब शिकुर, : अपिलार्थी
रा. लामजना, ता. औसा,जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत लामजना,
ता.औसा,जि.लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, औसा,जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.१२.२००७ रोजी नोंदविलेले व दि.२७.०२.२००९ रोजी फेरसादर केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी व अपूर्ण माहिती दिली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि. ०६.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मालकीच्या जमिनीविषयी काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने

मागणी केलेल्या माहितीमध्ये - तहसीलदार, औसा यांनी अपिलार्थीस त्यांनी न.नं.८-अ देण्यासाठी अर्ज दिल्याचे कळविले आहे, त्या अर्जाची प्रत, न.नं.८-अ कोणी घेतली व किती घेतली गेली व जन माहिती अधिकारी यांनी रेकॉर्ड त्यांच्या(इतरांच्या) हातात का दिले, न.नं.८-अ घेतेवेळी कबाल्यात खाडाखोड असतानाही नोंदी का घेतल्या गेल्या, खाडाखोड निदर्शनास आली असता वरिष्ठास कळवून नोंदी घेणे बंधनकारक आहे का तसेच ८-अ कबाल्या आधारे की यादी आधारे घेण्यात आली व ८-अ नोंदीसाठी किती अर्ज प्राप्त झाले, त्या प्रत्येक अर्जाची प्रत देणे- अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०१.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १७.१०.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व खोटी माहिती प्राप्त झाली आहे. त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक असल्याचे त्यांनी आयोगास स्पष्ट केले. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती त्यांना खोटी का वाटते, याबाबत स्पष्टीकरण देताना अपिलार्थीने त्यांच्याकडे त्यांनी केलेल्या अर्जाची जी प्रत जन माहिती अधिकारी

यांनी त्यांना दिली आहे, तो अर्ज मूळात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलाच नव्हता, त्यामुळे ही माहिती खोटी असल्याचे आयोगास सांगितले व तसेच जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीतील शेवटचा मुद्दा - न.नं. ८-अ नोंदीसाठी प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जांच्या प्रती- ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना मिळाली नसल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०१.१०.२००७ रोजी माहिती पुरविल्याचे आयोगास स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जामध्ये एकूण ४ मुद्यांशी संबंधित काही माहिती मागविली आहे. त्यापैकी मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भातील माहिती ही जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण आणि अभिप्राय अपेक्षित करणारी अशी आहे. अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती ' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. त्यामुळे ती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत होत असल्यामुळे, अपिलार्थीस ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्दा क्र. १ व ४ च्या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या नावाने कोणी अज्ञात व्यक्तीने केलेल्या अर्जाची प्रत मुद्दा क्र.१ ची माहिती म्हणून अपिलार्थीस पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेख्यावर अपिलार्थीच्या नावाने या अर्जाची प्रत उपलब्ध आहे. तथापि हा अर्ज अपिलार्थीने केलेला नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. त्यामुळे प्रत्यक्षात ही माहिती खोटी असल्याचे अपिलार्थीस वाटत आहे. या मुद्यावर अपिलार्थीस शंका वाटल्यास त्यांनी या प्रकरणी इतर सक्षम प्राधिकरणाकडे आपल्या गाऱ्हाण्याची दाद मागावी, असे अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे. माहिती अधिकार

अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात अर्जदारास उपलब्ध करुन देणे एवढीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती, ती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात पुरविली आहे. केवळ ही माहिती अपिलार्थीस खोटी वाटते म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खोटी माहिती पुरविली, असे मानता येणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात ८-अ च्या नोंदी या कबाल्याच्या झेरॉक्स प्रतीच्या आधारे घेतल्या असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०१.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविले व याच पत्रामध्ये त्यांनी ८-अ नोंदीसाठी किती अर्ज प्राप्त झाले, ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कळविले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोग अमान्य करीत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अशाप्रकारच्या नोंदी घेण्यासाठी काही व्यक्तींच्या अर्जाच्या प्रती त्यांच्याकडे प्राप्त झाल्या आहेत आणि उर्वरित नोंदी त्यांनी कबाल्याच्या आधारे घेतल्या असल्याचे अवगत केले आहे. त्यामुळे न.नं.८-अ मध्ये नोंदी घेण्यासाठी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जांच्या सर्व प्रती त्यांना अपिलार्थीस पुरवाव्या लागतील. या सर्व अर्जाच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस अद्याप पुरविल्या नसल्याचे व त्या सर्व प्रती अपिलार्थीस १५ दिवसांचे आत विनामूल्य पुरविण्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित उर्वरित माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.४ शी संबंधित उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः १७-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मिर्झा याकुब शिकुर,रा. लामजना, ता. औसा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत लामजना, ता.औसा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, औसा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८४७
निर्णय दिनांकः १७-१२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. ए.एम.मोमीन<br>रा.उस्मानाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.),<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०९.२००८ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या सात अर्जांच्या प्रतींची मागणी केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या सात अर्जाच्या प्रतींची मागणी केली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत एक अर्ज जोडला असून या अर्जाची अपिलार्थीने आयोगास सादर केलेली झेरॉक्स प्रत

अत्यंत अस्पष्ट असून यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या वेतननिश्चितीसंदर्भात केलेल्या सात अर्जांच्या प्रती आवश्यक असल्याचे आढळून येत आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १३.०८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली कागदपत्रे त्यांनी त्यांच्या कार्यालयाकडे स्वतः सादर केली असल्याने ती त्यांना पुन्हा देता येत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.०९.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०९.२००७ व दि. ०६.१०.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीसाठी अपिलार्थी स्वतः उपस्थित राहीले नाहीत व सुनावणीच्या निर्णयाची वाट न पाहता, या टप्प्यावरील अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देण्याचा विहित कालावधी व्यपगत होण्यापूर्वीच दि. ०९.१०.२००७ रोजी त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केले. या अपील अर्जाच्या, राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातील छाननीनंतर, त्यांना कळविलेल्या त्रूटीची पूर्तता करुन अपिलार्थीने दि. १०.०९.२००८ रोजी  वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस काल दि. १६.१२.२००९ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे विनामूल्य पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. २५.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असताना देखील, ही माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः नाकारले व तसेच अपिलार्थीने त्यांच्या दि. ०३.०९.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देण्यासाठी कलम १९(६) मध्ये जो कालावधी विहित केला आहे, तो कालावधी व्यपगत होण्याच्या आधीच आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. यावरुन अपिलार्थीने आयोगाकडे अपील करताना अधिनियमामध्ये विहित केलेल्या कालावधीचे बंधन विचारात घेतले नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. तथापि आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती पुरविली आहे त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. परंतु अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती देण्याचे त्यांना प्रथमतः चुकीच्या कारणास्तव नाकारणारे संबंधित उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. बी.टी.कदम सध्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी,बालकल्याण, जिल्हा परिषद, नांदेड यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर अधिनियमातील तरतुदीनुसार व सतर्कतेने कार्यवाही करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) संबंधित जन माहिती अधिकारी श्री. बी.टी.कदम (सध्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण, जिल्हा परिषद,नांदेड या पदावर कार्यरत) यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १७-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ए.एम.मोमीन,सेवानिवृत्त अधीक्षक, द्वारा-मोमीन ट्रेडर्स, गांधीनगरसमोर,उस्मानाबाद ता.जि.उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.),जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. श्री. बी.टी.कदम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण, जिल्हा परिषद,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२४०
निर्णय दिनांक १७/१२/२००९

१ श्री. मोतीराम गयबू काळे, : अपिलार्थी
रा. जानापूरी, पो. वडेपूरी, ता. लोहा, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, अर्धापूर, जि. नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
तहसील कार्यालय, अर्धापूर, जि. नांदेड

**निर्णय**

श्री. मोतीराम गयबू काळे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २०.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.२२.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १०४ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मोतीराम गयबू काळे, मु. जानापूरी, पो. वडेपूरी, एस.आर.टी., ता. लोहा, जि. नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२४१
निर्णय दिनांक १७/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मोतीराम गयबू काळे,<br>रा. जानापूरी, पो. वडेपूरी, ता. लोहा, जि. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, लोहा, जि. नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, लोहा, जि. नांदेड | | |

**निर्णय**

श्री. मोतीराम गयबू काळे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १६.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.१९.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १०७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मोतीराम गयबू काळे, मु. जानापूरी, पो. वडेपूरी, एस.आर.टी., ता. लोहा, जि. नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२४२
निर्णय दिनांक १७/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अ. अनसार अ. नईम,<br>रा. भोकर, जि. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामविकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत कार्यालय, भोकर, जि. नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती, भोकर, जि. नांदेड | | |

**निर्णय**

श्री. अ. अनसार अ. नईम यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २०.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०५.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १०५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. अ. अनसार अ. नईम, वडर गल्ली, वार्ड क्र. ०४, भोकर, ता. भोकर, जि. नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०५३

निर्णय दिनांक १७-१२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. कांबळे तात्याबा बाबा,<br>व्दारा- क्षीरसागर संजय प्रल्हाद, अजित गॅस गोडाऊनच्या<br>पाठीमागे, खानापूर रोड, उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली |
| | जन अपिलीय अधिकारी | : | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता, त्यांना जन माहिती अधिकाऱ्याने विहित मुदतीत माहिती न दिल्याने, व अपिलार्थीने या संदर्भात जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनीही अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १८-०८-२००५ रोजी लिहिलेल्या पत्राच्या संदर्भानुसार अपिलार्थीच्या मान्य करण्यात आलेल्या राजीनाम्याच्या मंजूरीची साक्षांकीत झेरॉक्स सत्यप्रत व या संदर्भान्वये सादर केलेल्या राजीनाम्या-बरोबर जोडलेल्या चलन भरलेल्या पावतीची साक्षांकीत झेरॉक्स सत्यप्रत, ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी सेवा शर्तीप्रमाणे राजीनामा दिल्यानंतर भरावयाच्या रकमेसंदर्भात अपिलार्थीकडून माहिती मागविली. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून त्यांच्या भरणा केलेल्या चलनाची प्रत किंवा जर त्यांनी या रकमेचा स्वतः भरणा केला असेल तर त्याबाबतची माहिती अपिलार्थीकडे मागितली. परंतु अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती संदर्भात या पत्रामध्ये जन माहिती अधिकाऱ्याने कोणतेही भाष्य केले नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांच्याकडे दिनांक ०८-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या अपिलीय अधिकाऱ्याने नेहमीच्या कार्यपध्दतीप्रमाणे या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, या प्रकरणी अपिलार्थीचा कथित राजीनामा त्यांच्या विभागातर्फे अद्यापपावेतो मंजुर करण्यात आलेला नाही. अपिलार्थी हे त्यांच्या विभागात शिक्षण सेवक या पदावर कार्यरत होते. या पदाचा त्यांनी राजीनामा देताना सेवाशर्तीप्रमाणे, एक महिन्याचा पगार चलनाव्दारे बँकेत भरल्याचा अथवा रोखीने भरणा केल्याचा आवश्यक तो पुरावा अपिलार्थीने सादर न केल्यामुळे त्यांचा राजीनामा मंजुर करता आला नाही. याकरिता त्यांच्या विभागातर्फे दिनांक २१-०८-२००८ रोजी अपिलार्थीस त्यांच्या राजीनामापत्रातील त्रुटी कळविल्या आहेत. परंतु या त्रुटीची पूर्तता अपिलार्थीने न केल्यामुळे अद्यापपावेतो त्यांचा राजीनामा मंजूर केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी " अपिलार्थीने मागणी केलेली माहिती - त्यांचा राजीनामा अद्यापपावेतो मंजूर न केला गेल्यामुळे - अपिलार्थीस देण्याकरिता त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही " एवढी माहिती जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली असती तरी या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असणारी कार्यवाही पूर्ण झाली असती. तथापि असे न करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ज्या प्रकरणासंदर्भात त्यांनी माहिती मागविली होती त्या संदर्भीत प्रकरणाची माहिती दिली. अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी यांच्यामध्ये झालेल्या पत्रव्यवहारावरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज करण्यापूर्वी

अपिलार्थीचा राजीनामा काही त्रुटीच्या पुर्ततेअभावी स्वीकृत झाला नाही, ही वस्तुस्थिती असतांना अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून राजीनामा मंजुरीची साक्षांकीत झेरॉक्त प्रत मागितली आहे. यावरुन अपिलार्थीचे या प्रकरणातील वर्तनही आयोगास संशयास्पद आढळून आले आहे. या प्रकरणी आयोगाने अपिलार्थीस दिनांक १७-११-२००९ रोजीच्या नोटीशीव्दारे सुनावणीसाठी उपस्थित राहण्याची सूचना देऊनही आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. यावरुन अपिलार्थीच्या या प्रकरणातील संशयास्पद वर्तनाचे दृढीकरण होत आहे. तथापि अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती वर स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत स्पीड पोस्टाव्दारे विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जर वेळेत सुनावणी घेतली असती तर अपिलार्थीस आयोगापर्यंत येण्याची गरज पडली नसती. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली श्री. खान यांनी आपल्या कार्यशैलीतील दर्शविलेल्या अशा प्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद शिक्षण संचालक यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत स्पीड पोस्टाव्दारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कांबळे तात्याबा बाबा, व्दारा- क्षीरसागर संजय प्रल्हाद, अजित गॅस गोडाऊनच्या पाठीमागे, खानापूर रोड, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटलजवळ, पुणे - १० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०५४

निर्णय दिनांक १७-१२-२००९

१ श्री. जाधव देविदास रामचंद्रराव, : अपिलार्थी
क्रीडा विभाग प्रमुख,
शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,
नागपूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-१०-२००८ रोजीच्या अपील अर्जान्वये मागणी केलेली माहिती

अद्यापही त्यांना अप्राप्त आहे. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असून या अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००१ ते २००८ या कालावधी-तील शारीरिक प्रशिक्षण निर्देशक या रिक्त पदाच्या संदर्भात काही माहिती एकूण पाच मुद्याद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अपिलार्थीने प्रधान सचिव वित्तीय सुधारणा कक्ष (अतिरिक्त संवर्ग कक्ष), मंत्रालय, मुंबई यांना दिनांक ३०-०५-२००८ रोजी लिहिलेल्या पत्राच्या, जन माहिती अधिकारी यांना दिलेल्या प्रतीवर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, जन माहिती अधिकारी यांच्या विद्यापीठात व विद्यापीठाअंतर्गत येणा-या महाविद्यालयातील शारीरिक प्रशिक्षण निर्देशक या पदाशी समकक्ष असलेल्या रु. ८००० ते १३५०० या वेतन श्रेणीतील मंजूर व रिक्त पदांची संख्या, विद्यापीठाने थेट भरती पदे भरण्यापूर्वी शासनाच्या अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे तशी मागणी केली असल्यास त्या पत्राची प्रत, अशी पदे शासनाच्या अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे नियमानुसार मागणी करुन भरणार आहात किंवा कसे, शासनाच्या अतिरिक्त संवर्ग कक्षाच्या दिनांक १०-०९-२००१ च्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणे जन माहिती अधिकारी यांना बंधनकारक आहे किंवा कसे - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतूदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले असता त्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दिनांक २०-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे. प्राप्त माहितीबद्दल त्यांची कोणतीही तक्रार नसून ही माहिती त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने प्राप्त झाली आहे, एवढेच त्यांना आयोगाच्या निदर्शनास आणावयाचे होते.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, या प्रकरणी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांना दिनांक ३०-०९-२००८ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीने माहिती मागितली त्यावेळी बी. डी. पावसे, उप संचालक, पशूपैदास प्रक्षेत्र, बोरगांव, जि. अकोला हे माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. अपिलार्थीने माहितीची मागणी करतेवेळी विद्यापीठात ऑक्टोबर महिन्यात आंतर विद्यापीठ क्रिडास्पर्धा व अश्वमेघ महोत्सव इत्यादी कामात अधिकारी व्यस्त असल्यामुळे अर्जदाराच्या मूळ अर्जावर त्यांना काहीही कार्यवाही करता आली नाही. परंतु अपिलार्थीचे प्रथम अपील प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येऊन अपिलार्थीस दिनांक २०-१२-२००८ रोजी माहिती पुरविण्यात आली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या पाच मुद्यावरील माहितीपैकी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ५ शी संबंधित माहिती अपिलार्थीस, ती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे "................ अशी पदे शासनाकडील अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे

नियमानुसार मागणी करुन भरणार आहात किंवा कसे " व मुद्दा क्रमांक ५ व्दारे " ............. अतिरिक्त संवर्ग कक्षाच्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणे आपणास बंधनकारक आहे किंवा कसे " अशी माहिती मागितली होती. या दोनही मुद्दयांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशा प्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे, स्पष्टीकरणे अथवा त्यांचे कोणतेही अभिप्राय विचारणे आणि जन माहिती अधिकाऱ्याने त्यांचे वैयक्तीक अभिप्राय, स्पष्टीकरण अर्जदारास देणे अशा प्रकारच्या प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत नाहीत. त्यामुळे मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक ४ व ५ च्या मुद्यावरील माहिती ही अवैध असल्याचे सिध्द होत आहे. उर्वरित ३ मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस, ती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या ३ मुद्यांवरील अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांना फारसे श्रम पडले असावेत किंवा त्यांच्या कार्यालयाचे मनुष्यबळ प्रमाणाबाहेर वळवावे लागले असेल असे या प्रकरणी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अशा कोणत्याही प्रकारे संभवत नाही. अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी हे अन्य कामात व्यस्त असल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत, असे कबूल केले आहे. तसेच त्यांनी आयोगाकडे केलेल्या लेखी युक्तिवादामध्ये असेही नमूद केले आहे की, अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले आहे. हा अपील अर्ज केल्यानंतर जन माहिती अधिकारी

यांनी अंदाजे १ महिना २० दिवस इतक्या विलंबाने माहिती पुरविली आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती आणि अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला कालावधी या दोनही बाबी पूर्णतया व्यस्त प्रमाणात असून कोणत्याही परिस्थितीत अपिलार्थीस या प्रकरणी, जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाचे समर्थन होऊ शकत नाही, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लहान व्याप्ती असलेली माहिती देखिल विलंबाने पुरवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांनी आपल्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब कुलगुरु, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३१-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जर वेळेत सुनावणी घेतली असती तर अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करण्याची कदाचित गरज पडली नसती. तथापि त्यांनीही या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेता अथवा या संदर्भात कोणताही निर्णय न देऊन आपल्यावरील जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद कुलगुरु यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना येथे सूचविण्यात येत आहे. अपिलार्थीस आता त्यांना अपेक्षित असलेली माहिती मिळाली असल्यामुळे आणि प्राप्त माहितीवर ते समाधानी असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. कुलगुरु, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. बी. डी. पावसे, उप संचालक, पशूपैदास प्रक्षेत्र, बोरगांव, जि. अकोला) यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जाधव देविदास रामचंद्रराव, क्रीडा विभाग प्रमुख, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमिनरी हील्स नागपूर ४४०००६ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमिनरी हील्स, नागपूर ४४०००६ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४ कुलगुरु, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमिनरी हील्स, नागपूर ४४०००६ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०५५

निर्णय दिनांक  १७-१२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विठ्ठल शिवदास धोंगडे,<br>मु. पो. वाघोली, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब,<br>तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब,<br>तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वाघोली, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मौजे वाघोली ग्रामपंचायतीमधील दि. ०१ एप्रिल २००५ ते १०-१०-२००८ या कालावधीमधील संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये, संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजना भाग १ व २ मधून मिळालेले एकूण अनुदान, त्यातून केलेली कामे, त्यावर झालेला खर्च, ग्रामसेवकाचे नांव, सरपंचाचे नांव व इंजिनिअरचे नांव, कामनिहाय झालेला खर्च, कागदपत्र, इस्टीमेट, मोजमाप पुस्तिकेच्या प्रती, किर्द, व्हावचर, धान्यासाठी रजिस्टर मस्टर इत्यादी माहिती, ही माहिती साक्षांकीत स्वरुपात मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब यांना उद्देशून केला होता. त्यांनी सदरचा अर्ज संबंधित ग्रामसेवकाकडे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे दिनांक १५-१०-२००८ रोजी पाठविला. या अर्जावर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७-११-२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३०४ इतके भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब यांच्याकडे दिनांक १४-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे आदेश दिनांक ०३-१२-२००८ रोजी पारीत करुन या आदेशाव्दारे जन माहिती अधिकारी श्री. डी. एस. शिंदे यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, त्यांच्या पूर्वीचे ग्रामसेवक श्री. जी. व्ही. गवळी यांच्याकडून या प्रकरणाशी संबंधित अभिलेखे प्राप्त होताच अपिलार्थीस, सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आदेशित केले. तथापि या कालावधीनंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मागणी केलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून गहाळ झाली आहे. त्याबद्दल त्यांनी पोलीसात फिर्याद दाखल केली आहे. तथापि त्यांना या माहितीची आजही आवश्यकता आहे.

संबंधित जन माहिती अधिकारी श्री. डी. एस. शिंदे यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडून दिनांक ०८-१२-२००८ रोजी दुपारी ०१-३० वाजता गहाळ झाली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या दप्तरामध्ये उपलब्ध होती ते दप्तर ते वाघोली येथून कळंब येथे घेऊन जात असतांना दोन अज्ञात इसमांनी त्यांचे दप्तर ते ज्या वाहनातून प्रवास करत होते त्या वाहनातून पळविले. या प्रकरणी त्यांनी दिनांक ०८-१२-२००८ रोजी पोलीस स्टेशन येरमाळा येथे एफआयआर क्रमांक १४२/२००८ अन्वये तक्रार दाखल केली आहे.

श्री. डी. एस. शिंदे यांच्या पूर्वीचे ग्रामसेवक श्री. जी. व्ही. गवळी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास त्यांनी दिनांक १७-११-२००८ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३०४ इतके अपिलार्थीस शासकीय कोषागारात भरण्यास सांगितले. तथापि या रकमेचा अपिलार्थीने भरणा केला नाही आणि यानंतर त्यांनी त्यांच्याकडे असलेले वाघोली ग्रामपंचायतीचे सर्व दप्तर श्री. डी. एस. शिंदे यांना दिनांक ०६-१२-२००८ रोजी हस्तांतरीत केले आहे. त्यांचा आता या प्रकरणशी काही संबंध राहिलेला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने जी माहिती ग्रामसेवकाकडे मागितली आहे ती त्यांच्या कार्यालयामध्ये व्दितीय प्रतीच्या स्वरुपामध्ये उपलब्ध असून ते ती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १०-१०-२००८ रोजीच्या अर्जान्वये माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार व्यक्तिशः माहिती मागितली असता, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १७-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३०४ इतके शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा केला नाही व त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-१२-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले होते. त्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०८-१२-२००८ रोजी अगर तत्पूर्वी अपिलार्थीस माहिती देणे अपेक्षित होते. परंतु नेमके त्याच दिवशी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे दोन अज्ञात इसमांनी पळवून नेले व यासंदर्भात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

आयोगास या प्रकरणी संबंधित ग्रामसेवक यांचे या प्रकरणातील वर्तन संशयास्पद असल्याचे आढळून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती दिनांक ०१-१२-२००८ रोजी प्राप्त असून त्यांनी ती न पूरवून त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी मौजे वाघोली, तालुका कळंब या ग्रामपंचायतीच्या अभिलेख्याच्या चारी प्रकरणाच्या संदर्भात पोलीसामार्फत चौकशी करावी तसेच त्यांना या प्रकरणी संबंधित ग्रामसेवकावर त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी आज रोजी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्याचे व ती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगास अवगत केले आहे. सबब गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत ग्रामसेवक ग्रामपंचायत वाघोली, तालुका कळंब यांच्यामार्फत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाघोली, तालुका कळंब यांच्यामार्फत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना, संबंधीत ग्रामसेवक श्री. डी. एस. शिंदे यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विठ्ठल शिवदास धोंगडे, मु. पो. वाघोली, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वाघोली तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०५६

निर्णय दिनांक १७-१२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विठ्ठल तुळशीराम माने,<br>रा. नागराळ, पो. गुंजोटी, तालुका उमरगा,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे मुरुम,<br>तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा पोलीस प्रमुख, पोलीस मुख्यालय,<br>उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांनी त्यांचे प्रथम अपील फेटाळल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे आणि आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मुरुम पोलीस ठाणे यांच्या कार्यालयातील पोलीस निरीक्षक ते शिपायापर्यंत त्यांच्याकडे असलेल्या वडिलोपार्जीत मालमत्तेसंदर्भात माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरगा यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी संबंधीत नसल्याने आणि सदर माहिती उघड केल्याने संबंधितांच्या खाजगी बाबीत विनाकारण हस्तक्षेप ठरेल असे त्यांना वाटल्यावरुन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्याचे नाकारले. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-११-२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांच्या भूमिकेशी सहमती दर्शवत अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीने ते कोणते व्यापक जनहित साध्य करणार आहेत, याची कोणतीही माहिती आयोगास दिलेली नाही किंवा हे तोंडी स्पष्ट करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच याबाबत आयोगाने अशा प्रकारची माहिती ही,

अधिनियमातील कलम ८ (१) ( ञ) च्या तरतुदीचा भंग करणारी असल्याने, अशा प्रकारची माहिती उघड करण्याचे  अनेक अपील प्रकरणी संबंधीतांना नाकारले आहे.  त्यामुळे या प्रकरणी देखील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड केल्याने संबंधित त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीत आगंतूक हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही.  त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती न देण्याची जन माहिती अधिकारी यांची भूमिका योग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विठ्ठल तुळशीराम माने, रा. नागराळ, पो. गुंजोटी, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस प्रमुख, पोलीस मुख्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०५७

निर्णय दिनांक १७-१२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. महादेव शंकरराव कमाले, | : | अपिलार्थी |
| २ | श्री. मानसिंग तुळशीदास मोरे, | | |
| ३ | श्री सतीश प्रभाकरराव दिवाण,<br>रा. १ ' शिवप्रसाद ', शिक्षक कॉलनी, पाथरी,<br>तालुका पाथरी, जिल्हा परभणी | | |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषी अधिकारी, पाथरी, तालुका पाथरी,<br>जिल्हा परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय कृषी अधिकारी, परभणी | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात | : जन माहिती अधिकारी | : | मंडळ कृषी अधिकारी, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तालुका कृषी अधिकारी, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील तरतुदीनुसार प्रथम अपील दाखल केले होते. त्यांनीही अपिलार्थीच्या अपील अर्जावर काहीच न केल्यामुळे अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने पुढे असेही नमूद केले आहे की, तालुका कृषि अधिकारी, पाथरी व उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी हे माहिती अधिकाराच्या तरतुदीबाबत अत्यंत उदासीन असून ते अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपासून विनाकारण वंचित ठेवत असल्यामुळे अपिलार्थीवर अन्याय होत आहे, त्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील विविध विषयावरील माहिती एकूण दहा मुद्दयाव्दारे व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी स्वतः व त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी नोकरीच्या गावी कधीपासून राहणार आहात, आपल्या कार्यालयातील एकूण कर्मचा-यांची संख्या, त्यांची नावे, पद व गावे, सन २००३ ते २००८ या कालावधीमध्ये रोजगार हमी योजनेमधून केलेल्या कामांची संख्या, निधीचे शीर्षक, प्रत्येक कामावर झालेला खर्च, मजुराची संख्या, मजुरांची नावे व ही कामे यंत्रांच्या सहाय्याने करण्यात आली आहेत काय, २००३ ते २००८ या कार्यकाळात पाथरी तालुक्यामध्ये बांधण्यात आलेले वनराई बंधारे, शेततळे, गावतळे यांची संख्या, प्राप्त होणा-या निधीचे शीर्षक, प्रत्येक कामावर झालेला खर्च,

मजुराचे नांव व ही कामे यंत्रांच्या सहाय्याने करण्यात आली आहेत काय, सन २००७ ते २००८ या कालावधीमध्ये गतीमान योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या कामाची संख्या, कामाचे स्थळ, या कामाचा कामनिहाय खर्च, सदर मजुरांची नावे, यासंदर्भात आपल्या कार्यालयातील रेकॉर्डच्या छायांकीत प्रती, जन माहिती अधिकारी हे तहसील कार्यालयामधील लोकशाहीदिनास कधीपासून उपस्थित राहणार आहेत याबाबतची माहिती, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत पाथरी तालुक्यातील शेतक-यांच्या किती वेळा बाहेरगावी सहली नेण्यात आल्या, कोठ्या नेण्यात आल्या, प्रत्येक सहलीसाठी किती शेतकरी नेण्यात आले, आपण नोंदविलेली शेतक-यांची नांवे, सरकारच्या किती योजना कृषि विभागाबाबत आहेत, त्यांची नांवे, ज्या योजना आपल्या कार्यालयामार्फत चालविण्यात येत आहेत त्यांची नावासह माहिती, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत कर्मचा-यांच्या वेतनावर दरमहा होणारा खर्च, कर्मचारीनिहाय माहिती, माहिती अधिकाराबाबतचा आवश्यक तो फलक जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दर्शनी भागात कधी लावणार आहेत - या मुद्दयांचा समावेश होता. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. त्यांच्या मूळ अर्जासोबत आवश्यक तो पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे जोडला होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०८-२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थी हे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात आल्यानंतर अपिलार्थीस गतीमान योजनेची माहिती उपलब्ध करुन दिली व ती माहिती मिळाल्याने अपिलार्थीचे समाधान झाले असे अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-०८-२००८ रोजीच्या पत्रान्वये माहिती अधिका-याला लिहून दिले आहे. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याचे दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदरचे अपील उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी यांना उद्देशून केले होते. कृषि विभागामध्ये

तालुका कृषि अधिकारी यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे, परंतु अपिलार्थीने त्यांच्याकडे हे प्रथम अपील न करता ते उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे केले आहे. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे न पाठविता त्यांच्याकडे तो तसाच विनाकार्यवाही ठेऊन दिला. अशा प्रकारे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व तीनही अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी दिनांक १४-०८-२००८ रोजी आवश्यक ती माहिती अपिलार्थीस दाखविली आहे आणि त्यामुळे त्यांचे समाधान झाले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १४-०८-२००८ रोजी फक्त गतीमान योजनेची माहिती प्राप्त करुन घेतली आहे. तथापि यानंतर तालुका कृषि अधिकारी यांनी कुठलीच माहिती त्यांना दिली नाही असे दर्शवून अपिलार्थीने प्रथम अपील केले. अपिलार्थीचा सदरचा अपील अर्ज तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे पाठविण्याऐवजी उपविभागीय कृषि अधिकारी यांनी हा अपील अर्ज त्यांच्याकडे तसाच विना कार्यवाही ठेऊन घेतला. दरम्यान अपिलार्थीस संबधित तालुका कृषि अधिका-याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले.

आज रोजी युक्तिवादाच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्याने त्यांचे समाधान झाल्याचे पत्र, आयोगास दाखविले.

तथापि यानंतरही अपिलार्थीने उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी व आयोगाकडे अनुक्रमे प्रथम व व्दितीय अपील केले असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिली नसल्याचे येथे सिध्द होत आहे.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, ६ व १० शी संबंधित माहिती ही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्दयांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून भविष्यकाळातील व त्यांच्याकडे उपलब्ध नसलेली व अमूर्त स्वरुपातील माहिती मागविली आहे. जी माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे, त्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ४, ५ व ८ मधील काही माहिती अपिलार्थीस, ती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्यामुळे देता येणार नाही.या मुद्दयांमधील " सदरील कामे यंत्रांच्या सहाय्याने करण्यात आली आहेत काय " या भागावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ८ मधील कृषि विभागामार्फत राबविण्यात येणा-या सर्व योजनांची नांवे, या व्यतिरिक्त उर्वरित माहिती ही अपिलार्थीने मोघम स्वरुपात मागितली असल्याने ती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ अंशतः, मुद्दा क्रमांक ४ अंशतः, मुद्दा क्रमांक ५ अंशतः व मुद्दा क्रमांक ८ अंशतः आणि मुद्दा क्रमांक २, ७ आणि ९ मधील संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. ही माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील या निर्णयामध्ये वर स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५

दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः मागितली असल्यामुळे या कालावधीमध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून पूर्वनियोजितवेळी स्वतः ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न होण्यासाठी केवळ तत्कालीन जन माहिती अधिकारी हे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. तत्कालीन मंडळ कृषि अधिकारी/ तालुका कृषि अधिकारी सध्या परभणी येथे कार्यरत आहेत त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (कृषि) यांना करण्यात येत आहे. त्याचबरोबर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (कृषि) यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (कृषि) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महादेव शंकरराव कमाले व इतर, रा. १ ' शिवप्रसाद ', शिक्षक कॉलनी, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषी अधिकारी, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०५८

निर्णय दिनांक १७-१२-२००९

१ श्री. मोहंमद अन्वरुल्ला खान, : अपिलार्थी

९-४-४५५, कय्यूम प्लॉटस्, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका

कार्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप आयुक्त (सामान्य), नांदेड वाघाळा शहर

महानगरपालिका कार्यालय, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप अभियंता, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यालय, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : शहर अभियंता, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यालय, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक ११-०९-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील केले असता त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड शहरातील किल्ला जतन करुन ठेवण्यासाठी केलेल्या कार्यवाहीसंदर्भात सन २००२ ते अपिलार्थीने अर्ज करेपर्यंतच्या कालावधीशी संबंधित काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ११-०९-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय

अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-०९-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ११-०९-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोहंमद अन्वरुल्ला खान, ९-४-४५५, कय्यूम प्लॉटस्, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यालय, नांदेड या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०५९

निर्णय दिनांक १७.१२.२००९

१ श्री. रमेश एकनाथराव काळे, : अपिलार्थी
रा. सिरसाळा, ता. परळी, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य, श्री. पंडीतगुरु पार्डीकर कला
महाविद्यालय, सिरसाळा, ता. परळी, जि.
बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राचार्य, श्री. पंडीतगुरु पार्डीकर कला
महाविद्यालय, सिरसाळा, ता. परळी, जि.
बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्य लिपिक, श्री. पंडितगुरु पार्डीकर कला महाविद्यालय सिरसाळा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये

अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक ०४.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेतल्याने आणि त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो कोणतीही माहिती न दिल्याने त्यानी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती एकूण ११ मुद्याद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या आवश्यक त्या माहितीचा कालावधी हा २००४ ते २००८ असा होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्राचार्य तथा अपिलीय अधिकारी यांच्याकडे विनादिनांकाचे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीचे वकील, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी करता आयोगास असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत त्यांच्या मूळ अर्जाची प्रत सादर केली आहे, त्यावर अपिलार्थीची सही नाही. त्यामुळे आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे आपिलार्थीने सादर केलेली प्रथम अर्जाची प्रत पाहिली असता, त्या प्रतीवर देखिल अपिलार्थीची सही नाही असे आढळून येत आहे. तसेच या अर्जावर अपिलार्थीने माहिती

अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक असलेल्या १० /- रु. इतक्या किमतीचे कोर्ट फी स्टॅम्प डकवले नाहीत. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर देखिल अपिलार्थीने २० रु. इतक्या किमतीचे कोर्ट फी स्टॅम्प डकवले नसल्याचे पुढील तपासणीत आयोगास आढळून आले आहे. अशाप्रकारे अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलाशी संबंधित प्रथम अर्जावर अपिलार्थीची सही नसल्यामुळे आणि अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेले प्रथम अपील आवश्यक त्या रकमेची कोर्ट फी स्टॅम्प न डकविल्याने अवैध ठरत असल्याने, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रमेश एकनाथराव काळे, शिवनेरी निवास, तेलगाव रोड, सिरसाळा, ता. परळी, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, श्री. पंडितगुरु पार्डीकर कला महाविद्यालय सिरसाळा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, श्री. पंडीत गुरुपार्डीकर कला महाविद्यालय,

सिरसाळा,ता. परळी, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०६०

निर्णय दिनांक १७.१२.२००९

१ श्री. भास्कर दगडू जाधवर, : अपिलार्थी
बी.अ‍ॅन्ड सी. क्वॉटरजवळ, पार्डी रोड,
मु.पो.ता. भूम, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
संचालक, उच्च शिक्षण विभाग,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : स्वीय सहाय्यक तथा लघुलेखक, कार्यालय सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून पहिल्या अपिलाचा निर्णय न मिळाल्याने व माहिती अधिकाऱ्याने चुकीची,

दिशाभूल करणारी व खोटी माहिती दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक १५.०६.१९७१ ते ३०.०६.१९८४ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०.०५.२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या कागदपत्रावर सही करण्यास नकार दिल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २५.०९.२००८ रोजीच्या प्रथम

अपील अर्जावर, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी, अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भास्कर दगडू जाधवर, बी.ॲन्ड सी. क्वॉटरजवळ, पार्डी रोड, मु.पो.ता. भूम, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा स्वीय सहाय्यक तथा लघुलेखक, कार्यालय सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०७३
निर्णय दिनांक: १८-१२-२००९

१. श्री. दामोधर शंकर घुगे, : अपिलार्थी
रा.पांगरी, ता.जिंतूर, जि.परभणी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी, जिंतूर, जि.परभणी
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी.
प्रत्यक्षत: जन माहिती अधिकारी : -

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि. २९.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५ ते २००७ या कालावधीशी संबंधित मराठवाडा पाणलोट विकास मिशन अंतर्गत जिंतूर तालुक्यामध्ये करण्यात आलेल्या कामांविषयी सविस्तर माहिती व्यक्तिश:

मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कोणत्या गावात कोणत्या स.नं.मध्ये कोणती कामे झाली, त्यावर किती खर्च झाला, कामांची मंजूर अंदाजपत्रकीय तरतुद, कामावर झालेला खर्च, कामांचे मजूर उपस्थितीचा अहवाल, जिल्हाधिकाऱ्याकडे मागणी केलेल्या पतमर्यादेची प्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.०६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन जन माहिती अधिकारी हे इतर महत्त्वाच्या कामामध्ये गुंतले असल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी काही कालावधी लागेल, असे अपिलार्थीस कळविले. यानंतर अपिलार्थीने ही माहिती प्राप्त न झाल्याने दि. १०.०८.२००७ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन माहिती अधिकाऱ्यास त्यांनी दि. ३०.०८.२००७ रोजी पत्र लिहून अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, ते ही माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वेळोवेळी, आयोगाकडील द्वितीय अपील अर्जाची सुनावणी नोटीस प्राप्त झाल्यानंतरही गेले असता, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून कोणतीही माहिती त्यांना प्राप्त होऊ शकली नाही. यासंदर्भात त्यांनी जिंतूर तालुक्यातील कृषि विभागाच्या कार्यालयाशी केलेला पत्रव्यवहार आयोगास दाखविला. या पत्रव्यवहारावरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी

केल्यानंतर, स्वत: जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचा त्यांनी प्रयत्न केल्याचे येथे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देणे हे जन माहिती अधिकाऱ्यास अनिवार्य आहे. परंतु त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने या संपूर्ण घटनाक्रमामध्ये काहीही कार्यवाही केली नाही, एवढेच आयोगास या प्रकरणी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने अर्ज केल्यानंतर लागलीच दुसऱ्या दिवशी प्रतिसाद दिला आहे. तथापि या पत्रामध्ये अपिलार्थीस माहिती देण्यासाठी काही कालावधी लागेल, एवढाच उल्लेख केल्याचे दिसून येत आहे. एवढेच नव्हेतर, दि. ३०.०८.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे आदेशित केल्यानंतरही व अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यास ते तयार असतानाही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न देऊन अथवा त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन त्यांच्या कार्यशैलीतील उद्दामपणाचे पुरेपूर दर्शन या प्रकरणी घडविले आहे असे येथे म्हटल्यास ते फारसे वावगे होणार नाही. जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देण्याच्या कृतीद्वारे त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी श्री. सुखदेव (सध्या रजेवर) यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांना प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

आयुक्त (कृषि) यांनी, या आदेशाची प्रत त्यांच्या कार्यालयातर्फे श्री. सुखदेव यांच्या पत्त्यावर विहित मुदतीत पोहोचेल, याची दक्षता घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जिंतूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २९.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती या कालावधीमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी लागेल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांकः १८-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दामोधर शंकर घुगे,रा.पांगरी, ता.जिंतूर, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जिंतूर, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे-५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०७४
निर्णय दिनांकः १८-१२-२००९

१. श्री. घुमरे दत्तात्रय ज्ञानोबा, : अपिलार्थी
रा.पारगाव (घु.) ता.पाटोदा, जि.बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षण संचालक,
माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग,पुणे
प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : शिक्षण उपसंचालक,
शिक्षण संचालनालय,पुणे.
त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक, श्री बंकटस्वामी शिक्षण
संस्था,बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मागणी केलेली माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद करुन संबंधित जन

माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमानुसार कारवाई करण्याची आणि अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०१.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांच्याकडे श्री बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकीघाट, जि.बीड या संस्थेमधील त्यांच्या आस्थापनाविषयक बाबींची एकूण ४ मुद्यांद्वारे काही माहिती पोस्टाने मागितली होती. शिक्षण उपसंचालक कार्यालयाने सदरचा अर्ज दि. ०५.०२.२००८ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे पाठविला. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड कार्यालयातील जन माहिती अधिकाऱ्याने हा अर्ज नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे मुख्याध्यापक, श्री बंकटस्वामी शिक्षण संस्थेकडे पाठविला. तथापि अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग,पुणे यांच्याकडे दि. २८.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. तथापि तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, सहायक शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प.बीड यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, अपिलार्थीच्या दि. २८.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर या प्रकरणी शिक्षण संचालक अथवा त्यांनी या प्रकरणाशी संबंधित नेमणूक केलेले इतर जन अपिलीय अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच

झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय यांनी अथवा या प्रकरणाशी संबंधित त्यांनी नेमलेल्या जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२८.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांक: १८-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. घुमरे दत्तात्रय ज्ञानोबा, मु.पो.पारगाव (बु),ता.पाटोदा,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,कार्यलय शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, म.रा.१७,डॉ.आंबेडकर मार्ग,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, म.रा.१७,डॉ.आंबेडकर मार्ग,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०७५
निर्णय दिनांकः १८-१२-२००९

१. श्री. सदाविजय आर्य, : अपिलार्थी
रा.औराद शहाजानी, ता.निलंगा, जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय,
औराद शहाजानी, ता.निलंगा, जि.लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय,
औराद शहाजानी, ता.निलंगा, जि.लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्राध्यापक,
मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय,
औराद शहाजानी, ता.निलंगा, जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०९.२००८ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आयोगास विनंती केली आहे की, त्यांच्या मूळ अर्जातील माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे निर्देश जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना देण्यात यावेत. त्यांना माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी टाळले असल्याने व त्यांची दिशाभूल

केली असल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर योग्य त्या कारवाईचे आणि अर्जदारास अर्जाचा खर्च व नुकसान भरपाई देण्याचे आदेश व्हावेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ३०.०५.२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज करुन त्यांच्याकडे एकूण ९ मुद्यांद्वारे अपिलार्थीच्या सेवेसंदर्भात आणि पेन्शन व ग्रॅच्युईटीसंदर्भात काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.०६.२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.०७.०८.२००७ रोजी एक पत्र लिहून अपिलार्थीस या प्रकरणाची सद्यस्थिती कळविली. तथापि हा प्रतिसाद अपिलार्थीस मान्य नसल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी सर्व उपस्थितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आल्यानंतर आयोगास असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रश्नोत्तराच्या स्वरुपात माहिती दिली आहे. तथापि माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना पाठविलेल्या नाहीत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,३,५,६ अंशतः व ७, ८ व ९ मधील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ पूर्ण, मुद्दा क्र.४ पूर्ण, मुद्दा क्र. ६ मधील पेन्शनसंदर्भात कार्यवाही केली

का? या मुद्यावर, मुद्दा क्र.८ मधील,- माझ्या ग्रॅच्युईटी व प्रॉव्हीडंड फंडाची कार्यवाही केली नाही, याची कारणे- ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ७ व १० च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे. यापैकी मुद्दा क्र. ७ च्या संदर्भातील माहिती बरोबर आहे. परंतु मुद्दा क्र. १० च्या संदर्भात अपिलार्थीस माहिती देताना अपिलार्थीने ही माहिती पुराव्यासह मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या संस्थेत प्राप्त होणाऱ्या सॅलरी ग्रँटचे पुरावे दिले नाहीत आणि असे स्पष्ट केले आहे की, सॅलरी ग्रँट हे शाळेच्या बँक अकाऊंटमध्ये शासनाकडून परस्पर जमा होते. त्यामुळे सॅलरी ग्रँट शाळेच्या बँक अकाऊंटमध्ये सन २००२ नंतर ज्या ज्या वेळी जमा होऊन तिची नोंद झाली त्या सर्व अकाउंटशी संबंधित कागदपत्रांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे प्रथम अर्ज व प्रथम अपील अर्ज करताना आवश्यक ते कोर्ट-फी-स्टॅम्प लावलेले नाहीत, ही अपिलार्थीची चूक आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीस माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी या दोनही अर्जावरील विहित किंमतीच्या कोर्ट स्टॅम्पचा खर्च रु.३०/- इतकी रक्कम शासकीय कोषागारात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जमा करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीपैकी देय माहिती त्यांना देण्यासंदर्भात करावयाची कार्यवाही, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत करुन अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः १८-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सदाविजय आर्य,रा.आंतर भारती संकुल, सानेगुरुजी मार्ग,औराद शहाजानी, ता.निलंगा, जि.लातूर-४१३५२२.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक, मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय,औराद शहाजानी, ता.निलंगा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय,औराद शहाजानी, ता.निलंगा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०७६
निर्णय दिनांकः १८-१२-२००९

१. श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी, : अपिलार्थी
रा.सेलू, जि.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विभागीय समाजकल्याण अधिकारी,
जात पडताळणी अधिकारी,
विभागीय समाजकल्याण कार्यालय,
औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी
(जाप्रप)औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी,
विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,
क्र.१, औरंगाबाद.

त्रयस्थ पक्ष : श्री. लक्ष्मण धोंडिबा अंभुरे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. लक्ष्मण धोंडिबा अंभुरे यांच्यासंदर्भात काही माहिती एकूण ३ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.१०.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी संबंधित संचिकेचा शोध चालू असल्याचे कळविले. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.११.२००८ रोजी सुनावणी घेऊन दि.२७.११.२००८ रोजीच्या निर्णयाव्दारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ शी संबंधित माहिती तीस दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस पूर्ण माहिती न मिळाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती ज्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध होती, ते अभिलेखे न्यायालयीन कामाकरिता न्यायालयाच्या ताब्यात असल्यामुळे ती माहिती अपिलार्थीस त्यावेळी देता आली नाही. तथापि हे अभिलेखे त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती त्यांना दि. १७.०५.२००९ रोजी पुरविली आहे व मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहिती त्यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या

वेळीच अपिलार्थीस हस्तांतरित केली आहे. अशाप्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांनी आता दिली आहे.

त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने भामटा राजपूत या जात प्रमाणपत्राच्या आधारे सेलू नगर परिषदेची निवडणूक लढविली, तथापि हे प्रमाणपत्र अवैध असल्याचे त्यांनी सिध्द केले व त्यांच्या जागेवर त्रयस्थ पक्ष स्वतः निवडून आला, त्यामुळे केवळ त्रयस्थ पक्षास त्रास देण्याच्या उद्देशाने संबंधितांनी त्यांच्या संदर्भात ही माहिती मागविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड करण्यासाठी त्यांची कोणतीही हरकत नाही.

वरील घटनाक्रम, उपस्थितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २५.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या तीन मुद्यांवरील माहितीपैकी एका मुद्यावरील माहिती (मुद्दा क्र.३) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २०.११.२००८ रोजी व मुद्दा क्र. १ व २ च्या संदर्भात दि.१७.०५.२००९ रोजी म्हणजेच, अपिलार्थीने आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केल्यानंतर विनामूल्य पुरविली आहे. ही माहिती अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या वेळी केला, त्यावेळी ती त्यांच्या प्रत्यक्षात ताब्यात नव्हती. न्यायालयाकडून या माहितीशी संबंधित अभिलेखे त्यांच्याकडे परत प्राप्त झाल्यानंतर त्यांनी विनाविलंब अपिलार्थीस ही माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती ही, या प्रकरणी त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीस आता त्यांच्या मूळ अर्जातील पूर्ण माहिती मिळाली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**

**दिनांकः १८-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी, गणपती गल्ली, घडी टॉवरजवळ, सेलू, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, क्र.१, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी (जाप्रप), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२४३
निर्णय दिनांक १८/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.निलेश शांतीलाल खंडेलवाल,<br>रा. जाफ्राबाद, जि. जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>जाफ्राबाद, जि. जालना | | |

**निर्णय**

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २२.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजार गल्ली, मेनरोड, जाफ्राबाद, ता. जाफ्राबाद, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२४४
निर्णय दिनांक १८/१२/२००९

१ श्री.निलेश शांतीलाल खंडेलवाल, : अपिलार्थी
रा. जाफ्राबाद, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
जाफ्राबाद, जि. जालना

**निर्णय**

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २२.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजार गल्ली, मेनरोड, जाफ्राबाद, ता. जाफ्राबाद, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२४५
निर्णय दिनांक १८/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री.निलेश शांतीलाल खंडेलवाल,<br>रा. जाफ्राबाद, जि. जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>जाफ्राबाद, जि. जालना | | |

**निर्णय**

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २२.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१)  अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक :  १८/१२/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१)  श्री.  निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजार गल्ली, मेनरोड, जाफ्राबाद, ता. जाफ्राबाद, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०६६

निर्णय दिनांक १८-१२-२००९

१ श्री. शेषराव गणपतराव जोगदंड, : अपिलार्थी
व्दारा, प्रल्हादराव शिंदे, मारोती मंदीराजवळ, लोकमान्य
नगर, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

प्रत्यक्षात: जन माहिती अधिकारी : विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे त्यांच्या सेवाविषयक बाबीच्या संदर्भात सन १९७० ते २२-०८-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ४८ मुद्दया-व्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदरचा अपील अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे केला होता. त्यांनी अपिलार्थीचा हा अपील अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे ते प्रथम अपिलीय अधिकारी असल्यामुळे पाठविला. तथापि अपील अर्जावर शिक्षण विभागाने नित्याच्या नियमाप्रमाणे कोणतीही सुनावणी न घेता व माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. दीपक वासुदेवराव फुटाणे, वरिष्ठ सहायक यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे रास्त मागणी केली नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली नाही. अपिलार्थीच्या प्रकरणाबाबत त्यांनी

अपिलार्थीस दिनांक ०४-०७-२००९ रोजी कळविले. तसेच शिक्षण उपसंचालकांनी अपिलार्थीस दिनांक ११-१२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे त्यांचे प्रथम अपील निकाली काढल्याचे कळविले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २२-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे विस्तृत प्रमाणात माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या एकूण ४८ मुद्दयापैकी फक्त मुद्दा क्रमांक १ पूर्ण, मुद्दा क्रमांक ४ अंशतः शाळा बंद झालेला दिनांक, मुद्दा क्रमांक ६ अंशतः ३० एप्रिल १९७४ पर्यंत कार्यरत असलेल्या कर्मचा-यांची नावे, हुद्दा, नेमणूक दिनांक, वेतनश्रेणी, वेतन अदा बँक आणि खाते नंबर उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती, मुद्दा क्रमांक ११ मधील शाळेच्या व्यवस्थापनाने शिक्षणाधिकारी / शिक्षण उपसंचालक यांच्याकडे शाळा बंद करण्याबाबत दाखल केलेल्या प्रस्तावाची प्रत, मुद्दा क्रमांक १४ मधील शाळा बंद करण्यास कारणीभूत असलेल्या कर्मचा-यांची नांवे, मुद्दा क्रमांक २३ मधील दिवाळी सुट्टी व उन्हाळी सुट्टी संपल्यानंतर कर्मचा-याला काढून टाकण्यासाठी व्यवस्थापन किती महिन्यानंतर पूर्व सूचना देऊ शकतात, मुद्दा क्रमांक २६ मध्ये जोगदंड यांच्या नियुक्तीचा दिनांक व शाळा बंद केल्याचा दिनांक, मुद्दा क्रमांक ३४ मधील पूर्णतः मुद्दा क्रमांक ३७ मधील जोगदंड यांचे जीपीएफ नंबर व मुद्दा क्रमांक ४०, मुद्दा क्रमांक ४३ मधील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने शिक्षण उपसंचालकांना शाळा बंद करण्याबाबत पाठविलेल्या प्रस्तावाची प्रत, मुद्दा क्रमांक ४७ मधील शिक्षण विभागाने कक्ष अधिकारी यांच्या ०९ मे २००८ रोजीच्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेली कारवाई एवढीच माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. उर्वरित सर्व मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याने, जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय व स्पष्टीकरण अपेक्षित

करणारी आणि मोघम स्वरुपाची असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. सबब जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, परभणी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या या परिच्छेदामध्ये वर नमूद केलेल्या विविध मुद्दयावरील देय माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-०९-२००८ रोजीच्या प्रथम अपिलावर कोणतीही निर्णय न देऊन आपल्या बेजबाबदार कार्यशैलीचे पुरेपूर दर्शन घडविले आहे. संबंधित जन अपिलीय अधिकारी श्री. एम. बी पवार, तत्कालीन शिक्षणाधिकारी यांच्या वर प्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची शिक्षण संचालक, पुणे यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २२-०८-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास तत्कालीन शिक्षणाधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांनी कोणताही प्रतिसाद न देता अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांना आवश्यक असलेली माहिती सार्वजनिक प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी हक्क असतांना देखील हा हक्क शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, परभणी यांच्या कार्यालयाने कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय डावलेला आहे. त्यामुळे या प्रकरणी तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, परभणी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक हे सर्व एकत्रितपणे जबाबदार ठरत आहेत. सबब सचिव (शालेय शिक्षण) यांना यांना, संबधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी सर्व संबंधि त्यांचे सहायक कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. या प्रकरणी जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील सर्व संबंधित सहायक कर्मचारी यांच्यावर यथायोग्य शिस्तभंग कार्यवाही करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद परभणी यांना करण्यात येत आहे.

(या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी वरील प्रमाणे केलेला युक्तिवाद आयोग अमान्य करत आहे. कारण जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेल्या कागदपत्रामध्ये अपिलार्थीस उद्देशून त्यांनी अपिलार्थीस माहितीसाठीच्या मूळ अर्जास अवगत केल्याचे आढळून येत आहे. तसेच अपिलार्थीस माहिती देण्यासाठी मंत्रालयीन कक्ष अधिका-यास त्यांच्या प्रकरणाची सद्यस्थिती अवगत केल्याच्या पत्राची प्रत अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०४-०७-२००९ रोजी पोस्टाने पाठविली आहे. त्यांचा अर्ज त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामधील माहिती दिली असा होत नाही)

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती-तील वर निर्णयामध्ये स्पष्ट केलेली देय माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (शालेय शिक्षण) यांना या प्रकरणाशी संबंधित शिक्षण विभागाचे सर्व संबंधित कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या प्रकरणाशी संबंधित जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील सर्व संबंधित कर्मचा-यांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेषराव गणपतराव जोगदंड, व्दारा, प्रल्हादराव शिंदे, मारोती मंदीराजवळ, लोकमान्य नगर, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटल जवळ, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०६७

निर्णय दिनांक १८-१२-२००९

१ श्री. पठाण सलिम खॉन महेमुद खॉन, : अपिलार्थी
मु. पो. पिशोर (मदिना मस्जिदजवळ), झोपडपट्टी,
तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक ०८-०९-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती न मिळाल्याने आणि त्यांच्या दिनांक १५-१०-२००८ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील शिक्षण विभागाशी संबंधित चित्रकला शिक्षकांच्या संदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे वेगवेगळ्या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७२ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-११-२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २९-११-२००८ रोजी पारीत केले व अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यापूर्वीच जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २४-११-२००८ रोजीच्या पत्राप्रमाणे अपिलार्थीस माहिती पोष्टाने पाठवली. सदर माहितीचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी पोस्टात दिनांक १५-०१-२००९ रोजी प्रत्यक्षात सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती त्यांना दिनांक १५-०१-२००९ रोजी त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर विनामूल्य व पोस्टाने पाठविली आहे व तसेच अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलासंदर्भात व्यक्त केलेले अभिप्राय हे वस्तुस्थितीशी विसंगत

असल्याचे आढळल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पठाण सलिम खॉन महेमुद खॉन, मु. पो. पिशोर (मदिना मस्जिदजवळ), झ ोपडपट्टी, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०६८

निर्णय दिनांक १८-१२-२००९

१ श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, : अपिलार्थी
रहेमान मंजील, घर क्रमांक ९-६-२२०, उमर कॉलनी
मस्जीद समोर, देगलूर रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
भोकर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : रजा व प्रशिक्षण राखीव उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. के. एम. दिक्षीत

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ४ व ७ शी संबंधित माहिती अर्धवट व चुकीची दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. के. एम. दिक्षीत, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक यांच्यासंदर्भात दिनांक ०१-०१-२००७ ते ३१-०७-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील ०८-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-१०-२००८ रोजी आपले आदेश पारीत करुन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती उपलब्ध असल्याबाबत कळवावे आणि अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पत्र प्राप्त झाल्यानंतर आठ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती विनामूल्य हस्तगत करावी. यानंतर अपिलार्थीस दिनांक २०-११-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी व्यक्तिशः माहिती दिली. तथापि प्राप्त माहिती ही अपूर्ण

व अर्धवट असल्याचे वाटल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष हजर आणि जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात प्राप्त झालेली माहिती ही खोटी व अर्धवट आहे. यासंदर्भात स्पष्टीकरण देतांना त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २०-११-२००८ रोजी माहिती पुरवितांना या पत्रामध्ये सोबत प्रत जोडली आहे असे म्हटले आहे तथापि उपविभागीय कार्यालयाने श्री. दिक्षीत यांच्या त्यांनी सादर केलेल्या प्रवास भत्याच्या प्रतीचा, त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये समावेश नाही. तसेच त्यांना अद्यापपावेतो जानेवारी २००७, फेब्रुवारी २००७ व मार्च, जून, जलै २००८ या कालावधीशी संबंधित त्रयस्थ पक्षाच्या दैनंदिनीच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या नाहीत. या कालावधीशी संबंधित प्रवासभत्ता बिले श्री. दिक्षीत यांना सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर यांच्याकडून अदा करण्यात आलेली आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये प्रवास दैनंदिनी शिवाय प्रवास भत्त्याची देयके अदा केली जात नाहीत. त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे परंतु या प्रकरणी त्यांनी ती अपिलार्थीस देण्यास टाळाटाळ केली आहे. आपल्या युक्तिवादाच्या शेवटी अद्यापपावेतो त्यांना मुद्दा क्रमांक ३ व ८ मधील अद्यापपर्यंत प्राप्त व्हावयाची माहिती ही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्वरित आणि विनामूल्य प्राप्त व्हावी व जन माहिती अधिकारी यांच्यावर कलम २० प्रमाणे कारवाई आदेशित व्हावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी प्रथमतः दिनांक ०८-०९-२००८ रोजी व तदनंतर दिनांक २०-११-२००८ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेल्या व त्यांना देण्यात आलेल्या माहितीच्या प्रतीबाबत जन माहिती अधिकारी यांना आयोगाने विचारणा केली असता, अपिलार्थीस त्यासंदर्भातील माहिती सात दिवसाच्या आत संबंधित शाखेकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस देण्यात येईल, असे त्यांनी आयोगास आश्वासित केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण आठ मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. तथापि मुद्दा क्रमांक आठ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्थापत्य अभियांत्रिकी पदाची मोघम स्वरुपात माहिती विचारली आहे आणि याच मुद्दयामध्ये स्थापत्य अभियांत्रिकी पदाच्या संदर्भात प्रतिनियुक्त्या रद्द न करण्याचे कारण त्यांना विचारले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कृतीबाबतची कारणे विचारणे हे अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक आठ व्दारे मागणी केलेल्या माहितीमधील या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. तथापि उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती ही, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस, ती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने, देय होत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी ज्या त्रयस्थ पक्षाविषयी माहिती मागितली आहे त्या माहितीचे स्वरुप पाहता, ती सार्वजनिक स्वरुपाची माहिती असल्याने, ती उघड करण्यास जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय असणार नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस आतापर्यंत पुरविलेल्या माहितीपैकी अद्यापही अपिलार्थीस उपविभागाच्या पत्राची प्रत आणि त्रयस्थ पक्षाची जानेवारी २००७ ते जुलै २००८ या कालावधीतील पाच महिन्याच्या प्रवास दैनंदिनीच्या प्रती ही माहिती जन माहिती अधिकारी

यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्षास प्रवासभत्ता देयके, त्यांच्या पाच महिन्याच्या दैनंदिनी अहवालशिवाय त्यांना अदा केली आहेत, असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी त्रयस्थ पक्षाच्या जानेवारी २००७ ते ३० जुलै २००८ या कालावधीतील अपिलार्थीने मागणी केलेल्या दैर्नंदिनीच्या प्रती जर त्यांच्या कार्यालयात मंजूर देयकाबरोबर जोडल्या नसतील तर याच कालावधीच्या मंजूर प्रवासभत्याच्या देयकाच्या सत्यप्रती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्रयस्थ पक्षाच्या प्रवास दैनदिंनीशिवाय संबंधीत प्रवास देयके, भोकर सार्वजनिक बांधकाम विभागातून कशी अदा करण्यात आली या मुद्दयावर त्यांनी त्यांच्या स्तरावरुन चौकशी करुन आवश्यक ती कार्यवाही त्यांच्या स्तरावर करावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ०८-०९-०८ व दि.२०-११-०८ अशा दोन टप्प्यामध्ये माहिती दिली आहे. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर, त्यांनी आयोगाकडे, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिल्याचा योग्य तो पुरावा आयोगास सादर केला आहे. यावरुन आणि तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेण्यात आल्यानंतरही अपिलार्थीस अर्धवट माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व संबंधित सहायक कर्मचारी, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी समजावे अशी

तरतूद आहे अशा सर्वांवर, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मधील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, रहेमान मंजील, घर क्रमांक ९-६-२२०, उमर कॉलनी मस्जीद समोर, देगलूर रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा रजा व प्रशिक्षण राखीव उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०६९

निर्णय दिनांक १८-१२-२००९

१ श्री. मोरे कल्याण गोरख, : अपिलार्थी
मु.पो. सारोळा (मांडवा), तालुका वाशी,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी, भूम, तालुका भूम,
जिल्हा उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०७-२००९ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, तहसील कार्यालय, कळंब येथे त्यांनी पाच वर्षे काम करुनही त्याचा मोबदला न देऊन व त्यांना कामावर न घेतल्यामुळे त्यांनी

विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती या मुद्दयासमोर " तरी मला पाच वर्षे कामाचा मोबदला द्यावा व नोकरी द्यावी " असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे " तहसील कार्यालय कळंब येथे पाच वर्षे काम केल्याबाबत " अशी माहिती मागितली होती. या अर्जात अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेला माहितीचा विषय या समोर इं. गा. यो. व सं. गा. यो. कळंब एवढाच विषय दिलेला आहे.

अपिलार्थीने सदरचा अर्ज जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना उद्देशून केला होता. त्यांनी अपिलार्थीचा हा अर्ज दिनांक १०-१२-२००७ रोजीच्या पत्राद्वारे तहसीलदार, कळंब यांच्याकडे पाठविला आणि या पत्राची प्रत अपिलार्थीस अग्रेषित केली.

अपिलार्थीच्या या अर्जास तहसीलदार, कळंब यांनी त्यांच्या दिनांक ०३-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस कोणती माहिती हवी आहे याचा त्यांना अर्थबोध होत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. परंतु या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार उपविभागीय अधिकारी, भूम यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर उपविभागीय अधिकारी, भूम यांनी दिनांक ०३-०३-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले आणि अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु अपिलार्थीस अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी तहसील, कळंब येथे पाच वर्षे काम केले असूनही त्यांना तहसीलदार यांनी मोबदला दिला नाही आणि त्यांना कामावरही घेतले नाही. तसेच त्यांची हंगामी कामगार म्हणून नियुक्ती केलेल्या आदेशाची मूळ प्रत त्यांनी तहसील कार्यालयास सादर केल्याचे सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस वेळोवेळी त्यांना तहसील कळंब कार्यालयात हंगामी कामगार म्हणून काम करण्याची परवानगी दिलेल्या आदेशाची प्रत सादर करण्याचे अपिलार्थीस कळविले होते. परंतु त्यांनी आदेशाची प्रत सादर न केल्यामुळे अपिलार्थीचे प्रकरण दिनांक २९-०४-२००८ रोजी निकाली काढले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती मागितली होती त्या माहितीवरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती अपेक्षित आहे याचा बोध होत नाही. अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीने तहसील कळंब यांच्याकडे पूर्वी कधी तरी हंगामी कामगार म्हणून काम केले असावे आणि त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला तहसील कळंब यांनी दिला नसावा असे दिसून येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जाचे आणि माहिती अधिका-याकडे माहितीसाठीच्या दिनांक ०३-१२-२००७ रोजीच्या केलेल्या प्रथम अर्जाचे

अवलोकन केले असता, अपिलार्थीस तहसीलदार, कळंब यांच्याकडून त्यांच्या कथित थकीत वेतनाची थकबाकी देण्याचे आणि अपिलार्थीस कामावर घेण्याचे आदेश आयोगाकडून पारीत होणे अपेक्षित असल्याचे दिसून येत आहे. तथापि अशा प्रकारची कार्यवाही आयोगाच्या कक्षेच्या बाहेरची असल्यामुळे अपिलार्थीची ही विनंती आयोग अमान्य करत आहे. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोरे कल्याण गोरख, मु.पो. सारोळा (मांडवा), तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०६१

निर्णय दिनांक १८.१२.२००९

१ श्री. मोहंमद समीउल्ला खान अहेमद खान पठाण, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
कार्यालय, अधीक्षक अभियंता,
विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प
मंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड हे कालबध्द पदोन्नतीसाठी गोपनीय अहवाल मंडळ कार्यालयास पाठविण्यास अक्षम्य दूर्लक्ष करुन टाळाटाळ करुन अपीलीय आदेशातील निर्णयाची अमंलबजावणी करीत नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये कार्यालय, अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या "कालबध्द पदोन्नती, घरबांधणी / खरेदी प्रकरणात अन्याय झाल्यामुळे मा. न्यायालयातून शासनास दाद मागण्यासाठी" या विषयावर एकूण ०५ मुद्यांद्वारे काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अपील अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन आवश्यक असलेली माहिती अपिलार्थीस पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०८.०९.२००८ रोजी अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७.१०.२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करुन, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या कालबध्द पदोन्नतीबाबत त्यांचे गोपनीय अहवाल मागवून घेण्याचे व प्रकरण निकाली काढण्याचे आणि या प्रकरणाची वेळेत कार्यवाही न केल्यामुळे संबंधितांचा खुलासा मागविण्याचे व खुलासा समाधानकारक आढळून न आल्यास शिस्तभंगविषयक कार्यवाहीचा प्रस्ताव करावा, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि या निर्णयाप्रमाणे कार्यवाही न झाल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, त्यांनी वरील अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त

झाली आहे. तथापि ही माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना व्यक्तिशः न देता ती स्पीड पोस्टाने पाठविली. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे अद्यापपावेतो कार्यवाही न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, अपिलार्थीची कालबध्द पदोन्नती आणि घरबांधणी अग्रीम मंजूरी अशी दोन प्रकरणे त्यांच्या कार्यालयात प्रलंबित होती. या दोनही प्रकरणांचा निपटारा त्यांनी वेळेत केला असून आता अपिलार्थीस कोणतीही माहिती द्यावयाची राहिलेली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील हे अधीक्षक अभियंता यांच्या दिनांक १७.१०.२००८ रोजी पारित केलेल्या निर्णयाचे अनुपालन न झाल्यामुळे केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांचे दिनांक १७.१०.२००८ रोजीचे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर आदेश पाहता, हे आदेश पूर्णतः प्रशासकीय स्वरुपाचे असे आहेत असे आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांनी अर्जदाराच्या प्रथम अपिलावर आदेश देताना अर्जदाराने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अर्जदारास दिली गेली आहे किंवा कसे, हे तपासणे व त्यानुसार आपला निर्णय देणे, अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अशा प्रकारचे प्रशासकीय निर्णय जन अपिलीय अधिकाऱ्यांनी देणे मूळात अभिप्रेत नसल्यामुळे, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७.१०.२००८ रोजीचा दिलेला निर्णय, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या व्याप्ती बाहेरचा असल्यामुळे, अवैध ठरत आहे. आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे, परंतु ती अपिलार्थीने व्यक्तिशः मागितली असताना जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ती स्पीड पोस्टाने पाठविल्याबद्दल अपिलार्थीची हरकत असल्याचे त्यांच्या

युक्तिवादावरुन जाणवते. या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक १३.०८.२००८ रोजी माहितीसाठीचा प्रथम अर्ज केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक ०४.०९. २००८ रोजी अपिलार्थीस स्पीड पोस्टाने माहिती पाठविली व ती अपिलार्थीस प्राप्त झाली आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे कोणत्याही टप्प्यावर नाकारलेले नाही. उलट अपिलार्थीस स्पीड पोस्टाने माहिती देऊन त्यांनी अपिलार्थीच्या वेळेची बचत केली आहे. तसेच अपिलार्थीस या प्रकरणी आयोगाकडून ज्या प्रकारचे प्रशासकीय स्वरुपाचे आदेश पारित होणे अपेक्षित आहेत ते पारित करणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार आयोगाच्या कार्यकक्षेच्या व्याप्ती बाहेरचे आहे. ही वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोहंमद समीउल्ला खान अहेमद खान पठाण, द्वारा- सादीक खान जुमा खान पठाण, (फय्याज भाई किराणा दुकानासमोर), बिलाल मस्जिदच्या पुढे, मुजफ्फर नगर, हडको, एन-१३ च्या बाजूस, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०६५

निर्णय दिनांक १८.१२.२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अर्जुन साहेबराव नवपुते,<br>मु.पो. घारदोंन, ता. जि. औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग,<br>औरंगाबाद, कार्यालय गोदावरी सिंचन<br>भवन, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता व प्रशासक,<br>लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेतांना सुनावणीच्या नियमाचा भंग केला आणि जन

माहिती अधिकारी यांची बाजू घेऊन त्यांच्या बाजुने निकाल दिला. तसेच त्यांना ३० दिवसाच्या आत माहिती देणे आवश्यक असताना देखिल त्यांना माहितीबाबत काहीही कळविले नाही. त्यामुळे त्यांचेवर अन्याय झाल्याचे वाटल्यावरुन त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या दिनांक १९.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००५ ते दिनांक १९.०९.२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ९ मुद्याद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २२.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३२०० /- इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थीस माहितीपोटी आवश्यक असलेल्या शुल्काचा संपूर्ण तपशील दिला आहे. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २०.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३.१२.२००८ रोजी अपिलार्थीच्या उपस्थितीत सुनावणी घेऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे आदेश दिनांक १०.१२.२००८ रोजी पारित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३२००/- इतके त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक २२.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम कळविले होते. अपिलार्थीस पत्र पाठविल्याचा सबळ पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे आजही तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर मागणी केलेल्या माहितीच्या अर्जाच्या संबंधित पुढील सर्व घडामोडी ज्ञात होण्याकरिता अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याशी स्वतः होऊन संपर्क साधणे अपेक्षित आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असली तरीही त्यांनी माहितीपोटीच्या शुल्काकरिता किंवा आवश्यक त्या माहितीकरिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी कधी संपर्क साधला याबाबत कोणताही सबळ पुरावा अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. उलट जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २२.०९.२००८ रोजी, म्हणजे त्यांनी माहितीसाठीचा प्रथम अर्ज केल्यानंतर ३ दिवसात अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क आवश्यक त्या तपशीलासह अपिलार्थीस कळविले आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये या शुल्काचा भरणा करण्याची अपिलार्थीने कोणत्याही टप्प्यावर तयारी दर्शविलेली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल अपिलार्थीच्या

प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३२०० /- इतके भरणा केल्यानंतर माहिती देण्याचे आदेशित केले आणि जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयामध्ये अपिलार्थीने शुल्क भरण्याचे सुनावणीच्या वेळी कबूल केले होते असे आढळून येत आहे. परंतु अशाप्रकारच्या आवश्यक त्या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कधीही केलेला नाही अथवा याबाबतची तयारीही दर्शविली नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कधीही नाकारलेले नाही. आजही अपिलार्थी त्यांना या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जातील संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे रु. ३२०० /- इतक्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करुन प्राप्त करुन घेऊ शकतील. हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अर्जुन साहेबराव नवपुते, मु.पो. घारदोंन, ता. जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०७१

निर्णय दिनांक १८.१२.२००९

१ श्री. शिवाजी भगवानराव देसाई, : अपिलार्थी
रा. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उपायुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त
कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नगर रचनाकार, नगर परिषद, बीड
जन अपिलीय अधिकारी : मुख्याधिकारी, नगरपरिषद, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५.०९.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिली नसल्याने व त्यांनी या प्रकरणी केलेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे असे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेश देण्याची व त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई आदेशित करण्याची विनंती आयोगास केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, बीड शहरातील सुभाष रोडवरील सारडा संकुलाच्या बांधकामाबाबत एकूण सात मुद्याद्वारे काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०४.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने ज्या मिळक त क्रमांकाच्या नोंदी विषयी माहिती मागितली आहे त्या नोंदीवर सारडा संकुलाच्या मालकीची नोंद नाही, असे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २३.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, ते व या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड हे या पदावर नुकतेच बदलून आले असून त्यांना या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या अर्जाची कोणतीही माहिती अद्यापपावेतो नव्हती. तथापि आयोगाकडून द्वितीय अपील अर्जाच्या सुनावणीचे पत्र त्यांना ज्यावेळी प्राप्त झाले त्यावेळी त्यांना प्रथमतः अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची कल्पना आली. आज रोजी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०५.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी

केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार असून, अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः हजर झाल्यास ते अपिलार्थीस ही माहिती सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५ मधील 'सारडा संकुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्याची आपल्या कार्यालयामार्फत तपासणी झाली आहे काय? ' या मुद्यावर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देय असणार नाही. कारण अशाप्रकारे अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलचे अथवा निर्णयाबद्दलचे स्पष्टीकरण वा अभिप्राय मागणे व अर्जदाराच्या विनंतीनुसार जन माहिती अधिकारी यांनी तसे अभिप्राय अर्जदारास देणे अशाप्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये समाविष्ट नाही. याचबरोबर या मुद्याचा समावेश अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ मध्ये देखिल आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहिती देय असणार नाही. उर्वरित ६ मुद्यावर अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीने आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून ही माहिती हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत पुर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिवाजी भगवानराव देसाई, रा.कांचन लक्ष्मी निवास, चंदनशिव यांची बिल्डींग, मित्रनगर, बीड, ता. जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०७२

निर्णय दिनांक १८.१२.२००९

१ श्री. राधेशाम मदनलाल लड्डा, : अपिलार्थी
रा. टाकरवण, ता. माजलगांव, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक, ग्रामपंचायत, टाकरवण,
ता. माजलगांव, जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
माजलगांव, जि. बीड

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव, जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली असल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अपिलार्थीने खरेदी खत क्रमांक १०४७ / ८४ अन्वये खरेदी केलेल्या घराच्या मिळकतीवर नाव लावण्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ११.०८.२००८ रोजी अर्ज केला होता, त्यावर जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली अशी माहिती व्यक्तिशः मागविली होती. अपिलार्थीच्या या अपील अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या सदर मिळकतीवर त्यांचे नाव ज्या त्रुटींमुळे केले जाणार नाही, त्या त्रुटी कळविल्या. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १२.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि हा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त न झाल्यामुळे, अपिलार्थीच्या या अपील अर्जावर त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त होऊ शकला नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली. वास्तविक पाहता, त्यांनी आवश्यक ती सर्व कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध करुन दिली असताना देखिल संबंधित मिळकतीवर त्यांचे नाव जन माहिती अधिकारी हे लावत नाहीत. ही मिळकत त्यांनी खरेदी खत क्रमांक १०४७ / ८४ अन्वये खरेदी केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, मूळात या मिळकतीची खरेदी १९८४ साली झाली आहे. या खरेदीस दोन वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने व या मिळकतीचे मूळ मालक नंदलाल छगनलाल पारीख यांच्या नावाने या मिळकतीच्या प्रॉपर्टी कार्डावर फेरफार नोंदविलेला नाही व फेरफार न होताच श्री बंसिलाल व नथमल यांनी नियमबाह्य खरेदी केली असल्यामुळे, अपिलार्थीची विनंती त्यांना मान्य करता येत नाही व तसे त्यांनी अपिलार्थीस दिनांक १६.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस १९८४ साली खरेदी केलेल्या मिळकतीवर त्यांचे नाव लावणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे. तथापि त्यांची ही विनंती जन माहिती अधिकारी हे काही कारणास्तव मान्य करु शकत नाहीत. हे कारण पूर्णतः प्रशासकीय व अर्धन्यायिक स्वरुपाचे आहे. अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या प्रकरणाच्या संदर्भात इतर प्राधिकरणाशी कोणता पत्रव्यवहार केला आहे किंवा कसे याची आयोगाने विचारणा केली असता, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारचा कोणताही पत्रव्यवहार त्यांनी इतर प्राधिकरणाशी केलेला नाही, असे आयोगास अवगत केले. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी दिनांक १२.११.२००८ रोजी दिलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरून अपिलार्थीच्या अर्जावर त्यांनी अपिलार्थीच्या विनंतीप्रमाणे कोणतीही कार्यवाही केली नाही, ही माहिती आता उघड होत आहे. अपिलार्थीस अपेक्षित असल्याप्रमाणे संदर्भीय मिळकतीवर अपिलार्थीचे नाव लावण्याचे आदेश देण्याचे अधिकार आयोगाचे नाहीत व तसेच अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जावरील त्यांच्या विनंतीप्रमाणे कार्यवाही करता येणे शक्य नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. या सर्व बाबी पाहता,

अपिलार्थीस आता आवश्यक माहिती प्राप्त झाली असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राधेशाम मदनलाल लड्डा, मु.पो. टाकरवण, ता. माजलगांव, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, टाकरवण, ता. माजलगांव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २४६/०९ , २४७/०९, २४८/०९ व २४९/०९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२४६,२४७,२४८ व २४९

निर्णय दिनांक १९-१२-२००९

१ श्री.वसंत संपतराव मुंडे, रा.परळी, जि.बीड. : अपिलार्थी

**विरुध्द**

**<u>अपील क्र.२४६/०९:</u>**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,परभणी | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड. | :प्रतिवादी |
| विद्यमान : जन माहिती अधिकारी:<br>उप कार्यकारी अभियंता,<br>सा.बां.वि.,परभणी | विद्यमानः जन अपिलीय अधिकारीः<br>कार्यकारी अभियंता,सा.बां.वि.,परभणी | |

**अपील क्र.२४७/०९:**

| | |
|---|---|
| २ जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड |
| विद्यमानः जन माहिती अधिकारी:<br>उप कार्यकारी अभियंता,<br>सा.बां.वि.,हिंगोली | विद्यमानः जन अपिलीय अधिकारीः<br>कार्यकारी अभियंता,सा.बां.वि.,हिंगोली |

**अपील क्र.२४८/०९:**

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>विशेष प्रकल्प विभाग,नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>विशेष प्रकल्प मंडळ,औरंगाबाद |

**अपील क्र.२४९/०९:**

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>कृषि विद्यापीठ, परभणी | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कुलगुरु, कृषि विद्यापीठ, परभणी |
| विद्यमानः जन माहिती अधिकारी:<br>उपअभियंता, मराठवाडा कृषि<br>विद्यापीठ,परभणी | विद्यमानः जन अपिलीय अधिकारीः<br>विद्यापीठ अभियंता, मराठवाडा कृषि<br>विद्यापीठ, परभणी |

# निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०१.२००९ रोजी दाखल केलेले अपील क्र. २४६/०९ व दि. ०७.०१.२००९ रोजी दाखल केलेली तीन अपिले क्र २४७/०९, २४८/०९ व २४९/०९, अशी एकूण चार स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या चारही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने दि. ३०.०८.२००८ या एकाच दिवशी विविध सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये त्रयस्थ पक्ष श्री. जी.एन.तापडीया ठेकेदार, मे. पल्लवी कन्स्ट्रक्शन, मे.शक्ती कन्स्ट्रक्शन, मे.विश्वशक्ती कन्स्ट्रक्शन यांनी त्यांच्याकडे दि. ०१.०१.२००६ ते ३०.०६.२००८ या कालावधीमध्ये केलेल्या डांबरी कामाच्यासाठी वापरण्यात आलेल्या डांबरी गेट पास व मोजमापपुस्तिकेच्या प्रमाणित सत्यप्रती, ही माहिती टपालाद्वारे मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली, कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग,नांदेड व कृषि विद्यापीठ, परभणी यांनी अनुक्रमे दि. २८.११.२००८, २६.१०.२००८ व २०.१०.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने या सार्वजनिक प्राधिकरणांच्या प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे एकाच दिनांकाची - दि.११.१०.२००८ रोजीची चार स्वतंत्र प्रथम अपिले सादर केली. यापैकी अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, औरंगाबाद यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीचे माहिती अधिकाऱ्यास दि. २६.१०.२००८ रोजी दिलेले पत्र त्यांनी अधीक्षक अभियंत्यास सादर केल्याने अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प विभाग,औरंगाबाद यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील विनादिनांकाच्या आदेशाने निकाली काढले. सुनावणीच्या वेळी या प्रकरणी अपिलार्थीने अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प

विभाग,औरंगाबाद यांच्याकडे जादा माहितीची मागणी केली होती व ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस स्वतंत्रपणे पुरवावी असे त्यांनी आदेश दिले होते. परंतु अशाप्रकारची अतिरिक्त माहिती अपिलार्थीस कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, नांदेड यांच्याकडून प्राप्त न झाल्याने आणि उर्वरित प्रकरणी त्यांना संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे चारही स्वतंत्र द्वितीय अपिले राज्य माहिती आयोगाकडे सादर केली असल्याचे दिसून येत आहे.

या चार प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दि. १९.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व या चार प्रकरणांपैकी अपील क्र. २४६/०९, २४७/०९, २४९/०९ शी संबंधित जन अपिलीय अधिकारी, अपील क्र.२४८/०९ शी संबंधित अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि अपील क्र. २४८/०९ व २४९/०९ शी संबंधित जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या अपील क्र. २४८/०९ च्या संदर्भात असा युक्तिवाद केला की, त्यांनी अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, औरंगाबाद यांच्याकडे दि. १८.११.२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अतिरिक्त माहिती मागितली असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी ती दिली नसल्याने त्यांनी आयोगाकडे अपील सादर केले असल्याचे व उर्वरित तीनही जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नसल्याचे आयोगास अवगत केले. या प्रकरणी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी ते एका महिन्याच्या आत प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय देतील, असे आयोगास आश्वासित केले.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या

अपील क्र. २४८/०९ च्या संदर्भात मूळात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेले प्रथम अपील मागे घेतले असल्याने या अपिलावर आता आयोगाने सुनावणी घेणे तथ्यहीन होईल. तसेच अपिलार्थीस जी माहिती त्यांच्या मूळ अर्जाद्वारे अपेक्षित आहे, त्याच माहितीसंदर्भात त्यांनी, ती माहिती त्यांना मान्य नसेल तर, प्रथम अपील व प्रथम अपिलाचा निर्णय मान्य नसल्यास द्वितीय अपिल करणे त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अनिवार्य आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीकरिता वेगळयाने माहितीसाठीचा अर्ज करण्याचे टाळले असल्याचे येथे सप्रमाण सिध्द होत आहे. या सर्व कारणास्तव अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्र. २४८/०९ फेटाळण्यात येत आहे.

उर्वरित तीन अपिले क्र. २४६/०९, २४७/०९ व २४९/०९ च्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ११.१०.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथम सुनावणी घेणे या टप्प्यावर आयोगास इष्ट वाटते. सबब अपील क्र.२४६/०९, २४७/०९ व २४९/०९ शी संबंधित सर्व जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जासंदर्भात दि. ११.१०.२००८ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयांनी अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या उपरोक्त चारही अपिलासंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील क्र.२४८/०९ फेटाळण्यात येत आहे.

२) अपील क्र.२४६/०९, २४७/०९ व २४९/०७ निकाली काढण्यात येत आहेत.

३) अपील क्र.२४६/०९, २४७/०९ व २४९/०७ च्या संदर्भात, संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ११.१०.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १९-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.वसंत संपतराव मुंडे, मार्केट, गौरीकुंज, परळी, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांना

या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९. जन अपिलीय अधिकारी तथा विद्यापीठ अभियंता, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१०. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२५१
निर्णय दिनांक १९/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. आबासाहेब बाबाराव कड,<br>रा.परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता (बांधकाम),<br>जि.प. उपविभाग, परभणी | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (बांधकाम),<br>जिल्हा परिषद, परभणी | | |

**निर्णय**

श्री. आबासाहेब बाबाराव कड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.०७.२००९ रोजी केलेले दि. १७.०७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २०.१२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.११.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. आबासाहेब बाबाराव कड, संपादक, साप्ताहिक इंद्रजीत, मुन्सिपल कॉलनी, बियाणे महामंडळ रोड, परभणी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२५२
निर्णय दिनांक १९/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शंकर गुरुलिंगप्पा तिळकरी,<br>रा.परळी वैजनाथ, जि. बीड. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी,<br>शिक्षणाधिकारी (मा.) कार्यालय,<br>जि.प. बीड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी,<br>शिक्षणाधिकारी (मा.) कार्यालय,<br>जि.प.बीड | | |

**निर्णय**

श्री. शंकर गुरुलिंगप्पा तिळकरी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०९.०७.२००९ रोजी केलेले दि. १३.०७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०२.१२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.३०.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. शंकर गुरुलिंगप्पा तिळकरी, पेठ गल्ली, परळी वैजनाथ, ता. परळी वैजनाथ, जि. बीड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२५३
निर्णय दिनांक १९/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विठ्ठल नागा वडपत्रे,<br>रा.नायगांव बाजार, जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, नायगांव, जि. नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी,<br>तहसील कार्यालय, नायगांव, जि.नांदेड | | |

**निर्णय**

श्री. विठ्ठल नागा वडपत्रे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०१.०७.२००९ रोजी केलेले दि. ०६.०७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १९.१०.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०९.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ५७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. विठ्ठल नागा वडपत्रे (पत्रकार), मु.पो. नायगांव बाजार, जि.नांदेड ४३१ ७०९.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२५४
निर्णय दिनांक १९/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. कैलास भिमराव रगडे,<br>रा. म्हसला, ता.बदनापूर, जि. जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती, बदनापूर, जि. जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, जालना | | |

**निर्णय**

श्री. कैलास भिमराव रगडे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०८.०७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०७.०१.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.२२.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १९६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. कैलास भिमराव रगडे, रा. म्हसला, पो. खामगांव, ता. बदनापूर, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२५५
निर्णय दिनांक १९/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. संतोष यल्हाजी बांगर,<br>रा.हिंगोली | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपसंचालक,<br>शिक्षण विभाग, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक,<br>शिक्षण विभाग, औरंगाबाद | | |

**निर्णय**

श्री. संतोष यल्हाजी बांगर यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०२.०६.२००९ रोजी केलेले दि. ०५.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १२.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.१८.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १९७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. संतोष यल्हाजी बांगर, मंगळवारा बाजार, हिंगोली, ता.जि. हिंगोली.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२५६
निर्णय दिनांक १९/१२/२००९

१ श्री. महंमद खलीलोद्दीन महंमद जैनोद्दीन, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपशिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

श्री. महंमद खलीलोद्दीन महंमद जैनोद्दीन यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २५.०५.२००९ रोजी केलेले दि. ०१.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २१.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.१४.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १०७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. महंमद खलीलोद्दीन महंमद जैनोद्दीन, रा. नुरेइलाही मस्जीद जवळ, रहेमतनगर, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२५७
निर्णय दिनांक १९/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. दिपक दिगंबरराव डावकर,<br>रा. भिवडी बोडखा, ता.अंबड, जि. जालना. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय, अंबड, जि. जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय कृषि अधिकारी,<br>उपविभागीय कृषि कार्यालय, परतूर, जि. जालना. | | |

**निर्णय**

श्री. दिपक दिगंबरराव डावकर यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २४.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०८.१०.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.१८.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ९६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १९/१२/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. दिपक दिगंबरराव डावकर, रा. भिवडी बोडखा, ता.अंबड, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३०३

निर्णय दिनांक १९/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री.गुलाम फैय्याज सिद्दीकी,<br>रा. औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासक,<br>तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था<br>मर्यादित, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद | : | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.०२.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक ०४.१२.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे प्रशासक, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या., औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमात विहीत केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०७.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी दि. १७.०१.२००९ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस हवी

असलेली माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देण्याबाबत प्रशासक, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या., औरंगाबाद यांना आदेशित केले. यानंतरही हवी असलेली माहिती उपलब्ध न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी पतसंस्थेचे प्रशासक व उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद हे उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित पतसंस्थेचे प्रशासक व उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. त्यामुळे उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांचे आदेश क्र. ताउनि/प्रशा-१/मा.अ.अ./६२५/२००९, दि. १७.०१.२००९ हे रद्द करण्यात येत आहेत. तथापि अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे  व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१)  अपील क्र. ३०३ /०९ खारीज  करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक :      १९-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गुलाम फैय्याज सिध्दीकी, घर नं. २-११-४५, पंच कुवा, किले अर्क, औरंगाबाद, ता.जि. औरंगाबाद

२. प्रशासक, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, कबाडीपुरा, औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३९३

निर्णय दिनांक १९-१२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शिवाजी बळीराम राऊत,<br>मु. पो. नाळवंडी, तालुका जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा अधीक्षक,<br>सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सहायक धर्मादाय आयुक्त, बीड | : | प्रतिवादी |

त्रयस्थ पक्ष : अध्यक्ष/सचिव संगमेश्वर शिक्षण संस्था, नाळवंडी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०२-२००८ रोजी माहितीसाठीचा अर्ज केला असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ३१-०३-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांच्याकडे प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०६-२००८ रोजी निर्णय देऊन त्या

निर्णयाची समज अपिलार्थीला दिनांक १९-०७-२००८ रोजी दिली व अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. त्यामुळे त्यांनी व्यथित होऊन विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अपील अर्जाद्वारे आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची विनंती आयोगास केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, बीड यांच्याकडे त्रयस्थ पक्ष संगमेश्वर शिक्षण संस्था, नाळवंडी, तालुका जिल्हा बीड नोंदणी क्रमांक एफ. ९२ यांच्या संदर्भात सन २००० ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीमध्ये संबंधित संस्थेच्या सर्वसाधारण सभेच्या सन २००० ते २००८ पर्यंतच्या नोटीस पुस्तकाच्या व ठराव पुस्तकाच्या सत्य प्रती, सन २००४ ते २००६ या वर्षाच्या कार्यकारी मंडळाच्या नोटिस पुस्तकाच्या व ठराव पुस्तकाच्या सत्यप्रती, दिनांक १७-१२-२००६ रोजीच्या कार्यकारी मंडळाच्या सभेमध्ये करण्यात आलेल्या आजीव सभासद, सामान्य सभासद व कर्मचारी सभासद यांचे सभासद होण्यासाठी आलेल्या अर्जाच्या, सभासद फीसपोटी देण्यात आलेल्या पावती पुस्तकाच्या सत्य प्रती व संस्थेचे कॅशबुक खतावणी पुस्तक, देणगी पावती पुस्तक, देणगी रजिस्टर, सभासद रजिस्टर व सभासद पावती पुस्तक व न्यासाचे बँक पासबुक या सर्व कागदपत्राच्या सन २००४ ते २००८ या कालावधीतील सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शिघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती संस्थेच्या सचिवाच्या कार्यालयातून परस्पर घेण्याचे सुचविले. यानंतर अपिलार्थीस संबंधित संस्थेच्या सचिवांकडून

माहिती प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी त्यांच्या दिनांक १५-०३-२००८ रोजीच्या पत्राद्वारे संस्थेस अवगत केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस संस्थेकडून व जन माहिती अधिकाऱ्यांकडून माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांच्या निर्णयातील परिणामक्षम आदेश (ऑपरेटीव्ह ऑर्डर) फक्त अपिलार्थीस कळविला. त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांचे प्रथम अपील फेटाळल्याचे कळविले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. सी. पी. कुलकर्णी, प्रभारी निरीक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, बीड हे आयोगासमोर उपस्थित आहेत. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर हजर राहण्याच्या सूचना दिल्यावरुन ते आयोगासमोर उपस्थित राहिले आहेत. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीची फक्त काही कागदपत्रे त्यांच्या प्रतिनिधीसोबत देऊन त्यांना आयोगासमोर सुनावणीसाठी पाठविले आहे. श्री. सी. पी. कुलकर्णी यांच्याकडील कागदपत्राचे आयोगाने अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्रतिनिधीला अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेला दिनांक ०३-११-२००७ रोजीचा अर्ज व या संदर्भात त्यांनी आयोगाकडे केलेला पत्रव्यवहार यांच्या प्रती दिलेल्या आहेत. या कागदपत्राचा विचाराधीन अपील प्रकरणाशी काहीही संबंध नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. याउपर जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीला या प्रकरणाची काहीही कल्पना नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांच्या कार्यालयाने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीची योग्य प्रकारे अंमलबजावणी तर सोडाच परंतु कशा प्रकारे उपेक्षा केली आहे, हे आयोगास स्पष्टपणे आढळून येत आहे. निदान सुनावणीच्या वेळी सुनावणीशी संबंधित कागदपत्रे त्यांच्या प्रतिनिधीसोबत पाठविण्याची दक्षता देखिल जन माहिती अधिकारी यांनी घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टिने संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ञ) मध्ये "माहितीचा अधिकार" या संज्ञेची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट केली आहे. ज्यामध्ये कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार असे नमूद केले आहे व याच्या व्याप्तीमध्ये एखादे काम, अभिलेख यांची पाहणी करणे, दस्ताऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे अशा प्रकारच्या प्रक्रियांचा समावेश आहे. याहीउपर सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ३७ मधील तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्तांना, अशा प्रकारची माहिती सार्वजनिक संस्थेकडून प्राप्त करुन घेण्याचे अधिकार आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या परिणामकारक अंमल-बजावणीच्या दृष्टीने या प्रकरणी सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयाच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी या संस्थेकडून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्राप्त करुन ती अपिलार्थीस देणे या प्रकरणी मूळात अधिनियमातील कलम २ (ञ) प्रमाणे अभिप्रेत होते. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे कोणतीही कार्यवाही न करण्याच्या त्यांच्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकरी यांनी देखिल अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील निर्णय अपिलार्थीस कळविला नाही, त्यातील फक्त परिणामक्षम आदेशच (ऑपरेटीव्ह ऑर्डर) अपिलार्थीस कळविले आहेत. त्यांनी अपिलार्थीचे दिनांक ३१-०३-२००८ रोजीचे प्रथम अपील कोणत्या कारणास्तव फेटाळले आहे याचा कोणताही बोध त्यांनी अपिलार्थीस दिनांक १९-०७-२००८ रोजीच्या पाठविलेल्या पत्रावरुन आयोगास होत नाही. मा. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने कोणत्याही अपील अर्जावर निर्णय देताना त्याची कारणे नमूद करणे कशा प्रकारे आवश्यक आहे, या संदर्भात वेळोवेळी आदेशही पारित केले आहेत. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे दिनांक १९-०७-२००८ रोजीचे आदेश कोणत्या पार्श्वभूमीवर दिले आहेत, ती पार्श्वभूमी आयोगास ज्ञात होत नाही.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे अधीक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, बीड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याचा कोणताही सकारात्मक प्रयत्न संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून झालेला नाही. अपिलार्थीस माहिती न देण्याच्या कृतीव्दारे त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्यामुळे धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, बीड यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे ती उघड करण्यासाठी संबंधित संस्थेस कोणताही प्रत्यवाय नसावा. त्यामुळे सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांचे दिनांक १९-०७-२००८ रोजीचे आदेश अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, बीड यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिवाजी बळीराम राऊत, मु. पो. नाळवंडी, तालुका जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई, धर्मादाय आयुक्त भवन, ३ रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, वरळी, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९१

निर्णय दिनांक १९-१२-२००९

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, : अपिलार्थी
रा. शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, उपविभागीय कार्यालय, पूर्णा,
तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, जिंतुर रोड, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचा निर्णय दिनांक ०९-०९-२००८ रोजी देऊनही अद्यापपावेतो

त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे विज देयकाच्या वाढीव रकमेबाबत मे २००८ या कालावधीशी संबंधित " माहे मे २००८ चे वीज देयकातील वाढीव रक्कमा ज्या आधारे काढल्या आहेत त्या संदर्भातील परिपत्रक अथवा शासन निर्णयाची छायांकीत प्रत " अशी माहिती टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, "वास्तवात माहे मार्च २००८ च्या वीज देयकाच्या सोबत एक दुसरे बील देयक (जास्तीची सुरक्षा ठेव) देण्यात आले आहे. तसेच आपण ते वीज देयक (सुरक्षा ठेव) भरले नाही. त्यामुळे जून २००८ च्या बील देयकात ती रक्कम समाविष्ट करण्यात आली आहे व ही रक्कम कंपनी नियमानुसार आहे. ती रक्कम भरुन कंपनीस सहकार्य करावे, " असे उत्तर दिले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०९-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिका-याकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर असा खुलासा केला की, या प्रकरणी अपिलार्थीस महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कार्मिक विभागातील परिपत्रक क्रमांक ५७, दिनांक ०७-०७-२००७ अन्वये हे आदेश निर्गमित केले आहेत. तथापि या परिपत्रकाची प्रत संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविल्याची बाब त्यांच्या अभिलेख्यावर उपलब्ध नाही. यावरुन अपिलार्थीस या परिपत्रकाची प्रत अद्यापही कार्यालयाकडून मिळाली नसावी असे अनुमान त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये काढले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मे २००८ च्या वीज बीलातील त्यांना केलेल्या जादा आकारणीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागितली होती. ग्राहकाच्या बाबत जादाची सुरक्षा ठेव घेण्याबाबतचे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे दिनांक ०७-०७-२००७ रोजीचे परिपत्रक जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सादर केले.

या परिपत्रकाच्या प्रतीवर कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाचा दिनांक ०२-०१-२००८ रोजीचा उल्लेख आहे. यावरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०६-२००८ रोजी माहितीची मागणी केली असता त्यांच्याकडे या परिपत्रकाची प्रत उपलब्ध होती असे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची पूर्तता, त्यांनी या परिपत्रकाची प्रत अपिलार्थीस दिल्यानंतर पूर्णतः झाली असती परंतु ही प्रत अपिलार्थीस न देता जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांच्या कृतीचे स्पष्टीकरण करुन त्यांना एकप्रकारे दिशाभूल करणारी माहिती पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे व

त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०९-२००८ रोजी अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करुनही आजतागायत एवढी साधी माहिती देखील त्यांनी अपिलार्थीस पुरविली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविली जाणे हे त्यांना अनिवार्य आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने पुरवावी. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी हे ही माहिती आयोगाने विहित केलेल्या कालावधीमध्ये पुरवतील, असे पहावे. या प्रकरणी अपिलार्थीस दिशाभूल करणारी माहिती देऊन आणि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरवून संबंधित जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग पूर्णा (दिनांक २८-०६-२००८ ते २७-०७-२००८ या कालावधीत कार्यरत ) यांनी त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीद्वारे स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती (दि. ०७-०७-२००७ च्या परिपत्रकाची प्रत) त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने पुरवावी.

३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, रा. शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभागीय कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, जिंतुर रोड, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, प्रकाशगड, ५ वा मजला, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९६२

निर्णय दिनांक १९.१२.२००९

१ श्री. डी. एन. खवले, : अपिलार्थी

मु. पो. हातोला, ता. वाशी, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे

विभाग, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद लघु पाटबंधारे

विभाग, उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८.११.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याकरीता जादाचे शुल्क आकारल्याने आणि जन अपिलीय अधिकारी यांनी चुकीचा निर्णय दिल्याने व जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००८ मधील हातोळा पिंपळगांव (क), ता. वाशी (ग्रामीण मार्ग) जोडरस्त्यासंदर्भात काही माहिती टपालद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४६०/- इतके त्यांना चलनाद्वारे शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने दिनांक ०८.०९.२००८ रोजी या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन आणि जन माहिती अधिकारी यांनी जास्तीचे पैसे वसूल केल्याच्या कारणावरुन, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती योग्य ते शुल्क आकारुन पुरविल्याचे अनुमान काढून, अमान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १०.०९.२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती सशुल्क पुरविली असून, ही माहिती

अपिलार्थीस प्राप्त झाल्याच्या पृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीची पोच सही देखिल त्यांच्याकडे घेतली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीची पोच सही असलेली कागदपत्रे आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०७.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील एकूण ६ मुद्यांपैकी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २, ४ व ६ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. मुद्दा क्रमांक ३ आणि ५ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस पुरविण्यात आलेली माहिती ही सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आढळून येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला आहे की, अपिलार्थीने मागणी केलेल्या अंदाजपत्रकाच्या प्रतीमध्ये काही घरांच्या नकाशाचा समावेश होतो. सदर नकाशाच्या झेरॉक्स प्रती त्यांनी खाजगी दुकानदारांकडून करुन घेतल्या. त्यांना ५ नकाशाकरिता एकूण १८०/- रु. इतका खर्च आला व अपिलार्थीस ९० पृष्ठांची त्यांनी माहिती दिली असल्यामुळे प्रतिपृष्ठ रु. २/- याप्रमाणे याकरिता त्यांना रु. १८०/- इतका खर्च आला आणि त्यांना टपाल खर्च रु. १०० /- इतका आला. असे त्यांना या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी एकूण रु. ४६०/- इतका खर्च आला, सदर खर्चाचा तपशील त्यांनी आयोगास दाखविला. यावरुन जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे आकारलेले शुल्क हे बरोबर असल्याचे

आयोगास आढळून आले आहे. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६.०८.२००८ रोजीच्या पाठविलेल्या प्रथम पत्राचे अवलोकन करता, या पत्रामध्ये जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थीस माहितीपोटीचे एकूण शुल्क कळविले आहे. तथापि या शुल्काचा तपशील, जो जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे देणे अपेक्षित आहे, तो तपशील त्यांनी अपिलार्थीस दिलेला नाही. या तपशीलाअभावी जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६.०८.२००८ रोजीचे अपिलार्थीस कळविलेले माहितीपोटीच्या शुल्काचे पत्र अवैध ठरत आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रु. ४६०/- इतके त्यांना परत करावे लागेल. सबब जन महिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीकडून त्यांनी माहिती देण्याकरिता आकारलेले शुल्क रु. ४६०/- इतके अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती पुरविल्याचा आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये उल्लेख केला आहे. तथापि अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या मुद्यांवर माहिती प्राप्त होणे बाकी आहे, हे त्यांनी या अपील अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही. तसेच हे तोंडी स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीचा, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण माहिती दिली हा मुद्दा, आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्याकडून माहितीपोटीचे या प्रकरणी आकारलेले शुल्क रु. ४६०/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. डी. एन. खवले, मु.पो. हातोला, ता. वाशी, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद लघु पाटबंधारे विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२५०
निर्णय दिनांक १९/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>मंठा अर्बन को-ऑप. बँक लि. मंठा,<br>ता. मंठा, जि. जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, जालना | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.०७.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी श्री.वायाळ गंगाधर कडाजी यांनी दिनांक १७.०२.२००९ रोजीच्या अर्जाव्दारे मुख्य कार्यकारी अधिकारी, मंठा अर्बन को-ऑप बँक मर्यादित, मंठा यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्यांच्या दि. २४.०२.२००९ रोजीच्या पत्रान्वये, माहिती अधिकार अधिनियम हा नागरी बँकांना लागू होत नसल्याबाबत अपिलार्थीस कळविले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने श्री. वायाळ यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०१.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलासंदर्भात संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांनी सुनावणी घेऊन दि. २६.०६.२००९ रोजी आपले आदेश पारित केले. याव्दारे त्यांनी श्री.वायाळ यांचे अपील अंशतः मान्य केले व त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी काही मुद्यांवरील माहिती त्यांना १५ दिवसात उपलब्ध करुन देण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मंठा अर्बन को-ऑप. बँक लि., मंठा यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द संबंधित मुख्य कार्यकारी

अधिकारी, मंठा अर्बन कॉ-ऑप. बँक लि., मंठा यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात येते की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे.

या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर मुख्य कार्यकारी अधिकारी, मंठा अर्बन कॉ-ऑप. बँक लि., मंठा यांनी या प्रकरणी घेतलेली भूमिका योग्य आहे. त्यामुळे त्यांना मूळ अर्जदार श्री. वायाळ यांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार माहिती देणे बंधनकारक असणार नाही. परिणामी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांचे दि. २६.०६.२००९ रोजीचे निर्णय अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २५०/०९ मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गंगाधर कडाजी वायाळ, मु.पो. पांगरी बु., ता. मंठा, जि. जालना

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, मंठा अर्बन कॉ-ऑप. बँक लि., मंठा, ता. मंठा, जि. जालना.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१११
निर्णय दिनांक १९/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. संजय क्षीरसागर,<br>सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट,<br>वेदांत नगर, सावेडी,<br>अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त,<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>अहमदनगर विभाग, अहमदनगर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी श्री. गोविंद परशुराम दीक्षित, पुणे यांनी दि. ३०.०१.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री.दीक्षित यांनी सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.१३.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी २२.०८.२००८ रोजी निर्णय देऊन श्री. दीक्षित यांचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती सात दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याचे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आणि सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, श्री.दीक्षित यांनी प्रथमतः त्यांना आवश्यक असलेली माहिती सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्या मार्फत नोंदणीकृत झालेल्या एका खाजगी संस्थेकडे मागितली आहे. अशाप्रकारच्या खाजगी संस्थेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील याचिका क्रमांक ५२९४/२००८ संदर्भात राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर विरुधद मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा यांच्या संदर्भात दि. २८.०४.२००९ रोजी निर्णय दिला आहे. तो या प्रकरणी विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचा काही भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

"........... It is, therefore, clear <u>from the provisions of this definition that the Act cannot apply to the public Trust</u>. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. ........ If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the public Trust Act to have such information, which the Charity commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांचे वरील आदेश पाहता या प्रकरणी श्री. दीक्षित यांनी ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे त्या संस्थेस ती सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याने माहिती अधिकार अधिनियम मूळात लागू होत नसल्याचे दिसून

येते. तसेच या प्रकरणी असेही स्पष्ट करण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त हे त्यांच्या कार्यालयाच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काम करु शकतात. या प्रकरणी श्री. दीक्षित यांनी ज्या संस्थेकडे ही माहिती मागितली आहे ती संस्था व सहायक धर्मादाय आयुक्त हे एकाच प्राधिकरणाचे भाग नाहीत. त्यामुळे श्री. दीक्षित यांनी जर ही माहिती सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असती तर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी या प्रकरणी आदेश देणे त्यांना अनुज्ञेय झाले असते. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आदेश अशाप्रकारे अवैध होत आहेत. या सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता खालीलप्रमाणे ओदश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर विभाग, अहमदनगर यांचे दि. २२.०८.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. गोविंद परशुराम दीक्षित, बी-६, पुष्कराज अपार्टमेंट्स, फ्लॅट नं. २२१, उजवी भुसारी कॉलनी, कोथरुड, पुणे ४११ ०३८.

२) श्री. संजय क्षीरसागर, सचिव, श्री.दत्त देवस्थान ट्रस्ट, वेदांत नगर, सावेडी, अहमदनगर.

३) जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग, अहमदनगर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२११२
निर्णय दिनांक १९/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. संजय क्षीरसागर,<br>सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट,<br>वेदांत नगर, सावेडी,<br>अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त,<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>अहमदनगर विभाग, अहमदनगर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी सौ. मीरा सर्जेराव शिंदे, पुणे यांनी दि. ०३.०२.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने सौ. शिंदे यांनी सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.१३.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी २२.०८.२००८ रोजी निर्णय देऊन सौ. शिंदे यांचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती सात दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याचे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आणि सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, सौ.शिंदे यांनी प्रथमतः त्यांना आवश्यक असलेली माहिती सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्या मार्फत नोंदणीकृत झालेल्या एका खाजगी संस्थेकडे मागितली आहे. अशाप्रकारच्या खाजगी संस्थेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील याचिका क्रमांक ५२९४/२००८ संदर्भात राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर विरुधद मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्‌गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा यांच्या संदर्भात दि. २८.०४.२००९ रोजी निर्णय दिला आहे. तो या प्रकरणी विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचा काही भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

“........... It is, therefore, clear <u>from the provisions of this definition that the Act cannot apply to the public Trust</u>. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. ........ If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the public Trust Act to have such information, which the Charity commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act.”

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांचे वरील आदेश पाहता या प्रकरणी सौ.शिंदे यांनी ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे त्या संस्थेस ती सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याने माहिती अधिकार अधिनियम मूळात लागू होत नसल्याचे दिसून

येते. तसेच या प्रकरणी असेही स्पष्ट करण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त हे त्यांच्या कार्यालयाच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काम करु शकतात. या प्रकरणी सौ.शिंदे यांनी ज्या संस्थेकडे ही माहिती मागितली आहे ती संस्था व सहायक धर्मादाय आयुक्त हे एकाच प्राधिकरणाचे भाग नाहीत. त्यामुळे सौ.शिंदे यांनी जर ही माहिती सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असती तर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी या प्रकरणी आदेश देणे त्यांना अनुज्ञेय झाले असते. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आदेश अशाप्रकारे अवैध होत आहेत. या सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता खालीलप्रमाणे ओदश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर विभाग, अहमदनगर यांचे दि. २२.०८.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) सौ.मीरा सर्जेराव शिंदे, सिध्दार्थ अपार्टमेंट, फ्लॅट नं.२१, भारतीनगर, पौड रोड, पुणे ४११ ०३८.

२) श्री. संजय क्षीरसागर, सचिव, श्री.दत्त देवस्थान ट्रस्ट, वेदांत नगर, सावेडी, अहमदनगर.

३) जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग, अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२११३
निर्णय दिनांकः २१-१२-२००९

१. श्री. बबनराव नामदेवराव गावडे, : अपिलार्थी
रा.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
व्यवस्थापक,
श्री तुळजाभवानी मंदिर
कार्यालय,तुळजापूर,जि.उस्मानाबाद.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक व्यवस्थापक प्रशासन,
श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान,
तुळजापूर,जि.उस्मानाबाद.

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, तुळजापूर तथा
व्यवस्थापक प्रशासन,
श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान,
तुळजापूर,जि.उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०८.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान,तुळजापूर व्यवस्थापनासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१) मंदिरात सन २००५ ते २००८ या कालावधीत मिनरल वॉटरवर किती खर्च झाला त्याचा तपशिल तसेच याच कालावधीत हारतुरे यावर किती खर्च झाला ?

२) मंदिरात स्ट्राँगरुम आहे का, दररोजच्या दररोज ती उघडली जाते का? त्यामध्ये ठेवण्यात आलेल्या सामानाची यादी मिळावी.

३) सोने चांदी परिक्षण करण्याकरिता यापूर्वी तज्ञ परिक्षक (सोनार) नेमण्यात आला होता का?, तो नेमला नसेल तर परिक्षणाचे काम कोण करत होते ? व सध्या कोण करत आहे?

४) दिक्षीत यांच्या निधनानंतर खजिनदार या पदाचा चार्ज कोणी दिला? चार्ज दिल्याची यादी सत्यप्रत मिळावी

५) श्री नायकवाडी यांची नेमणूक करण्याकरीता जो ठराव घेण्यात आला त्याची सत्यप्रत मिळावी. त्यांची ज्या पदावर नेमणूक करण्यात आली, त्या नेमणुक आदेशाची सत्यप्रत"

सदर माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०८.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन

अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.०७.२००८ रोजी सुनावणी घेतली. सदर सुनावणीनंतर जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दि. ३०.०७.२००८ रोजी माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दि. ०८.०४.२००८ रोजी उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी दि. १०.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.०७.२००८ रोजी निर्णय दिल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस परत दि. ३०.०७.२००८ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध सर्व माहिती दिली आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी अपिलार्थीस, तुळजाभवानी मंदिराच्या व्यवस्थापनाने सन २००५ ते २००८ या कालावधीमध्ये मिनरल वॉटर व हारतुरे यांच्यावर झालेला खर्च, मंदिरातील स्ट्राँगरुममध्ये ठेवण्यात आलेल्या सामानाची यादी, दिक्षीत यांच्या निधनानंतर खजिनदार या पदाचा चार्ज कोणी दिला? चार्ज दिल्याच्या यादीची सत्यप्रत आणि श्री. नाईकवाडी यांची ज्या ठरावाद्वारे नेमणूक करण्यात आली होती त्या ठरावाची प्रत, एवढीच माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. उर्वरित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ती,

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार विसंगत असल्यामुळे, देय होत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी शेवटच्या मुद्यावरील माहितीचा अपवाद वगळता, सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. श्री. नाईकवाडी यांची नेमणूक करण्यासंदर्भातील ठरावाची प्रत, त्यांच्या नेमणूक आदेशाची प्रत अपिलार्थीने मागितली असता, या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस श्री. नाईकवाडी यांच्या नेमणूकीसंदर्भात त्यांच्या सेवापुस्तिकेत घेतलेल्या नोंदीची झेरॉक्स प्रत त्यांना दिली आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे. परंतु प्राप्त माहितीने त्यांची दिशाभूल कशी होत आहे, हे स्पष्ट करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, त्यामुळे त्यांचा हा मुद्दा त्यांच्या उपस्थिती व लेखी स्पष्टीकरणाअभावी विचारात घेता येणे शक्य नाही. तथापि सकृतदर्शनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीमध्ये आयोगास वर नमूद केलेली विसंगती आढळून आली आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भातील माहिती, श्री. नाईकवाडी यांची नेमणूक करण्याचे आदेश दिले असल्यास, त्या आदेशाची प्रत अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः २१-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. बबनराव नामदेवराव गावडे,लातूर रोड,तुळजापूर,ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक व्यवस्थापक प्रशासन,श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर तथा व्यवस्थापक प्रशासन,श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२११४
निर्णय दिनांकः २१-१२-२००९

१. श्री. संजय महादेवराव सोनवणे, : अपिलार्थी
रा.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
व्यवस्थापक,
श्री तुळजाभवानी मंदिर
संस्थान,तुळजापूर,जि.उस्मानाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान,
तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक व्यवस्थापक प्रशासन,
श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान,
तुळजापूर,जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, तुळजापूर तथा
व्यवस्थापक प्रशासन,
श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान,
तुळजापूर,जि.उस्मानाबाद

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाची प्रत त्यांना आजतागायत न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम

ठेवून जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व (२) प्रमाणे कारवाई करण्याची विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री तुळजाभवानी मंदीर संस्थान,तुळजापूर येथे प्रतिवर्षी साजरा करण्यात येत असलेल्या शाकंभरी नवरात्र महोत्सवासंबंधी काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शाकंभरी नवरात्र महोत्सवामध्ये भक्तगण, जनता तसेच शासन व इतर निधीमधून प्राप्त झालेली एकूण रक्कम, त्यामधून खर्च केलेल्या व शिल्लक राहिलेल्या रकमेचा तपशील, शाकंभरी नवरात्र महोत्सवामध्ये घेण्यात आलेले कार्यक्रम, त्यासाठी जेवण, प्रवास, मानधन, मंडप, जाहीरात, व्होर्डींग, मैदान दुरुस्ती, वाहनसेवा, पेट्रोल, डिझेल इत्यादीवर खर्च केलेल्या रकमेचा तपशील, पावत्यांच्या छायांकित सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी  दि. ०१.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस शुल्क भरुन माहिती त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने शुल्काची रक्कम जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न भरता, अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.०७.२००८ रोजी सुनावणी घेऊन सदर सुनावणीमध्ये अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २२.०७.२००८ रोजीच्या पत्रान्वये उर्वरित माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिली. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहिती मागितली होती. तथापि ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी हे व्यक्तिशः त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत, म्हणून त्यांनी प्रथमतः अपिलार्थीस दि. ०५.०६.२००८ रोजी आवश्यक ती फी भरुन माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले परंतु अपिलार्थीने त्याप्रमाणे शुल्काचा भरणा न करता, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यांनी दि. १६.०७.२००८ रोजी अपिलार्थीचे प्रथम अपील अंशतः मान्य करुन अपिलार्थीस तात्काळ विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले होते. त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दि. २२.०७.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली व ही (एकूण ८८ पृष्ठे) माहिती अपिलार्थीस दि. २२.०७.२००८ रोजी प्राप्त झाल्याची पोचसही त्यांनी आयोगासमोर सादर केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या संस्थानातर्फे दरवर्षी साजरा करण्यात येत असलेल्या शाकांबरी नवरात्र महोत्सवाच्या संदर्भात प्राप्त निधी, झालेला खर्च अशाप्रकारच्या विविध मुद्यांवर माहिती मागविली होती. 'शाकांबरी नवरात्र महोत्सव' हा कार्यक्रम श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानतर्फे दरवर्षी नियमितपणे साजरा केला जातो. हे पाहता अपिलार्थीने जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे, ती माहिती एका निरंतर चालणाऱ्या प्रक्रियेशी संबंधित असल्याचे दिसून येत आहे. निरंतर चालणाऱ्या प्रक्रियेविषयी माहिती मागविताना अर्जदारास माहिती अधिकाऱ्याकडे एखाद्या विशिष्ट कालावधीशी संबंधित माहिती मागवावी लागेल. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना आवश्यक

असलेल्या माहितीचा कालावधी नमूद केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही कालावधीशी संबंधित जरी माहिती दिली, तरी ती अपिलार्थीस कायम अपूर्णच वाटत राहणार. अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन अपिलीय अधिकारी यांचा निणूय प्राप्त झाला नसल्याचे नमूद केले आहे. तथापि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन हा निर्णय अपिलार्थीस दि. १६.०७.२००८ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थीच्या पोचसहीवरुन अपिलार्थीस आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीने या मुद्यावर देखील आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती मागितली आहे, त्या माहितीशी संबंधित कालावधीचा उल्लेख त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये न केल्यामुळे अपिलार्थीचा मूळ अर्जच अवैध ठरत आहे आणि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.२२.०७.२००८ रोजी ८८ पृष्ठांची माहिती विनामूल्य पुरवली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः हजर राहून ती माहिती हस्तगत करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व पूर्णपणे अपिलार्थीचे होते. तथापि त्यांनी, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः कधी उपस्थित राहिले, याचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगास विचाराधीन व्दितीय अपील अर्जासोबत सादर केलेला नाही अथवा तो तोंडी स्वरुपात स्पष्ट करण्यासाठी ते आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांचेवर माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची विनंती आयोगास मान्य करता

येणार नाही. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २१-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. संजय महादेवराव सोनवणे, "रायगड",राजे संभाजीनगर (प).तुळजापूर -४१३ ६०१, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक व्यवस्थापक प्रशासन,श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर तथा व्यवस्थापक प्रशासन,श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१८८
निर्णय दिनांक २१/१२/२००९

१ श्री. रणजीत राजे भोसले : अपिलार्थी
रा. देवपूर, धुळे

**विरुध्द**

१ प्रकल्प संचालक, : प्रतिवादी
कर्नाटका हेल्थ प्रोमोशन ट्रस्ट, पुणे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.०५.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. २८.०२.२००९ रोजीच्या अर्जाव्दारे प्रकल्प संचालक, कर्नाटका हेल्थ प्रामोशन ट्रस्ट, पुणे यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेच्या प्रकल्प संचालकांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने परत प्रकल्प संचालक, कर्नाटका हेल्थ प्रोमोशन ट्रस्ट, पुणे यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.१३.०४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रकल्प संचालकांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व प्रकल्प संचालक, कर्नाटका हेल्थ प्रोमोशन ट्रस्ट,पुणे यांच्या पैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्याच्या मूळ अर्जाव्दारे माहिती अधिकार अधिनियमातील

तरतुदीअंतर्गत एका खाजगी संस्थेकडे काही माहिती मागितली आहे. या संदर्भात सर्व संबंधितांच्या असे निदर्शनास आणण्यात येत आहे की, खाजगी संस्थेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील याचिका क्रमांक ५२९४/२००८ संदर्भात राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर विरुध्द मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्‌गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा यांच्या संदर्भात दि. २८.०४.२००९ रोजी निर्णय दिला आहे. तो या प्रकरणी विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचा काही भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

"........... It is, therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the public Trust. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. ........ If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the public Trust Act to have such information, which the Charity commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांचे वरील आदेश पाहता या प्रकरणी अपिलार्थीने ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे त्या संस्थेस ती माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याने माहिती अधिकार अधिनियम मूळात लागू होत नसल्याचे दिसून येते. या सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता खालीलप्रमाणे ओदश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. १८८/०९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रणजीत राजे भोसले, १६, बाबू नेताजी कॉलनी, बोरसे नगर, देवपूर, धुळे.
२. प्रकल्प संचालक, कर्नाटका हेल्थ प्रोमोशन ट्रस्ट, पुणे.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२९७
निर्णय दिनांक २१/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. रामनाथ गणपतराव खोड<br>रा. बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ सचिव,<br>शनिमंदिर ट्रस्ट, बीड<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त, बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०३.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ३१.१२.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे सचिव, शनिमंदिर ट्रस्ट, बीड यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.०२.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी सचिव, शनिमंदिर ट्रस्ट, बीड उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांना आवश्यक असलेली माहिती सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांच्या मार्फत नोंदणीकृत झालेल्या एका खाजगी संस्थेकडे मागितली आहे. अशाप्रकारच्या खाजगी संस्थेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील याचिका क्रमांक ५२९४/२००८ संदर्भात राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर विरुध्द मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा यांच्या संदर्भात दि. २८.०४.२००९ रोजी निर्णय दिला आहे. तो या प्रकरणी विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचा काही भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

"........... It is, therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the public Trust. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. ........ If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the public Trust Act to have such information, which the Charity commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांचे वरील आदेश पाहता या प्रकरणी अपिलार्थीने ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे त्या संस्थेस ती सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याने माहिती अधिकार अधिनियम मूळात लागू होत नसल्याचे

दिसून येते. तसेच या प्रकरणी असेही स्पष्ट करण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त हे त्यांच्या कार्यालयाच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काम करु शकतात. या प्रकरणी अपिलार्थीने ज्या संस्थेकडे ही माहिती मागितली आहे ती संस्था व सहायक धर्मादाय आयुक्त हे एकाच प्राधिकरणाचे भाग नाहीत. त्यामुळे अपिलार्थीने जर ही माहिती सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असती तर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी या प्रकरणी आदेश देणे त्यांना अनुज्ञेय झाले असते. या सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता खालीलप्रमाणे ओदश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २९७/०९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री.रामनाथ गणपतराव खोड, शनि मंदिर गल्ली, जुना मोंढा रोड, बीड.
२) सचिव, शनिमंदिर ट्रस्ट, शनिमंदिर गल्ली, पेठ, बीड
३) जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड विभाग, बीड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२११५
निर्णय दिनांक २१/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बाबाजी कोंडीबा येवले,<br>रा. वडनेर बु., ता.पारनेर, जि. अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सचिव,<br>श्री. दत्तगुरु सेवा मंडळ, वडनेर बु., ता.पारनेर, जि. अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त,<br>अहमदनगर विभाग, अहमदनगर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ३१.१२.२००७ रोजीच्या अर्जाव्दारे सचिव, श्री. दत्तगुरु सेवा मंडळ, वडनेर बु., ता.पारनेर, जि. अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.२६.०७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी २५.०९.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती सात दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याचे सचिव, श्री. दत्तगुरु सेवा मंडळ, वडनेर बु., ता.पारनेर, जि. अहमदनगर यांना आदेशित केले. यानंतरही हवी

असलेली माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, सचिव, श्री दत्तगुरु सेवा मंडळ, वडनेर बु., ता. पारनेर, जि. अहमदनगर आणि सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांना आवश्यक असलेली माहिती सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्या मार्फत नोंदणीकृत झालेल्या एका खाजगी संस्थेकडे मागितली आहे. अशाप्रकारच्या खाजगी संस्थेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील याचिका क्रमांक ५२९४/२००८ संदर्भात राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर विरुध्द मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्‌गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा यांच्या संदर्भात दि. २८.०४.२००९ रोजी निर्णय दिला आहे. तो या प्रकरणी विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचा काही भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

“........... It is, therefore, clear <u>from the provisions of this definition that the Act cannot apply to the public Trust</u>. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. ........ If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the public Trust Act to have such information, which the Charity commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for

any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांचे वरील आदेश पाहता या प्रकरणी अपिलार्थीने ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे त्या संस्थेस ती सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याने माहिती अधिकार अधिनियम मूळात लागू होत नसल्याचे दिसून येते. तसेच या प्रकरणी असेही स्पष्ट करण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त हे त्यांच्या कार्यालयाच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काम करु शकतात. या प्रकरणी अपिलार्थीने ज्या संस्थेकडे ही माहिती मागितली आहे ती संस्था व सहायक धर्मादाय आयुक्त हे एकाच प्राधिकरणाचे भाग नाहीत. त्यामुळे अपिलार्थीने जर ही माहिती सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असती तर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी या प्रकरणी आदेश देणे त्यांना अनुज्ञेय झाले असते. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आदेश अशाप्रकारे अवैध असल्याचे सिध्द होत आहे. परिणामी सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी दि.२५.०९.२००८ रोजी दिलेले आदेश अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे ओदश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाबाजी कोंडीबा येवले, मु.पो. वडनेर बु., ता.पारनेर, जि. अहमदनगर.
२. सचिव, श्री.दत्तगुरु सेवा मंडळ, वडनेर बु., ता. पारनेर, जि. अहमदनगर.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग, अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२११७
निर्णय दिनांक २१/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गजानन शंकरराव बल्लाळ<br>रा. औंढा नागनाथ, जि. हिंगोली | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ सचिव,<br>श्री. नागनाथ संस्थान, औंढा (नागनाथ),<br>जि. हिंगोली | : | प्रतिवादी |
| २ अध्यक्ष तथा तहसीलदार,<br>श्री. नागनाथ संस्थान, औंढा (नागनाथ),<br>जि. हिंगोली | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २३.०९.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १७.०६.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे सचिव, श्री. नागनाथ संस्थान, औंढा (नागनाथ), जि. हिंगोली यांच्याकडे त्यांच्या संस्थानाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थानाने कोणताही माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने अध्यक्ष तथा तहसीलदार, श्री. नागनाथ संस्थान,औंढा (नागनाथ) यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.१०.०८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर अध्यक्ष तथा तहसीलदार, औंढा (नागनाथ), जि. हिंगोली यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,  संबंधित संस्थानाचे सचिव व अध्यक्ष, श्री. नागनाथ संस्थान तथा तहसीलदार, औंढा (नागनाथ) हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने श्री. नागनाथ संस्थान, औंढा (नागनाथ) शी संबंधित माहिती, संस्थानाच्या सचिवांकडे मागितली आहे.

या प्रकरणी सर्व संबंधितांच्या असे निदर्शनास आणण्यात येत आहे की,  खाजगी संस्थेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील याचिका क्रमांक ५२९४/२००८ संदर्भात राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर विरुध्द मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्‌गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा यांच्या संदर्भात दि. २८.०४.२००९ रोजी निर्णय दिला आहे. तो या प्रकरणी विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचा काही भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

“........... It is, therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the public Trust. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority.  ........ If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the public Trust Act to have such information, which the Charity commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act.”

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांचे वरील आदेश पाहता या प्रकरणी अपिलार्थीने ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे त्या संस्थेस ती सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याने माहिती अधिकार अधिनियम मूळात लागू होत नसल्याचे दिसून येते. या सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता खालीलप्रमाणे ओदश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. २११७/०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.गजानन शंकरराव बल्हाळ, रा. औंढा (नागनाथ), जि. हिंगोली
२. सचिव, श्री. नागनाथ संस्थान, औंढा (नागनाथ), जि. हिंगोली
३. अध्यक्ष तथा तहसीलदार, श्री. नागनाथ संस्थान, औंढा (नागनाथ), जि. हिंगोली

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२११८
निर्णय दिनांक २१/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. श्रीराम आसाराम पाटील<br>मॅनेजर,<br>धुळे व नंदुरबार जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी<br>पतपेढी लि., धुळे | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय सहनिबंधक,<br>सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.०३.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी श्री. युवराज काळु पाटील यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक २१.०५.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे व्यवस्थापक, धुळे व नंदुरबार जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतपेढी मर्या., धुळे यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेच्या व्यवस्थापकांनी त्यांच्या दि. १५.०६.२००७ रोजीच्या पत्रान्वये, माहिती अधिकार अधिनियम-२००५ कायदा त्यांच्या पतसंस्थेस लागू होत नसल्याबाबत अपिलार्थीस कळविले. व्यवस्थापकांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक २३.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी

संस्था, नाशिक यांनी सुनावणी घेऊन दि. २४.१२.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. याव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे व्यवस्थापक, धुळे व नंदुरबार जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतपेढी मर्या., धुळे यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द व्यवस्थापक, धुळे व नंदुरबार जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतपेढी मर्या. यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री. युवराज काळू पाटील व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांच्या पतपेढीशी संबंधित माहिती, पतपेढीच्या व्यवस्थापकाकडे मागितलेली आहे.

या संदर्भात सर्व संबंधितांच्या असे निदर्शनास आणण्यात येत आहे की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता, मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, पतसंस्थेस लागू होणार नाहीत.

या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर व्यवस्थापक, धुळे व नंदुरबार जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतपेढी मर्या. यांनी या प्रकरणी घेतलेली भूमिका योग्य आहे. त्यामुळे त्यांना मूळ अर्जदार श्री. युवराज काळू पाटील यांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार माहिती देणे बंधनकारक असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र. २११८/०८ मान्य करण्यात येत आहे.

२. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांचे दि. २४.१२.२००७ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. युवराज काळू पाटील, रा. ४५, श्रीराम कॉलनी, देवपूर, धुळे, ता.जि. धुळे

२. मॅनेजर, धुळे व नंदुरबार जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतपेढी लि., प्लॉट नं. १, नागाई कॉलनी, देवपूर, धुळे.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय निबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१३०
निर्णय दिनांक २१/१२/२००९

१ श्री. प्रमोद दिनकर पाटील : अपिलार्थी
रा. जळगांव खु., ता. जि. जळगांव

**विरुध्द**

१ गोदावरी फौंडेशन, : प्रतिवादी
जळगांव
२ जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक धर्मादाय आयुक्त, जळगांव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.०५.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १२.०२.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे गोदावरी फौंडेशन, जळगांव यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने सहायक धर्मादाय आयुक्त, जळगांव यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.१९.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सहायक धर्मादाय आयुक्त, जळगांव यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ०६.०५.२००८ रोजी पारित करुन, अपिलार्थीने ज्या संस्थेच्या विरुध्द त्यांच्याकडे प्रथम अपील केले, ती संस्था जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात येत नसल्यामुळे, अपील रद्द करण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी गोदावरी फौंडेशन संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

गोदावरी फाऊंडेशन तर्फे ॲड.श्री. एल.व्ही.संगीत यांनी असा युक्तिवाद केला की, गोदावरी फाऊंडेशन ही एक खाजगी संस्था असून या संस्थेस राज्य शासन अथवा केंद्र शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही. गोदावरी फाऊंडेशन या खाजगी संस्थेमार्फत अभियांत्रिकी आणि वैद्यकीय महाविद्यालये चालविली जातात. या संस्थेस शासनाकडून भरीव अर्थसहाय्य प्राप्त होत नाही, तसेच त्यांच्या दैनंदिन कारभारावर देखील राज्य अथवा केंद्र शासनाचे कोणतेही नियंत्रण नसल्याने मूळात सदरील संस्था ही, माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (ज) च्या तरतुदीप्रमाणे "सार्वजनिक प्राधिकरण" होऊ शकत नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने गोदावरी फाऊंडेशन नावाच्या खाजगी संस्थेकडून, जीची धर्मादाय आयुक्त यांच्याकडे सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील तरतुदीनुसार नोंदणी झालेली आहे, अशा संस्थेकडून, त्या संस्थेविषयी काही माहिती मागितली आहे. अशा खाजगी संस्थेच्या बाबतीत मा. उच्च न्यायालय,मुंबईच्या नागपूर खंडपीठाने दि. २०.०८.२००९ रोजी दिलेला निर्णय विचारात घेणे योग्य राहील. मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने त्यांच्याकडील रिट पिटीशन क्र.५१३२/२००८, नगर युवक शिक्षण संस्था आणि यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय, वनडोंगरी, नागपूर विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यासंदर्भात दि. २०.०८.२००९ रोजी, अशाप्रकारच्या खाजगी संस्थांची महाविद्यालये माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज) प्रमाणे 'सार्वजनिक प्राधिकरणा'च्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाहीत, असा निर्णय दिला आहे. या याचिकेवरील निर्णयाव्दारे राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठाचे अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे अशाच प्रकारच्या संस्थेस दिलेले आदेश रद्द ठरविले आहेत. विचाराधीन प्रकरण देखील मा. उच्च न्यायालयाच्या वर संदर्भित

केलेल्या प्रकरणाप्रमाणेच असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २१/१२/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रमोद दिनकर पाटील, जळगांव खु., ता.जि. जळगांव.
२. गोदावरी फौंडेशन, जळगांव.
३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगांव.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१३१
निर्णय दिनांक   २१/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. विलास बळीराम पाटील<br>रा. जळगांव खु., ता. जि. जळगांव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ गोदावरी फौंडेशन,<br>जळगांव | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त, जळगांव | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.०५.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १२.०२.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे गोदावरी फौंडेशन, जळगांव यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने सहायक धर्मादाय आयुक्त, जळगांव यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.१९.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सहायक धर्मादाय आयुक्त, जळगांव यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ०६.०५.२००८ रोजी पारित करुन, अपिलार्थीने ज्या संस्थेच्या विरुध्द त्यांच्याकडे प्रथम अपील केले, ती संस्था जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात येत नसल्यामुळे, अपील रद्द करण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, गोदावरी फौंडेशन संस्थेचे अधिकारी आणि सहायक धर्मादाय आयुक्त, जळगांव हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने गोदावरी फाऊंडेशन नावाच्या खाजगी संस्थेकडून, जीची धर्मादाय आयुक्त यांच्याकडे सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील तरतुदीनुसार नोंदणी झालेली आहे, अशा संस्थेकडून, त्या संस्थेविषयी काही माहिती मागितली आहे. अशा खाजगी संस्थेच्या बाबतीत मा. उच्च न्यायालय,मुंबईच्या नागपूर खंडपीठाने दि. २०.०८.२००९ रोजी दिलेला निर्णय विचारात घेणे योग्य राहील. मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने त्यांच्याकडील रिट पिटीशन क्र.५१३२/२००८, नगर युवक शिक्षण संस्था आणि यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय, वनडोंगरी, नागपूर विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यासंदर्भात दि. २०.०८.२००९ रोजी अशाप्रकारच्या खाजगी संस्थांची महाविद्यालये माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज) प्रमाणे 'सार्वजनिक प्राधिकरणा'च्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाहीत, असा निर्णय दिला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज) मध्ये विहित केलेल्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये अशाप्रकारची खाजगी महाविद्यालये येत नसल्यामुळे या याचिकेवरील निर्णयाव्दारे राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठाचे अशाच प्रकारच्या संस्थेस अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे दिलेले आदेश रद्द ठरविले आहेत. विचाराधीन प्रकरण देखील मा. उच्च न्यायालयाच्या वर संदर्भित केलेल्या प्रकरणाप्रमाणेच असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| **औरंगाबाद** | **( वि. बा. बोरगे )** |
| **दिनांक :        २१/१२/२००९** | **राज्य माहिती आयुक्त,** |
| | **खंडपीठ औरंगाबाद** |

प्रत,

१. श्री. विलास बळीराम पाटील, जळगांव खु., ता.जि. जळगांव.
२. गोदावरी फौंडेशन, जळगांव.
३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगांव.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२५८

निर्णय दिनांक २१-१२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. भगवान फकिरचंद हिवाळे,<br>रा. मांजरी, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,<br>जिल्हा औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती दिली नाही, दिलेली माहिती दिशाभूल करणारी आहे. प्राप्त माहितीवर कार्यालय प्रमुखाचा शिक्का अथवा स्वाक्षरी नसून माहिती बनावट आहे त्यामुळे संबंधितांवर योग्य तो चौकशीचा आदेश व्हावा व अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे " इयत्ता १ ते ७ गणित विषयाच्या प्रशिक्षणाबाबत " या विषयावर दिनांक २५-०४-२००८ ते ०५-०५-२००८ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीतील गणित विषयाच्या प्रशिक्षणातील स्टेशनरी साहित्य साठा नोंदवहीच्या व प्रशिक्षण स्टेशनरी साहित्य वाटप केले असल्यास साहित्य वाटप रजिस्टरच्या सत्यप्रती - या मुद्दयाचा समावेश हाता. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या माहितीची व्यक्तिशः मागणी केली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार या विषयाच्या संदर्भात शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ०६-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी श्री. सकदेव ए. एम., शिक्षण विस्तार अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर मार्फत माहिती सादर करण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे श्री. सकदेव ए. एम., शिक्षण विस्तार अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे पालन केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आयोगास आढळून येत नाही. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणाच्या संदर्भात कोणताही समाधानकारक खुलासा आयोगास करता आला नाही. तसेच तत्कालीन गट

गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती गंगापूर व सध्याचे गटशिक्षणाधिकारी श्री. पी. आर. वमने यांना देखील या प्रकरणाशी संबंधित कोणतीही माहिती नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. एकंदरीत या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन सध्याचे जन माहिती अधिकारी श्री. पी. आर. वमने यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने दिनांक १९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व्यक्तिशः हस्तांतरीत करावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना प्राप्त झालेली माहिती दिशाभूल करणारी आहे असे नमूद केले आहे. अपिलार्थीस कोणती माहिती प्राप्त झाली व प्राप्त माहिती कशा प्रकारे त्यांची दिशाभूल करणारी आहे, हे त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये अथवा त्यांच्या इतर कोणत्याही लेखी युक्तिवादाव्दारे स्पष्ट केलेले नाही तसेच हे व्यक्तिशः स्पष्ट करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता त्यांचा, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिशाभूल करणारी माहिती पाठविली हा मुद्दा, आयोग फेटाळून लावत आहे. तसेच त्यांनी मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांनी आयोगाने वर नमूद केलेल्या कालावधीमध्ये पूर्वनियाजित वेळी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर श्री. पी. आर. वमने यांच्याशी व्यक्तिशः संपर्क साधून ही माहिती व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर कार्यालय प्रमुखाचा शिक्का अथवा स्वाक्षरी नसल्याचे नमूद केले आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात साक्षांकीत स्वरुपाची माहिती मागितली नसल्याने व तसेच माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्याच स्वरुपात देणे अभिप्रेत असल्यामुळे अपिलार्थीचा, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर कार्यालय प्रमुखाचा शिक्का अथवा स्वाक्षरी नाही हा आक्षेप, आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर श्री. पी. आर. वमने यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भगवान फकिरचंद हिवाळे, रा. मांजरी, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२५९

निर्णय दिनांक २१-१२-२००९

१ श्री. हुसैन खाँ जमाल खाँ पिंजारी, : अपिलार्थी
मु.पो. कसाबखेडा, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार, तहसील कार्यालय खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मौजे वेरुळ येथील सर्वे नंबर ९३, ९४ व ९५ च्या मालकी हक्कासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जमालखाँ लालखाँ (आजोबा) यांच्या नावावरील महेबुबखाँ जमालखाँ (अपिलार्थीचे वडील) यांच्या नावाने फेरफार करतांना फेरफार कसा झाला त्या फेरफाराच्या नकला, सर्वे नंबर ९४ मध्ये महेबुबखाँ जमालखाँ (अपिलार्थीचे वडील) यांच्या नावावरुन गुलाबचंद जोरीलाल (त्रयस्थ पक्ष) यांच्या नावावर फेरफार कसा झाला या फेरफारच्या नकला व सर्वे नंबर ९५ मधील महेबुबखाँ जमालखाँ (अपिलार्थीचे वडील) यांच्या नावावरुन तनसुखलाल गणेशलाल यांच्या नावाने फेरफार कसा झाला त्या फेरफाराच्या नकला - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सोबत उपलब्ध करुन देण्यात येत आहे, असे कळविले. या पत्रासोबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले विना दिनांकाचे एक पत्र असून या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश / निर्णयानुसार यासोबत माहिती उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे नमूद केले आहे व या पत्रासोबत सर्वे नंबर ९३, ९४ व ९५ चा ७/१२ सन १९५९-६० ते ८१-८२ फेरफाराची प्रत व खासरापत्रकाची प्रत अशा शिर्षकाची माहिती पुरविली आहे. प्रत्यक्षात या पत्रासोबत तहसीलदार, खुलाताबाद यांनी कोणतीही माहिती या पत्रासोबत जोडलेली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कथित माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-१२-२००८ रोजी त्यांच्या कार्यालयात सुनावणी ठेवली होती. परंतु यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी कोणते आदेश दिले हे आयोगास आवश्यक त्या

आदेशाच्या प्रतीअभावी आणि जन अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थितीअभावी कळून येत नाही. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने मागणी केलेली संपूर्ण माहिती सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीचा मूळ आक्षेप त्यांच्या कथित मालकीच्या मौजे वेरुळ येथील सर्वे नंबर ९३, ९४ व ९५ च्या मालकी हक्कासंदर्भात आहे. सर्वे नंबर ९४ अपिलार्थीच्या वडिलाच्या नावावरुन गुलाबचंद जोरीलाल या व्यक्तीच्या नावाने आणि सर्वे नंबर ९५ अपिलार्थीच्या वडिलाच्या नावावरुन तनसुखलाल गणेशलाल यांच्या नावाने नोंदवून अयोग्यप्रकारे फेरफार झाल्याचे अपिलार्थीचे म्हणणे आहे. ही नोंद संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणत्या कागदपत्राच्या आधारे केली त्या कागदपत्राच्या प्रती अपिलार्थीस हव्या आहेत आणि सदरील सर्वे नंबर ९३, ९४ व ९५ च्या मालकी हक्काबाबत फेरविचार करणे आवश्यक आहे असे एकंदरीत उपलब्ध कागदपत्रावरुन आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत असल्यामुळे ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता विनामूल्य देणे भाग आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने ही माहिती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल

केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी कोणाही अर्जदाराने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती त्यांना देण्याचे कसे टाळावे याचे उत्तम उदाहरण तहसीलदार, खुलताबाद यांनी घालून दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस तहसीलदार, खुलाताबाद यांच्या दिनांक ०५-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेली कथित माहिती ही कोणत्याही प्रकारे अधिनियमाद्वारे अभिप्रेत असलेली माहिती नसून त्यांनी अशाप्रकारची कथित माहिती पुरवून ही अपिलार्थीची केलेली फसवणूक आहे. तहसीलदार, खुलताबाद यांच्या या प्रकरणीच्या अशा प्रकारच्या कार्यपध्दतीद्वारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील केवळ कर्तव्य परायणतेचा अभावच नव्हे तर त्यातील नितांत सचोटीचा अभाव देखिल सिध्द केला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व संबंधित सहायक कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे. या प्रकरणाशी संबंधीत अशा सर्वांनी, वरील प्रकारे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस स्वतःला पात्र ठरविले आहे. सबब सचिव (महसूल) यांना या प्रकरणाशी संबंधित तहसीलदार, खुलताबाद व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. तहसीलदार खुलाताबाद यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव महसूल यांना, या प्रकरणाशी संबंधित तहसीलदार, खुलताबाद व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. हुसैन खाँ जमाल खाँ पिंजारी, मु.पो. कसाबखेडा, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२६०

निर्णय दिनांक २१-१२-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. महमंद गौस गुलाम मुंशी,<br>रा. घर नं., ६५०, पेन्शनपुरा, छावणी,<br>औरंगाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तंत्र अधिकारी,<br>कार्यालय जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,<br>जालना | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,<br>जालना | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-११-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि सुनावणीच्या दिवशी अपिलीय अधिकारी हे गैरहजर होते त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील

आयोगाकडे सादर केले असून या अपील अर्जात त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी यासंदर्भात आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या कार्यालयास मूळात अपिलार्थीचा दिनांक ०३-१०-२००८ रोजीचा प्रथम अर्ज व दिनांक १४-११-२००८ रोजी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेले प्रथम अपील हे एकाच दिवशी म्हणजे दिनांक १५-११-२००८ रोजी प्राप्त झाले. सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक २६-११-२००८ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी ठेवली असता सुनावणीमध्ये अपिलार्थीने तक्रार नाही असे सांगितले. त्यामुळे त्यांनी दिनांक २६-११-२००८ रोजी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पुरविली. या प्राप्त माहितीवर अपिलार्थीने दिनांक १२-१२-२००८ रोजीच्या पत्रान्वये काही आक्षेप नोंदविले. या आक्षेपांची पुर्तता करुन त्यांनी दिनांक ०९-०१-२००९ रोजी अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. या संदर्भातील अपिलार्थीचे त्यांना माहिती प्राप्त झाल्याची पोच सही असलेले पत्र जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केले आहे. यावरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज केल्यानंतर त्यांना प्राप्त झाली आहे आणि पोच पत्रामध्ये अपिलार्थीने पुढे असे नमूद केले आहे की, त्यांचे विचाराधीन प्रकरण बंद करण्यास त्यांची सहमती आहे व त्यांना संपूर्ण माहिती संबंधितांकडून प्राप्त झालेली आहे. खुद्द अपिलार्थीनेच जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज केल्यानंतर माहिती प्राप्त झाल्याचे कबूल केल्यानंतर, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळ्याने विचार करण्याचे

कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महमंद गौस गुलाम मुंशी, रा. घर नं., ६५०, पेन्शनपुरा, छावणी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तंत्र अधिकारी, कार्यालय, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२६१

निर्णय दिनांक २१.१२.२००९

१ श्री. जयराम सिध्देश्वर कंचलीवार, : अपिलार्थी
रा. किनवट, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय, किनवट, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार,
तहसील कार्यालय, किनवट, जि. नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय किनवट, जि. नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीच्या आत माहिती न मिळाल्यामुळे व त्यांना अपेक्षित असलेली माहिती देण्यास संबंधित जन माहिती अधिकारी टाळत असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २३.०५.२००२ ते २००८ या कालावधीमध्ये त्यांनी शेत सर्वे नंबर २२३, किनवट येथील कोणकोणत्या प्लॉट धारकांकडून एन.ए. टॅक्स वसूल केला होता त्या प्लॉट धारकाचे नाव व प्लॉट क्रमांक आणि जर टॅक्स वसूल केला नसेल तर का केला नाही या मुद्यांसंदर्भात व्यक्तिशः माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती मुदतीच्या आत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ११.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, किनवट यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी या अपील अर्जावर वेळोवेळी सुनावणी ठेवली. तथापि प्रत्यक्षात सुनावणी न घेता कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर ते वेळोवेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपस्थित राहिल्यानंतर देखिल त्यांना संबंधित तलाठ्याने कोणतीही माहिती पुरविली नाही. त्यामुळे त्यांनी दिनांक ११.०९.२००८ रोजी तहसीलदार किनवट यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी वेळोवेळी सुनावणीची तारीख पुढे ढकलली आणि अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देण्याचे टाळले. या प्रकरणी त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), किनवट यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात सादर करण्यासाठी संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयामार्फत दिनांक १७.०९.२००८ व ३०.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सूचित करुनही संबंधित मंडळ अधिकारी व तलाठी किनवट यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती सादर न केल्याने त्यांना अपिलार्थीस अपेक्षित माहिती पुरविता आली नाही. ते ही माहिती संबंधितांचा पाठपुरावा करुन ती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण दोन मुद्यांवर माहिती मागविली असून, या माहितीपैकी किनवट येथील शेत सर्वे नंबर २२३ मधील ज्या प्लॉट धारकांकडून तहसीलदार किनवट यांनी दिनांक २३.०५.२००२ ते २००८ या कालावधीमध्ये एन.ए. टॅक्स वसूल केला त्या प्लॉट धारकांची यादी व त्यांचे प्लॉट क्रमांक एवढीच माहिती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित माहिती - एन.ए. टॅक्स वसूल केला नसेल तर का केला नाही - अशी जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण अथवा खुलासा अपेक्षित करणारी माहिती त्यांना, ती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास उपलब्ध करुन देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. या अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दलचे स्पष्टीकरण अर्जदाराने मागणे आणि तसे स्पष्टीकरण जन माहिती अधिकाऱ्यांनी अर्जदारास देणे अशाप्रकारच्या प्रक्रियांचा समावेश नाही. अपिलार्थीस

उर्वरित माहिती उपस्थित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), किनवट यांनी १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर आज रोजी कबूल केले आहे. हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेल्या माहितीतील, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली व अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागविली आहे. ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी विहित मुदतीत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर व या अपिलावर निर्णय देण्यासाठी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २०.१०.२००८ रोजी व दिनांक २९.११.२००८ रोजी स्मरणपत्र देखिल दिली असून, ही दोनही स्मरणपत्रे तहसीलदार, किनवट यांच्या कार्यालयास प्राप्त झालेली आहेत. यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी तहसीलदार किनवट व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांनी हेतुपूरस्सर टाळाटाळ केली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी हे तत्कालीन नायब तहसीलदार (श्री. व्ही. जे. वावळे सध्या किनवट येथे कार्यरत) व संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी जे या प्रकरणी जन माहिती अधिकरी यांना माहिती देण्यासाठी प्रत्यक्षात जबाबदार आहेत, असे सर्वजण एकत्रित जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी केवळ जन माहिती अधिकारी एकटेच नव्हे तर त्या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांना देखिल जन माहिती अधिकारी यांचे म्हणून समजावे, अशी तरतूद आहे. ही तरतूद पाहता, या प्रकरणी तत्कालीन नायब तहसीलदार (महसूल), श्री. व्ही. जे. वावळे, मंडळ अधिकारी व तलाठी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळून एकत्रितपणे स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. तसेच या प्रकरणाशी संबंधित तत्कालीन

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, श्री. एस. एम. लाड यांच्या गैरवर्तनाची आयोगाने प्रकर्षाने नोंद घेतली असून, आता त्यांना शासकीय सेवेतून बडतर्फ केल्याचे आयोगास उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले असल्यामुळे, त्यांचेवर कोणत्याही कारवाईची आयोग शिफारस करीत नाही. आज रोजी आयोगासमोर संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक उपस्थित नाहीत. त्यांच्या बचावाची संधी देण्याच्या दृष्टिने त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी हेतुपूरस्सर टाळाटाळ केल्याने त्यांच्यावर या प्रकरणी एकूण रु. २५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोागास हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ सादर करावा. या कालावधीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस हेतुपूरस्सर माहिती देण्याचे टाळले असल्याचे त्यांना मान्य आहे, असा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. सदर आदेश संबंधित तत्कालीन मंडळ अधिकारी व तलाठी किनवट यांना तामिल करण्याची जबाबदारी सध्याचे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), किनवट यांची राहील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), किनवट यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. संबंधित नायब तहसीलदार (महसूल -२) तथा तत्कालीन जन माहिती अधिकारी, किनवट (श्री. बी.जे. वावळे) व या प्रकरणाशी संबंधित तत्कालीन तलाठी आणि

मंडळ अधिकारी यांना एकूण २५,०००/- रु. इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा या सर्वांनी, हे आदेश निर्गमित होताच आयोगास ३० दिवसाच्या आत सरळ सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जयराम सिध्देश्वर कंचलीवार, कृष्णा गारमेंटस्, मेन रोड, किनवट, ता. किनवट, जि. नांदेड - ४३१८०४

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. बी.जे. वावळे, नायब तहसीलदार (महसूल), किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे).

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९३

निर्णय दिनांक २१.१२.२००९

१ सौ. एस. पी. नैण, : अपिलार्थी
द्वारा, मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण,
कंधार परिक्षेत्र, ता. कंधार, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उपसंचालक, सामाजिक वनीकरण,
नांदेड विभाग, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक २४.०९.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांनी दिनांक ०५.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी दिनांक ०३.१२.२००८ रोजी सुनावणी घेऊन नियमबाह्य निर्णय दिला

असल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००१ ते २००९ या कालावधीतील, त्यांच्या कार्यालयातर्फे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या कामाची यादी व मजुरांच्या उपस्थितीच्या हजेरीपत्रकाच्या सत्यप्रती व इतर अनुषंगिक माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली व उर्वरित माहितीकरिता रु. ५५,०००/- इतक्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील तहसील कार्यालयाशी संबंधित माहिती अपिलार्थीस तहसील कार्यालयाकडून प्राप्त करुन घेण्याच्या सूचना देखिल त्यांनी याच पत्रामध्ये अपिलार्थीस दिल्या. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०५.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३.१२.२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीने त्यांना माहिती प्राप्त झाली, असे सांगितल्याने अपिलार्थीचे अपील खारीज केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाच्या प्रतीवर अपिलार्थीची स्वाक्षरी उपलब्ध आहे. तथापि या नंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी या गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मजुरांच्या हजेरीपत्रकाच्या प्रतींव्यतिरिक्त त्यांच्या विभागाशी संबंधित माहिती अपिलार्थीस दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे अंदाजे शुल्क कळविताना, या शुल्काचा तपशील जो त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे कळविणे त्यांना अनिवार्य आहे, तो तपशील त्यांनी अपिलार्थीस कळविलेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस दिनांक १४.१०.२००८ रोजी लिहिलेले पत्र हे अवैध होत आहे. तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती तहसील कार्यालयाशी संबंधित होती, त्या माहितीसाठी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जाची प्रत संबंधित तहसील कार्यालयात अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत पाठवून, त्याची प्रत अपिलार्थीस त्यांनी या प्रकरणी पाठविणे हे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे अपेक्षित होते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अशीही कृती या प्रकरणी केली नाही व परिणामी अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले. अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी अशा प्रकारे जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी आता अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील जी माहिती तहसील कार्यालयाशी संबंधित आहे, ती तहसील कार्यालयाकडून प्राप्त

करुन घेऊन व तसेच त्यांच्याकडील मजूरांच्या मस्टरच्या सर्व झेरॉक्स प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी आता द्यावयाची उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस. पी. नैण, द्वारा, मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण, कंधार परिक्षेत्र, ता. कंधार, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण, नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९४

निर्णय दिनांक २१.१२.२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, श्री. संत नामदेव महाराज
विद्यालय, बोरी खुर्द, ता. कंधार, जि.
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
सचिव, महात्मा फुले शिक्षण प्रसारक
मंडळ, शेंबोळी, ता. कंधार, जि. नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.०५.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी त्यांच्या दिनांक २४.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मुख्याध्यापकाने मुदतीच्या आत न दिल्यामुळे त्यांनी दिनांक १०.०१.२००८ रोजी संस्थेच्या सचिवांच्याकडे दिनांक १०.०१.२००८ रोजी पोस्टरजिस्ट्रीमार्फत प्रथम अपील दाखल केले असता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबित

ठेवल्याकारणाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे कोणी प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये, मुख्याध्यापक, श्री. संत नामदेव महाराज विद्यालय, बोरी खुर्द, ता. कंधार, यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने दिनांक २४.११.२००७ रोजी अर्ज पाठवून दिल्याचे तसेच सचिव, महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ, शेंबोळी, ता. कंधार, यांच्याकडे दिनांक १०.०१.२००८ रोजी, रजिस्टर्ड पोस्टाने प्रथम अपील दाखल केल्याचे नमूद केले आहे. तथापि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रामध्ये या संदर्भातील कोणताही पुरावा अपिलार्थीने आयोगास सादर केलेला नाही. तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी देखिल अपिलार्थी हे अशाप्रकारचा एखादा पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध असल्यास तो आयोगासमोर सादर करण्यासाठी उपस्थित नाहीत. हे पाहता, आवश्यक त्या पुराव्याअभावी आणि सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे, व तसेच आयोगास मुख्याध्यापकांचे दिनांक २१.१२.२००९ रोजी फॅक्सद्वारे प्राप्त झालेले पत्र - ज्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती पोस्टाने पाठविली, असे नमूद केले आहे, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक** **२१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बस्टॅण्ड रोड, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री संत नामदेव महाराज विद्यालय, बोरी खुर्द, ता. कंधार, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ, शेंबोळी, मु. पाताळगंगा संचलित, श्री. संत नामदेव महाराज विद्यालय, बोरी खुर्द, ता. कंधार, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९५
निर्णय दिनांकः २१-१२-२००९

१. श्री. रामचंद्र दिनकर रत्नपारखी, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
नागरी सहकारी बँक विभाग,
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,पुणे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकारी संस्था,म.रा.पुणे.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपनिबंधक,सहकारी संस्था (नागरी बँका),
सहकार आयुक्त कार्यालय,म.रा.पुणे-१.
जन अपिलीय अधिकारी : अपर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकारी संस्था, म.रा., पुणे-१

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या पुणे येथील कार्यालयात दि.०१.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून, अपिलार्थीने सदर अपील त्यांनी, त्यांचे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांनी नामंजूर केले असल्यामुळे आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन १९६० ते दि. ३१.०३.२००८ या कालावधीमधील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"नागरी सहकारी बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक या बँकांनी वाटप केलेल्या कर्जाच्या परत फेडीच्या थकबाकी कर्जावर किती टक्के दंड व्याज आकारावे या संदर्भात आपल्या कार्यालयाने काढलेल्या परिपत्रकाची सत्य प्रती मिळणे बाबत. (उदा. आपल्या कार्यालयाचे परिपत्रक क्र. नागरी बँका/डी-४/आदर्श उपविधी/स्विकृती/२००३ दि.१/२/२००३ या मध्ये थकीत कर्जावर द.सा.द.शे.२ टक्के व्याज आकारावे असा परिपत्रकात उल्लेख आहे.)"

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १६.०५.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस अपेक्षित असलेली कोणतीही परिपत्रके त्यांच्या कार्यालयाने काढली नसल्याचे अपिलार्थीस अवगत केले. तसेच अपिलार्थीस त्यांनी या पत्रामध्ये असेही स्पष्ट केले की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका थकित कर्जावर भारतीय रिझर्व बँक व नाबार्डच्या सूचनेनुसार दंड व्याज आकारतात, यासंबंधीची परिपत्रके अपिलार्थीस जिल्हा बँकांमध्ये मिळू शकतील. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अमान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने त्यांचे परिपत्रक दि. ०१.०२.२००३, ज्याचा संदर्भ त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये केलेला आहे, त्याद्वारे महाराष्ट्रातील सर्व नागरी सहकारी पतसंस्थांतील सर्व थकित रकमेवर दोन टक्के व्याज आकारणी करावी,अशी दुरुस्ती त्यांच्या

स्तरावर निश्चित करण्यासाठी एक परिपत्रक निर्गमित केले आहे. त्यामुळे याचप्रमाणे सर्व नागरी सहकारी बँका व नागरी पतसंस्था यांच्याकडील थकित कर्जाच्या रकमेवर किती टक्के दंडाची रक्कम आकारावी ,याविषयीच्या परिपत्रकाची मागणी त्यांनी केलेली आहे. अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, सहकारी बँकांच्या उपविधीत दुरुस्ती करण्याचे अधिकार फक्त सहकार आयुक्त यांनाच असल्यामुळे हे परिपत्रक सहकार आयुक्त यांनी निश्चितपणे काढले असणार, तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व नागरी सहकारी बँका यांनी किती टक्के दराने दंड आकारावा, यासंदर्भातील भारतीय रिझर्व बँक व नाबार्ड यांच्या आदेशाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात निश्चितपणे प्राप्त होत असणार, त्या प्रतींची त्यांना आवश्यकता आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून या युक्तिवादामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, नागरी सहकारी बँकांची जरी सहकार कायद्याअंतर्गत नोंदणी होत असली तरी त्यांना बँकींग व्यवसायाचा परवाना भारतीय रिझर्व बँक यांनी दिलेला आहे, त्यामुळे त्यांच्या व्यवसायाशी संबंधित बाबींवर रिझर्व बँकेचे प्रत्यक्षतः नियंत्रण आहे. भारतीय रिझर्व बँकेने नागरी सहकारी बँकांनी स्वीकारलेल्या ठेवी आणि या कर्जावर आकारणी करण्यासाठी व्याजदर निश्चित करण्याची मुभा संबंधित बँकांना दिली आहे. त्यामुळे अशाप्रकारची परिपत्रके सहकार आयुक्त कार्यालयाने काढण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही, किंबहुना ती अस्तित्त्वातच नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी योग्य प्रकारे उत्तर दिले आहे. मूळात सहकार आयुक्त यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीच्या संदर्भात कोणतेही परिपत्रक काढले नसल्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मूळातच अस्तित्त्वात नाही. त्यामुळे ती अपिलार्थीस देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अशाप्रकारची परिपत्रके असावीत, हा अपिलार्थीने केलेला एक अंदाज आहे. यासंदर्भात त्यांनी कोणताही पुरावा

आयोगाकडे अथवा त्यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केलेला नाही. केवळ पतसंस्थांच्यासंदर्भात सहकार आयुक्त यांनी दंडनीय व्याजासंदर्भात एखादे परिपत्रक काढले, याचा अर्थ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि नागरी सहकारी बँका यांच्या संदर्भातही सहकार आयुक्त यांनी अशाप्रकारची परिपत्रके काढली असावीत, असा होत नाही, हा केवळ अपिलार्थीचा अंदाज आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठी केलेल्या अर्जासंदर्भात, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्रत्यक्ष ताब्यात असलेली माहिती देण्यासंदर्भात निर्णय घेणे एवढीच सीमित प्रक्रिया अधिनियमानुसार अभिप्रेत आहे. या प्रकरणी मूळात सहकार आयुक्त यांनी कोणतेही परिपत्रक जारी केलेले नसल्यामुळे व अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या परिपत्रकाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे, ही माहिती त्यांनी अपिलार्थीस देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक: २१-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रामचंद्र दिनकर रत्नपारखी, रत्नकुंज निवास, जवाहर कॉलनी, नगर रोड,बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,सहकारी संस्था (नागरी बँका), सहकार आयुक्त कार्यालय,म.रा.पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक,सहकारी संस्था,म.रा.पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२००५
निर्णय दिनांक: २२-१२-२००९

१. श्री. हनुमान बाबाराव रहाट (पाटील), : अपिलार्थी
रा. खुडज, ता.सेनगाव, जि.हिंगोली.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अधिकारी, हिंगोली

२. जन अपिलीय अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.
प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळेवर माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकाऱ्यावर दंडात्मक कारवाई करण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांनी १० हे.९२ आर.जमीन असताना ती १२ हे.६७ आर. केल्याबद्दल तहसीलदार, हिंगोली यांनी चौकशी केली काय? अहवाल दिला काय? - या मुद्यांवरील माहिती मागविली आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १४.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांच्या दि. २८.०१.२००८ रोजीच्या आदेशाप्रमाणे तहसीलदार, सेनगाव यांचा चौकशी अहवाल आला काय? नसल्यास कशामुळे आला नाही, जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे लोकशाही दिनामध्ये ठेवलेले प्रकरण आपल्या कार्यालयाने चौकशीसाठी दिलेले आहे, तरी दि. ०२.०६.२००८ रोजीची चौकशी किती दिवसात करावयास हवी? चौकशी केली काय? चौकशी केली नसल्यास त्यामागील कारण काय?, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.०७.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील अभिलेखाचे निरीक्षण करुन हस्तगत करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०१.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जावर दि. २४.१०.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत माहिती देण्याचे व उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांचे दि. ३०.०७.२००८ रोजीचे पत्र अपिलार्थीस का मिळाले नाही, याची चौकशी करुन त्यास जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यावर योग्य ती शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचे सूचित केले. तथापि या नंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.३०.०७.२००८ व १७.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १४.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे.त्यांच्या प्रथम अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय व स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती दोन मुद्यांद्वारे मागितल्याचे येथे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने माहितीची मागणी केल्यानंतर ती अर्जदारास देण्यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींप्रमाणे कार्यवाही करणे इतपतच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या एखाद्या कृतीबद्दलचे कारण अथवा स्पष्टीकरण विचारुन त्यांचे वैयक्तिक अभिप्राय मागणे अशाप्रकारच्या प्रक्रियेचा समावेश, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीचा माहितीसाठीचा त्यांनी केलेला मूळ अर्जच अवैध असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितली आहे. परंतु व्यक्तिशः माहिती मागूनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ही माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी ते कधी उपस्थित राहिले, याचा कोणताही सबळ पुरावा अपिलार्थीने आयोगासमोर सादर केलेला नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी या घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर माहिती देण्याचे नाकारलेले

नाही. त्यामुळे अपिलार्थीची संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करण्याची विनंती आयोग अमान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः २२-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हनुमान बाबाराव रहाट (पाटील),रा. खुडज, ता.सेनगाव, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२००६
निर्णय दिनांक: २२-१२-२००९

१. श्री. दिपक विष्णू घुटे, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
उपसा सिंचन विभाग, उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी,चुकीची व अपूर्ण माहिती दिल्यामुळे, जन अपिलीय अधिकारी यांनी अयोग्य निकाल दिल्यामुळे अपिलार्थीस नुकसान भरपाई मिळण्याकरिता व जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याबाबत आणि त्यांनी जाणुनबुजून चुकीचे काम केल्याबद्दल अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असून या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १३.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये उस्मानाबाद तालुक्यातील वाघोली मध्यम प्रकल्पांतर्गत मौ. नरसिंहवाडी येथील शेतजमीन ग.नं.६८ व १६२ मधून जाणाऱ्या कालव्याच्या कामासंदर्भात, जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १२ मुद्यांद्वारे व्यक्तिशः माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.०७.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १२५/- इतके अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयामध्ये भरणा करण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने त्याचदिवशी या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीने ही माहिती दि. १९.०७.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः हस्तगत करुन घेतली. तथापि प्राप्त माहिती अपूरी, चुकीची व खोटी असल्याचे वाटल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद यांच्याकडे दि. १८.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर अधीक्षक अभियंता यांनी दि. ०२.०९.२००८ रोजी आदेश पारित करुन या आदेशामध्ये जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती बरोबर असल्याच्या निर्णयाप्रत येऊन अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दि. १८.०८.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतेवेळी अपिलार्थी हे सुनावणीसाठी उपस्थित होते. अपिलार्थीच्या शंकांचे त्यांनी तांत्रिकदृष्टया

निरसन केले असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती अपिलार्थीस दिल्याचे अनुमान काढले आहे व अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील जी माहिती देय आहे, ती अपिलार्थीस त्यांनी वेळेत पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस दि. १३.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जातील एकूण १२ मुद्यांपैकी मुद्दा क्र. ७,८,९ व ११ या मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे वैयक्तिक अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागविली असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे वैयक्तिक अभिप्राय मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारचे संबंधित प्रकरणावर स्वतःचे वैयक्तिक अभिप्राय अर्जदारास देणे अशाप्रकारच्या प्रक्रियेचा माहिती अधिकार अधिनियमामध्ये समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ७,८,९ व ११ शी संबंधित माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या व्याप्तीबाहेरची असल्याचे सिध्द होत असल्याने, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहितीद्वारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस योग्य माहिती दिल्याचा निष्कर्ष सक्षम तांत्रिक अधिकाऱ्याने काढला आहे. तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती खोटी, चुकीची व अपूर्ण का वाटते, जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निकाल अयोग्य कसा आहे, हे आयोगास स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत अथवा या मुद्यासंदर्भात त्यांनी आयोगाकडील अर्जामध्ये कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना निश्चितपणे कोणत्या स्वरुपात किती नुकसान भरपाई अपेक्षित आहे आणि माहिती अधिकाऱ्याने जाणूनबुजून चुकीचे काम कसे केले आहे, हे मुद्दे स्पष्ट करणारा

कोणताही तपशील  दिलेला नाही  आणि आयोगासमोर ते  याचे तोंडी स्पष्टीकरणासाठी आज रोजी उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २२-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिपक विष्णू घुटे,रा.समतानगर,उस्मानाबाद,ता.जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,उपसा सिंचन विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२००८
निर्णय दिनांकः २२-१२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. कु. महामाया सखाराम जमधाडे,<br>रा.परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.),<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद,उस्मानाबाद | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूरी व अर्धवट माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उस्मानाबाद जिल्हा परिषदेमध्ये सन २००८-२००९ मध्ये “परिचर” या पदावर भरती केलेल्या सर्व खेळाडूंच्या गुणांच्या व खेळाच्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती व अनुसूचित

जातीच्या खेळाडूंच्या गुणांची व कागदपत्रांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०८.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस निवड झालेल्या सर्व खेळाडू उमेदवारांची माहिती पाहिजे की निवड झालेल्या उमेदवारासह सर्व खेळाडू उमेदवारांची माहिती पाहिजे, याचा बोध होत नसल्याने, माहिती देण्यास अडचण येत असल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित केलेल्या मुद्याचा खुलासा अपिलार्थीने त्यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०६.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.१०.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दि. १४.११.२००८ रोजी माहिती दिली. परंतु ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १४.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे. त्यांनी मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सर्व खेळाडूंचे लेखी व तोंडी परीक्षेतील गुण आणि खेळाडूंच्या खेळाच्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती, ही माहिती मागितली असता, त्यांनी खेळाच्या लेखी व तोंडी परीक्षेचे गुण कळविले नाहीत. तसेच अनुसूचित जाती व्यतिरिक्त इतर खेळाडूंच्या प्रमाणपत्रांच्या प्रती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. १८.०८.२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात काही खुलासा मागितला होता. तथापि अपिलार्थीने अशाप्रकारचा खुलासा त्यांच्याकडे सादर न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना विलंब लागला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २४.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी पूर्णपणे सुसंगत आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडे झालेल्या “परिचर” भरतीमधील सर्व खेळाडू उमेदवारांच्या गुणांची व त्यांच्या खेळाच्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती मागितल्या आहेत. अपिलार्थीस फक्त निवड झालेल्या उमेदवारांचीच माहिती हवी आहे की सर्व उमेदवारांची माहिती हवी याचा पेच जन माहिती अधिकारी यांना पडण्याचे कोणतेही कारण नव्हते, असे अपिलार्थीच्या मूळ अर्जावरुन दिसून येते. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.१०.२००८ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांना मुलाखतीसंदर्भातील माहिती तातडीने देण्याचे सूचित केल्यानंतर देखील माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दि. १४.११.२००८ रोजी अपूर्ण माहिती दिली असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. यासंदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.११.२००८ रोजी पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी उमेदवारांच्या लेखी व तोंडी परीक्षेतील गुणांची व तसेच अनुसूचित जाती वगळता इतर सर्व उमेदवारांच्या खेळाच्या प्रमाणपत्राच्या प्रती दिल्या नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपूर्ण माहिती दिल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस उर्वरित माहिती विनामूल्य देण्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता, जन

माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीस अद्यापपावेतो न दिलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे. त्या माहितीचे आयोगाने अवलोकन केले असता, ती, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित अपेक्षित माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास सकृतदर्शनी आढळून आले आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २४.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्पष्ट स्वरुपात माहिती मागवूनही अपिलार्थीच्या मूळ अर्जावर वेगवेगळया शंका उपस्थित करुन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कालापव्यय केला असल्याचे व त्याद्वारे अपिलार्थीस सत्य माहिती देण्याचे टाळले असल्याचे या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी श्री.सुधीर भातलवंडे (सध्या जिल्हा परिषद, नांदेड येथे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) या पदावर कार्यरत) हे या प्रकरणी अपिलार्थीस वेळेत माहिती प्राप्त न होण्यासाठी नि:संशयपणे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस अशाप्रकारे अपूर्ण माहिती देऊन पूर्ण माहिती देण्याचे टाळण्याच्या कृतीद्वारे स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी/कर्मचारी, ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीप्रमाणे माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, अशा सर्वांवर एकत्रितपणे प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व कार्यालयीन सहाय्यक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांक: २२-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. कु. महामाया सखाराम जमधाडे,द्वारा-सारनाथ कॉलनी, धार रोड,परभणी ता.जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.),जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांना

या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२६५
निर्णय दिनांक २२/१२/२००९

१ श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल : अपिलार्थी
रा. जाफ्राबाद, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
जाफ्राबाद, जि. जालना

**निर्णय**

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजारगल्ली, मेनरोड, जाफ्राबाद, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२६६
निर्णय दिनांक २२/१२/२००९

१ श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल : अपिलार्थी
रा. जाफ्राबाद, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
जाफ्राबाद, जि. जालना

**निर्णय**

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजारगल्ली, मेनरोड, जाफ्राबाद, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२६७
निर्णय दिनांक २२/१२/२००९

१ श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल : अपिलार्थी
रा. जाफ्राबाद, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
जाफ्राबाद, जि. जालना

**निर्णय**

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजारगल्ली, मेनरोड, जाफ्राबाद, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२९१
निर्णय दिनांक २२/१२/२००९

१ श्री. राधेशाम मोहनलाल अग्रवाल : अपिलार्थी
रा. धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपनिबंधक,
सहकारी संस्था, धुळे
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपनिबंधक,
सहकारी संस्था, धुळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक ०१.०९.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील श्री. अग्रसेन सहकारी पतसंस्था मर्यादित, धुळे या पतसंस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित पतसंस्थेच्या स्तरावरील असल्याने त्यांनी त्यांच्या दि. ०६.०९.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचा अर्ज संबंधित पतसंस्थेच्या चेअरमन / व्यवस्थापकांकडे पाठवून त्यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे व अपिलार्थीस संबंधित

संस्थेस संपर्क साधुन माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. सदर पतसंस्थेच्या व्यवस्थापकांनी त्यांच्या दि. ०९.०९.२००८ रोजीच्या पत्रान्वये, माहिती अधिकार अधिनियम-२००५ हा पतसंस्थेस लागू होत नसल्याने माहिती देता येत नसल्याचे उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका धुळे यांना कळविले व या पत्राची प्रत अपिलार्थीस अग्रेषित केली. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने परत उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक १२.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांनी सुनावणी घेऊन दि. ०१.१०.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना तात्काळ विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे चेअरमन / व्यवस्थापक, अग्रसेन नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, धुळे यांना आदेशित केले. तथापि यानंतरही माहिती उपलब्ध न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे हे उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांच्या असे निदर्शनास आणण्यात येत आहे की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी

पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता, मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस जर ते या पतसंस्थेचे सदस्य असतील तर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

या प्रकरणी असे आढळून येत आहे की, सहनिबंधक यांचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदी अंतर्गत संबंधित पतसंस्थेवर नियामकीय (Regulatory) पध्दतीचे नियंत्रण आहे. सहकार कायद्यातील कलम ७९ प्रमाणे ते अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित पतसंस्थेकडून प्राप्त करुन घेऊ शकतात. माहिती अधिकार अधिनियमातील कलम "२ च" मध्ये स्पष्ट केलेल्या माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये "त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती" याचा समावेश आहे. या प्रकरणी उपनिबंधक, सहकारी संस्था हे "सार्वजनिक प्राधिकरणाचे" प्रतिनिधी आहेत. त्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित पतसंस्थेकडून प्राप्त करुन घेण्याचे सहकार अधिनियमातील तरतुदीनुसार पूर्ण अधिकार आहेत. हे पाहता उपनिबंधक सहकारी संस्था यांनी ही माहिती संबंधित पतसंस्थेकडून सहकार कायद्यातील योग्य त्या कलमांचा आधार घेऊन, नंतर ती अपिलार्थीस आवश्यकतेप्रमाणे देण्यासंदर्भात निर्णय घेणे उचित होईल, असे आयोगास वाटते.

वरील पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र. २९१/०९ निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २२-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राधेशाम मोहनलाल अग्रवाल, ३९, बडगुजर प्लॉट, पारोळारोड, धुळे.

२. चेअरमन / व्यवस्थापक, श्री. अग्रसेन सहकारी पतसंस्था मर्यादित, धुळे, पुष्पांजली मार्केट, मनोहर चित्र मंदिर समोर, आग्रारोड, धुळे.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२९२
निर्णय दिनांक २२/१२/२००९

१ श्री. संतोष महादु बागले : अपिलार्थी
रा.धुळे

**विरुध्द**

१ चेअरमन, : प्रतिवादी
नालंदा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, धुळे
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपनिबंधक,
सहकारी संस्था, धुळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक १३.१०.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे चेअरमन, नालंदा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, धुळे यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमामध्ये विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे ता. धुळे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक ३१.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांनी सुनावणी घेऊन दि. १२.१०.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील मान्य

केले व त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे चेअरमन / व्यवस्थापक, नालंदा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, धुळे यांना आदेशित केले. तथापि यानंतरही माहिती उपलब्ध न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे हे उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता, मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस जर ते या पतसंस्थेचे सदस्य असतील तर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांचे दि. १२.१०.२००८ रोजीचे आदेश अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. २९२/०९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संतोष महादु बागले, २१, उदयनगर, विद्यावर्धिनी कॉलेजजवळ, साक्रीरोड, धुळे.

२. चेअरमन, नालंदा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, चंपाबाग, साक्रीरोड, धुळे.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२९९
निर्णय दिनांक २२/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. भदाणे चंद्रकांत भानुदास<br>रा. अमळनेर, जि. जळगांव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ सचिव,<br>मंगलमुर्ती नागरी सहकारी पतपेढी लि., अमळनेर,<br>जि. जळगांव | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक,<br>सहकारी संस्था, अमळनेर, जि. जळगांव | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक ०७.०८.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे सचिव, मंगलमुर्ती नागरी सहकारी पतपेढी लि., अमळनेर, जि. जळगांव यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमामध्ये विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था, अमळनेर, जि. जळगांव यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक १३.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, अमळनेर, जि. जळगांव यांनी सुनावणी घेऊन दि. ०३.११.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. याव्दारे

त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना १५ दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याचे सचिव, मंगलमुर्ती नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अमळनेर यांना आदेशित केले. तथापि यानंतरही माहिती उपलब्ध न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, संबंधित पतसंस्थेचे सचिव व सहायक निबंधक, सहकारी संस्था, अमळनेर, जि. जळगांव हे सर्वजण उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित अपिलार्थी, सचिव, मंगलमुर्ती नागरी सहकारी पतपेढी मर्या., अमळनेर व सहायक निबंधक, सहकारी संस्था, अमळनेर, जि. जळगांव यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले आहे की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता, मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस जर ते या पतसंस्थेचे सदस्य असतील तर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, अमळनेर, जि. जळगांव यांचे दि. ०३.११.२००८ रोजीचे आदेश अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील क्र. २९९/०९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भदाणे चंद्रकांत भानुदास, समर्थ नगर, कॉटन मार्केट समोर, अमळनेर, जि. जळगांव.

२. सचिव, मंगलमुर्ती नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, मंगलमुर्ती चौक, कचेरी रोड, अमळनेर, जि. जळगांव.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, अमळनेर, जि. जळगांव.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४९१
निर्णय दिनांक २२/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल<br>रा. जाफ्राबाद, जि. जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>जाफ्राबाद, जि. जालना | | |

**निर्णय**

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजारगल्ली, मेनरोड, जाफ्राबाद, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०११

निर्णय दिनांक २२-१२-२००९

१ श्री. रामराव विठ्ठल राठोड, : अपिलार्थी
रा. विठ्ठलनाईक तांडा, सकनूर, पो. बाऱ्हाळी,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, मुखेड,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मिळाली नसल्याने व तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेतल्यामुळे व निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असून या अपील अर्जामध्ये त्यांनी आयोगास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाची दखल न घेतल्यामुळे त्यांच्यावर दंडनीय कारवाई करण्याची व खातेनिहाय चौकशी आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे विठ्ठलनाईकतांडा येथील वस्तीशाळेची विविध मुद्दयावर सन २००२ ते सप्टेबर २००८ या कालावधीशी संबंधित मोठया प्रमाणात व्याप्ती असलेली माहिती मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेतल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक २२-०९-२००८ रोजीच्या अर्जास त्यांनी दिनांक ०४-१०-२००८ रोजीच्या पत्राने प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती काढण्यासाठी त्यांच्याकडे निधी उपलब्ध नसल्याचे व त्यामुळे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयात येऊन पाहून जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने त्यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते माहिती पाहण्यासाठी आले नाहीत. यानंतर अपिलार्थीने दिनांक ०३-११-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी ठेवली होती. तथापि सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर राहिले होते. शिक्षणाधिका-याने तोंडी सूचना दिल्यानुसार त्यांनी

अपिलार्थीस दिनांक २१-०१-२००९ रोजी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य हस्तांतरीत केली आहे व तसेच अपिलार्थीस ही माहिती मिळाल्याची पोच त्यांनी घेतली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीस ही माहिती त्यांनी पाच ग्रामस्थांच्या उपस्थितीत दिली असून या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती देताना त्यांनी केलेल्या पंचनाम्याची प्रत देखील आयोगास दाखविली.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दिनांक २१-०१-२००९ रोजी पाच साक्षीदारांच्या उपस्थितीत व्यक्तिशः हस्तांतरीत केलेली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर अपिलार्थीचे कोणतेही भाष्य आयोगास अद्यापपावेतो प्राप्त झालेले नाही. तसेच प्राप्त माहितीवर भाष्य करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता, अपिलार्थीस अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे अनुमान आयोग काढत आहे. अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी आयोगाकडे दिनांक २६-१२-२००८ रोजी व्दितीय अपील नोंदविल्यानंतर प्राप्त झाली असल्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामराव विठ्ठल राठोड, रा. विठ्ठलनाईक तांडा, सकनूर, पो. बाऱ्हाळी, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०१२

निर्णय दिनांक २२-१२-२००९

१ श्री. सुंदरराव भाऊराव पाटील, : अपिलार्थी
मु. आलेश्वर, पो. डोंजा व्हाया सोनारी, तालुका परंडा,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण युनिट
शेळगांव, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, उपविभागीय कार्यालय, परंडा,
तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनी मर्यादित, परंडा, जि. उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये

अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण युनिट शेळगांव, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे मौजे आलेश्वर, तालुका परंडा या गावास होणा-या निवासी वीज वितरणासंदर्भात ०१ जानेवारी २००८ ते ३० जून २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण दहा कलमी प्रपत्रामध्ये व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परंडा यांच्याकडे दिनांक ०७-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जावर आणि प्रथम अपील अर्जावर दोनही अधिका-यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे. या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी हे सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनी मर्यादित, परंडा, जिल्हा उस्मानाबाद व अपिलीय अधिकारी हे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उस्मानाबाद हे आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार असून ते अपिलार्थीस ही माहिती दोन दिवसाच्या विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज सहायक अभियंता तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता तो कनिष्ठ अभियंता यांच्याकडे केला आहे. या प्रकरणी सहायक अभियंता हे जन माहिती अधिकारी असल्यामुळे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधित सहायक अभियंता यांच्याकडे, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही. ही कार्यवाही न करण्याची कारणे त्यांना आज रोजी आयोगासमोर सांगता आली नाहीत. हाच प्रकार सहायक अभियंता यांच्या बाबतीत झाला असून त्यांनी अपिलार्थीचे दिनांक ०७-१०-२००८ रोजीचे प्रथम अपील कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद यांच्याकडे पाठवावयास हवे होते तथापि त्यांनी ते स्वत:कडे तसेच विनाकार्यवाही ठेऊन घेतले. परिणामी अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यासाठी एक वर्षाहून जास्त कालावधी व्यपगत झाला. या प्रकरणी जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी या दोनही अधिका-यांचे वर्तन हे माहिती अधिकार अधिनियमातील मूळ तरतुदीशी सुसंगत नाही. संबंधित कनिष्ठ अभियंता श्री. कुलकर्णी शिरीष यांनी या प्रकरणी अपिलार्थीस कोणतीही माहिती न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या

कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच या प्रकरणी संबंधित सहायक अभियंता श्री. जी. जे. नळगीरकर (सध्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उदगीर ग्रामीण येथे कार्यरत) यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज कार्यकारी अभियंता यांच्याकडे न पाठवून त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. त्यांच्यावरही कनिष्ठ अभियंता यांच्याप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाईची व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, मुंबई यांच्याकडे शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगास असे आढळून येत आहे की अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये विहित केलेल्या प्रपत्रामधील रकाना क्र. ५ व ९ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून "कारणे " अशा स्वरुपाची त्यांच्याकडून स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. अशा प्रकारची माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याने ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. उर्वरित माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना देय असलेली उर्वरित सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती अर्जातील प्रपत्रामधील रकाना क्र. ५ व ९ शी संबंधीत माहिती वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, मुंबई यांना, संबंधीत कनिष्ठ अभियंता श्री. कुलकर्णी शिरीष (कार्यालय शेळगांव, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद) आणि संबंधित सहायक अभियंता श्री. जी. जे. नळगीरकर (सध्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उदगीर उपविभाग येथे सहायक अभियंता पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुंदरराव भाऊराव पाटील, मु. आलेश्वर, पो. डोंजा व्हाया सोनारी, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनी मर्यादित, परंडा, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, प्रकाशगड, ५ वा मजला, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०१३

निर्णय दिनांक २२-१२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. कराड दत्तात्रय विठ्ठलराव,<br>रा. भवानीनगर, धारुर रोड, केज, तालुका केज,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग केज, जिल्हा बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात | : जन माहिती अधिकारी | : | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, केज, तालुका केज, जिल्हा बीड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जिल्हा बीड |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांनी दिलेल्या निर्णयाच्या नाराजीने

त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, केज उपविभागामध्ये सन २००७-२००८ या वर्षामध्ये कोणत्या योजनेसाठी किती निधी मंजूर झाला, मंजूर झालेला निधी कशा प्रकारे खर्च झाला व काम पूर्ण करणा-या कंत्राटदाराचे नांव, ही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस केज उपविभागाकडे प्राप्त झालेल्या निधीचे स्त्रोत, लेखाशीर्ष व त्या लेखाशीर्षावर झालेला खर्च एवढी माहिती अपिलार्थीस पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले असता अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत आवश्यक त्या फीसचा भरणा करुन घेऊन माहिती पुरविण्याचा निर्णय देऊन दिनांक १३-०८-२००८ रोजी अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांचा युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, मंजूर झालेला निधी कशा प्रकारे खर्च झाला व काम पूर्ण करणा-या कंत्राटदाराचे नांव या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस

कोणतीही माहिती पुरविली नाही. यासंदर्भात अपिलार्थीस मंजूर झालेला निधी कशा प्रकारे खर्च झाला हे समजण्यासाठी आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमधील प्रत्येक लेखाशीर्ष, या लेखाशीर्षाखाली खर्च केलेल्या कामांची यादी पुरवावी म्हणजे अपिलार्थीस या मुद्दयावरील माहिती प्राप्त होऊ शकेल. कामे पूर्ण करणा-या कंत्राटदारांची नावे यासंदर्भात जन माहिती अधिका-यास आयोगाने विचारणा केली असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज केला त्यावेळी या लेखाशीर्षाखाली एकही काम पूर्ण झाले नव्हते त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस कंत्राटदाराचे नाव पुरविले नाही.

वरील पार्श्वभूमीवर असे आढळून येते की, अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ व ३ च्या संदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो माहिती दिलेली नाही. ती माहिती ते अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधीत संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कराड दत्तात्रय विठ्ठलराव, रा. भवानीनगर, धारुर रोड, केज, तालुका केज, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, केज, तालुका केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०१४

निर्णय दिनांक   २२-१२-२००९

१ श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी, : अपिलार्थी
रा. गणपती गल्ली, घडी टॉवरजवळ, सेलू,
तालुका सेलू, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्रमुख लिपीक, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सेलू शहरातील सर्वे नंबर २३० मधील २७५/१, २७५/२ ते २७५/१५/१,

२७५/१५/२ ह्या प्लॉटच्या नामांतराच्या संचिकेची प्रत व सर्वे नंबर २१२ च्या श्री. बोगा यांच्या नामांतराची नक्कल, हे नामांतर केव्हा झाले, नामांतर करतांना विभागाचे प्रमुख लिपीक पद कोणाकडे होते, अशा प्रकारच्या नामांतर विभागाचे प्रमुख लिपीक असतांना दुस-या विभागाच्या कर्मचा-यांना नामांतर करता येते का, अशा प्रकारची किती नामांतरे नगरपरिषदेमध्ये झाली, आदर्शनगरमधील सौ. दिक्षीत यांच्या घराचे नामांतर केव्हा झाले व त्यांच्या नामांतराच्या संचिकेची नक्कल, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दिनांक १५-१२-२००८ रोजी विनामूल्य पुरविण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी यांनी नियमबाह्य काम करण्याचे नाकारल्यामुळे नगरपरिषदेच्या तत्कालीन मुख्याधिका-याने, अपिलार्थीने ज्या नामांतराविषयी माहिती मागितली आहे ते नामांतर प्रकरण भांडार लिपीकाकडून पूर्ण करुन घेतले आहे व अपिलार्थीस आता दिनांक १५-१२-२००८ रोजी व्यक्तिशः माहिती प्राप्त होऊनही त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे व तसेच या प्रकरणी माहिती प्राप्त झाल्याबद्दल अपिलार्थीची पोचही त्यांनी घेतली आहे. अपिलार्थीस

ही माहिती दिनांक १५-१२-२००८ रोजी दुपारी ३ वाजून १० मिनिटांनी मिळाल्याची त्यांची पोचसहीवर नोंद आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १५-१२-२००८ रोजी आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे. तथापि प्राप्त माहितीवर कोणतेही भाष्य न करता अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीवर त्यांचे निश्चितपणे कोणते अभिप्राय आहेत हे अपिलार्थीने आयोगास लेखी कळविलेले नाहीत अथवा त्यांचे अभिप्राय तोंडी स्पष्ट करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित देखील नाहीत. यावरुन अपिलार्थीस त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर कोणतेही अभिप्राय द्यावयाचे नाहीत, असे अनुमान काढण्यात येत आहे व पर्यायाने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी, रा. गणपती गल्ली, घडी टॉवरजवळ, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२००३

निर्णय दिनांक २२.१२.२००९

१ श्री. बाळासाहेब सुधाकर बोडखे, : अपिलार्थी
मु. चिंचाळा, पो. विहामांडवा,
ता. पैठण, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत चिंचाळा, ता. पैठण, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
पैठण, ता. पैठण, जि. औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून, त्यांना ग्रामसेवक, ग्रामपंचायत चिंचाळा यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले, असे नमूद केले आहे.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांना लिहिलेले दिनांक ३०.१०.२००८ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये

अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे व प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाले असल्याचा कबूली जबाब अपिलार्थीने दिला आहे व तसेच त्यांनी केलेले अपील रद्द समजण्यात यावे असे जन माहिती अधिकारी यांना अवगत केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांनी दिनांक २६.०६.२००९ रोजी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील त्यांच्या विनंतीप्रमाणे फेटाळण्यात यावे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २४.१०.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७.११.२००८ रोजी व ०४.०२.२००९ रोजी सुनावणी ठेवली असता, सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे दोघेही उपस्थित न राहिल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांना कोणताही निर्णय देता आला नाही.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे ग्रामसेवक, ग्रामपंचायत चिंचाळा यांना त्यांनी केलेले अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती केलेली आहे. तथापि ग्रामसेवक हे या प्रकरणी अपिलार्थीच्या अपिलावर निर्णय घेण्यासाठी सक्षम नाहीत, केवळ त्यांनी माहिती अधिकाऱ्यांकडे अपील रद्द करण्याची विनंती केली म्हणून ते पत्र राज्य माहिती आयोगाला ग्रामसेवकाने दिनांक ०८.१२.२००९ रोजी पाठविले आहे. अपिलार्थीने आयोगास त्यांच्याकडे केलेले द्वितीय अपील रद्द करण्याची विनंती केलेली नाही. हा मुद्दा येथे प्रकर्षाने लक्षात घेऊन अपिलार्थीने आयोगाकडे नोंदविलेल्या द्वितीय अपिलावर पुढीलप्रमाणे सुनावणी घेऊन निर्णय देण्यात येत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६.०६.२००९ रोजी पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, यामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १-आपल्या ग्रामपंचायतीने दिनांक ०१.०१.२००६ ते आजपर्यंत वरिष्ठ कार्यालयास जन्म मृत्यू संदर्भात पाठविलेल्या पत्रांच्या प्रती, व मुद्दा क्रमांक ५ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ मधील १७ कामाची माहिती या मुद्यांवर अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही, असे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली कथित माहिती ही अपूर्ण असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. एवढे असूनही अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०.१०.२००९ रोजीच्या पत्रान्वये त्यांना पूर्ण माहिती मिळाल्याचे त्यांनी कसे कबूल केले आहे, याचे आयोगास आकलन होत नाही. परंतु अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत पूर्ण माहिती दिली नाही, हे मात्र या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या दिनांक ११.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत तर कोणताही प्रतिसाद दिला नाही. परंतु गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४.१०.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १७.११.२००८ व ०४.०२.२००९ रोजी ठेवलेल्या सुनावणीस देखिल ते व अपिलार्थी हे दोघेही गैरहजर होते. अशाप्रकारे अपिलार्थीस मूळात विहित मुदतीत कोणतीही माहिती न देणे आणि अपिलार्थीने प्रथम अपील केल्यानंतर या अपिलांच्या सुनावणीस हजर न राहणे अशाप्रकारच्या जन माहिती अधिकारी यांच्या या प्रकरणातील कृतीद्वारे त्यांनी स्वतःच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा व नितांत सचोटीचा अभाव स्पष्ट केला आहे व स्वतःला माहिती

अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. ताटीकुंडलवार, ग्रामसेवक, ग्रामपंचायत चिंचाळा (सध्या ग्रामसेवक या पदावर मौजे आपेगांव, ता. पैठण येथे कार्यरत) यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांची देखिल अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न देण्यासंदर्भातील वृती आयोगास आक्षेपार्ह वाटत आहे. जर अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी हे दोघेही सुनावणीच्या वेळी अनुपस्थित होते, तर त्यांनी दुसऱ्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देणे त्यांना क्रमप्राप्त होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केलेली नाही. यांच्या अशाप्रकारच्या आक्षेपार्ह वृत्तीची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी यथायोग्य नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे व अपिलार्थीस माहिती देण्याकरिता संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत चिंचाळा यांना, असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ५ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ व ५ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना श्री. ताटीकुंडलवार सध्या ग्रामसेवक, ग्रामपंचायत आपेगांव यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाळासाहेब सुधाकर बोडखे, मु. चिंचाळा, पो. विहामांडवा, ता. पैठण, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत चिंचाळा, ता. पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण, ता. पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२००४

निर्णय दिनांक २२.१२.२००९

१ श्री. वाव्हळे लक्ष्मण जळबाजी, : अपिलार्थी

रा. पार्वतीनगर, जायकवाडी रोड, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

कुलसचिव, मराठवाडा कृषी विद्यापीठ,

परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

कुलगुरु, मराठवाडा कृषी विद्यापीठ,

परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कुलसचिव, मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी

जन अपिलीय अधिकारी : कुलसचिव, मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०४.२००७ रोजी नोंदविलेले व दिनांक २७.०८.२००८ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, कुलगुरु तथा अपिलीय अधिकारी या नात्याने त्यांनी सत्य परिस्थिती पाहून, माहिती अधिकारी यांना अनुसूचित जमातीचे लघुलेखकाचे रिक्त पद हे अनुसूचित जातीस देता येते का याबाबत व या प्रकरणात अपिलार्थीचे नुकसान होत असल्यामुळे १९९७ च्या जी. आर. प्रमाणे एकूण २० पदावर १३ टक्के प्रमाणे त्यांना पदोन्नती देता येईल का याबाबतीत सहायक आयुक्त (मावक) विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांच्याकडून मार्गदर्शन घ्यावे, असे आदेश दिले होते. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलाच्या सुनावणीच्या वेळी २० पदे दाखवून अपिलार्थीची सही घेतली व या सहीनंतर जन माहिती अधिकारी यांनी २० पदाऐवजी १९ पदे दाखवली व अद्यापपावेतो आयुक्तालय औरंगाबाद यांचेकडून मार्गदर्शन न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विभागातील लघुलेखक पदावरील पदोन्नती संदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१.०२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती दिशाभूल करणारी वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३.०२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२.०३.२००७ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या या संदर्भातील पदोन्नती प्रकरणी सहायक आयुक्त (मागासवर्गीय कक्ष) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचे मार्गदर्शन घेण्याचे सूचित केले. तथापि असे मार्गदर्शन जन माहिती अधिकाऱ्यांनी न घेतल्यामुळे अपिलार्थीने वरील

परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांच्या विनंतीप्रमाणे मराठवाडा कृषी विद्यापीठाने त्यांना लघुलेखक पदोन्नती दिली असली तरी ही पदोन्नती उशिरा मिळाल्याबद्दल अपिलार्थीचा आक्षेप आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी केल्यानंतर असे आढळून आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. परंतु अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्यांचे जे प्रकरण संदर्भीत केले आहे त्याच्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रशासकीय स्वरुपाचे आदेश काढले आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अशाप्रकारे प्रशासकीय आदेश काढणे मूळात अभिप्रेत नाही. या अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती माहिती अपिलार्थीस देण्याचे अथवा अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव अपिलार्थीचे अपील फेटाळणे हे त्यांचे प्रामुख्याने कर्तव्य होते. तथापि अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात वा अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही खरोखरीच चुकीची व दिशाभूल करणारी आहे का, आणि असल्यास अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती द्यावयाची याचा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी घेतलेला नाही. सबब या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव यांनी अपिलार्थीने दिनांक १३.०२.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर त्यांनी सुनावणी घेऊन माहिती अधिकार अधिनियमातील विहित मर्यादेमध्ये आपला निर्णय पारित करणे उचित राहील, असे

आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १३.०२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, परत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी, अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करु शकतील.

अपिलार्थीने या प्रकरणी उपस्थित केलेल्या प्रशासकीय मुद्यांच्या बाबतीत अपिलार्थीच्या गाऱ्हाण्याची तड लावण्यासाठी स्वतंत्रपणे वेगळे सक्षम प्राधिकरणे अस्तित्त्वात आहेत. अशाप्रकारचा प्रशासकीय स्वरुपाचा निर्णय देण्याचे, राज्य माहिती आयोगाला, अधिकार नाहीत, हे अपिलार्थी यांच्या येथे प्रामुख्याने निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३.०२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, परत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वाव्हळे लक्ष्मण जळबाजी, रा.पार्वतीनगर, जायकवाडी रोड, परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २००९/२००८ व २०१०/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२००९ व २०१०

निर्णय दिनांक २२.१२.२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. रमेश मांगीलाल तिवारी,<br>मोंढा रोड, धर्माबाद, जि. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, धर्माबाद,<br>जि. नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

**अपील क्रमांक २००९/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडून विलंबाने, असमाधानकारक व चुकीची माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जिल्हा परिषद व पंचायत समिती अंतर्गत धर्माबाद तालुक्यातील जे पती - पत्नी शिक्षक व शिक्षिका आहेत अशांनी किती घरभाडे उचलले आहे अशा शिक्षकांची यादी, ही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, माहिती देण्यासाठी १३ पृष्ठांची माहिती तयार आहे व ही माहिती देण्यासाठी लागणारे शुल्क चलनाद्वारे भरुन अपिलार्थीने ही माहिती त्यांच्या कार्यालयाकडून हस्तगत करुन घ्यावी, असे सूचित केले. तथापि माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्याच दिवशी विनामूल्य माहिती देण्याचे आदेश दिले. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४.०८.२००८ रोजी माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हे उपस्थित व जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोघांचाही युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती दिल्याबद्दल त्यांचेवर कारवाईचे आदेश करण्याची व उर्वरित माहिती देण्याचे आदेशित करावे असा युक्तिवाद केला. जन माहिती अधिकारी यांनी ते आता या पदावर नव्याने बदलून आले असल्यामुळे, आयोगास या

प्रकरणी काही सांगता येणार नाही, असे आयोगास अवगत केले व अद्यापपावेतो अपिलार्थीस न पुरविलेली माहिती १५ दिवसाच्या आत पुरविण्याचे आयोगास आश्वासित केले. अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती अपूर्ण का वाटते असे अपिलार्थीस विचारले असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, सन २००६ ते २००७ या कालावधीतील उचललेल्या घरभाड्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती पुरविली नाही. ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे. तसेच अपिलार्थीस उर्वरित माहिती आता जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्याचे कबूल केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत उर्वरित संपूर्ण माहिती विनामूल्य पुरवावी.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे व त्यांना विलंबाने माहिती प्राप्त झाल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांचेवर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगाकडून अपेक्षा केली आहे. या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्या संदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती मागितली असताना, ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिशः किती वेळा गेले, या संदर्भात त्यांच्याकडे काही पुरावा उपलब्ध आहे काय असे आयोगाने विचारले असता, असा कोणताही पुरावा अपिलार्थीकडे उपलब्ध नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. तसेच या

प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास असद्‌हेतुने टाळाटाळ केली असल्याचे निःसंशयपणे कोणत्याही प्रकारे सिध्द होत नसल्याने, अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची विनंती आयोग अमान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

५. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

६. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत, उर्वरित माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**अपील क्रमांक २०१०/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून उशिरा व असमाधानकारक आणि चुकीची माहिती मिळाली असल्याचे आयोगास अवगत केले असून आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, आगाऊ वेतनवाढ किती शिक्षकांना देण्यात आलेली आहे त्याची व किती शिक्षकांचे वेतन का कमी करण्यात आले याची सविस्तर माहिती व महाराष्ट्र दर्शन या योजनेचा लाभ सन २००० पासून ते एप्रिल २००८ पर्यंत किती शिक्षक शिक्षिकांनी घेतला आहे त्यांची यादी, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २०.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविली. तथापि ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हे उपस्थित व जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती त्यांना अपूर्ण का वाटते असे विचारल्यास, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ मध्ये इ.स. २००० ते २००८ या कालावधीची माहिती मागितली असता, त्यांना फक्त इ.स. २००० ते २००४ या कालावधीतील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आली, या पुढील कालावधीची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीस आता द्यावयाची उर्वरित माहिती १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे .

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्र पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ द्वारे ज्या शिक्षकांना आगाऊ वेतनवाढ प्राप्त झाली आहे अशा शिक्षकांची यादी आणि किती शिक्षकांचे वेतन व ते का कमी करण्यात आले अशी माहिती, जन

माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रशासकीय प्रक्रियेमध्ये आगाऊ वेतनवाढ देणे व तसेच वेतनवाढ कमी करणे, या निरंतर चालणाऱ्या प्रक्रिया आहेत. त्यामुळे अपिलार्थीस अशाप्रकारची माहिती मागविताना त्यांना निश्चितपणे कोणत्या कालावधीतील माहिती हवी आहे, याचा उल्लेख त्यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये करणे त्यांना अनिवार्य आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणत्या कालावधीशी संबंधित माहिती हवी आहे, याचा कोणताही उल्लेख केला नसल्यामुळे, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ द्वारे त्यांनी मागितलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने ज्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस २००४ पासून पुढील कालावधीतील कोणतीही माहिती पुरविली नसल्याचे आयोगास अवगत केले आहे, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, तसे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ मधील सन २००४ ते एप्रिल २००८ या कालावधीशी संबंधित माहिती आता अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकरी यांनी मान्य केले असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक यांनी दिलेली माहिती अपूर्ण असल्याचे वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट झाले आहे. अपिलार्थीस अपूर्ण माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्यामुळे, मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**२.** जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रमेश मांगीलाल तिवारी, मोंढा रोड, मु.पो. धर्माबाद, ता. धर्माबाद, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, धर्माबाद, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२००७
निर्णय दिनांकः २२-१२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. अनिल मारुती सकदेव,<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,गंगापूर,<br>जि.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

त्रयस्थ पक्षः १. श्री. विकास दत्तात्रय जंजीरे,
२. श्री. रामदास हराळ

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या निर्णयाविरुध्द आयोगाकडे अपील केले असून त्यांच्या संदर्भातील वैयक्तिक स्वरुपाची माहिती उघड करण्याचे शिक्षणाधिकारी यांनी दिलेल्या आदेशाच्या विरुध्द त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद त्रयस्थ पक्षासह उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि.२२.१२.२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये, त्यांचे विचाराधीन अपील क्र. २००७/०८ हे ते स्वखुषीने मागे घेत असल्याचे नमूद करुन त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले द्वितीय अपील आता मागे घेतले असल्याने त्यांची उपरोक्त विनंती मान्य करण्यात येऊन अपिलार्थीचे अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील क्र. २००७/०८, दि.१९.०४.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अनिल मारुती सकदेव, गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९३
निर्णय दिनांक: २३-१२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. अकबर खान मुस्तफा खान,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>युसुफिया प्राथमिक शाळा,<br>नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०५.२००९ रोजी फेर नोंदणी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१०.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,युसूफिया प्राथमिक शाळा, नांदेड यांच्याकडे त्यांच्या शाळेतील सात सहशिक्षकांच्या नेमणूकीसंदर्भात मुलाखत यादी, निवड यादी, नेमणूक आदेश, शालेय समितीचे

ठराव व शालेय समितीची यादी, अशी दि. १६.०८.१९८३ ते २२.०६.१९९१ या कालावधीशी संबंधित माहिती व्यक्तिशः मागितली होती. यानंतर अपिलार्थीने प्रथमतः दि. २७.१०.२००७ रोजीच्या स्मरणपत्राद्वारे शाळेचे मुख्याध्यापक यांना माहिती देण्याची विनंती केली. तथापि शाळेच्या मुख्याध्यापक यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २७.११.२००७ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी दि. १६.०१.२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित केले. या आदेशान्वये त्यांनी अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करण्याच्या सूचना दिल्या. शिक्षणाधिकारी यांच्या या निर्णयास अनुसरुन अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी अपिलार्थीस भरण्याचे सूचित केले असता, अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न केल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती देऊ शकले नाहीत. यावरुन अपिलार्थीस शुल्क भरण्याच्या सूचना ज्या पत्रान्वये मुख्याध्यापक यांनी दिल्या, त्या पत्राची प्रत आज सुनावणीमध्ये आयोगाने अवलोकनास्तव सादर करण्याचे सूचित केले असता, मुख्याध्यापक यांनी असे स्पष्ट केले की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस शुल्क भरण्याच्या तोंडी सूचना दिल्या होत्या. या बाबत त्यांनी अपिलार्थी बरोबर कोणताही लेखी

पत्रव्यवहार केला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत सशुल्क पुरविण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितली होती. ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी हे व्यक्तिशः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २७.१०.२००७ रोजी उपस्थित झाले होते. त्यांच्या उपस्थितीची नोंद जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने घेतलेली आहे. तथापि एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा न केल्यामुळे अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क संबंधित जन माहिती अधिकारी यांनी तोंडी कळविणे व यासंदर्भात कोणताही लेखी पत्रव्यवहार न करणे, ही जन माहिती अधिकारी यांची चूक आहे. ही चूक त्यांनी आज सुनावणीच्या वेळी कबूल केली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही, जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी त्या माहितीचे स्वरुप सार्वजनिक असल्याने, ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणतीही हरकत नाही. सबब सशुल्क माहिती देण्याचा विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी

यांच्या कार्यालयात उपरोक्त परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हस्तगत करुन घ्यावी लागेल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीस कोणताही लेखी पत्रव्यवहार न केल्याबद्दल मुख्याध्यापक, युसूफिया प्राथमिक शाळा, नांदेड यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर त्यांनी अशा चुका टाळाव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित हाताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.
३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अकबर खान मुस्तफा खान,सहशिक्षक, युसूफिया प्राथमिक शाळा, पिरबूऱ्हाणनगर,नांदेड, जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, युसूफिया प्राथमिक शाळा, पिरबूऱ्हाणनगर,नांदेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९४
निर्णय दिनांक: २३-१२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. साहेबराव देवराव पोटभरे,<br>रा.माजलगाव,जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>वाचक पोलीस उपअधिक्षक,<br>विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय,औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद | | |

| | |
|---|---|
| प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : | १.कार्यालय अधीक्षक,<br>विशेष पोलीस महानिरीक्षक<br>कार्यालय,औरंगाबाद |
| जन अपिलीय अधिकारी : | वाचक पोलीस उपअधीक्षक,<br>विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय,<br>औरंगाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०७.२००८रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी दि. १७.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले असता या अपील अर्जावर सुनावणी न घेतल्या कारणाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१०.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी, विशेष पोलीस महानिरीक्षक,औरंगाबाद यांच्या कार्यालयातील वाचक पोलीस उपअधीक्षक यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीसाठीचा मूळ अर्ज केला. अपिलार्थीने केलेल्या अर्जामध्ये, त्यांनी दि. ०२.०९.२००५ रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक, परिक्षेत्र, औरंगाबाद यांना दिलेल्या निवेदनावर झालेल्या चौकशी कामी घेतलेल्या लोकांच्या जबाबाच्या प्रती, जर जबाब घेतले नाहीत तर जबाब न घेण्याचे कारण, अशाप्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना ज्या व्यक्तींच्या जबाबाच्या प्रतींची आवश्यकता आहे, त्या ३ व्यक्तींच्या नावाचा उल्लेख त्यांनी या अर्जामध्ये केलेला आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही पोलीस अधीक्षक, बीड यांच्याशी संबंधित व त्यांच्या कार्यालयातील असल्यामुळे विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयाने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचा मूळ अर्ज दि.१४.०४.२००८ रोजीच्या पत्राव्दारे पोलीस अधीक्षक, बीड यांच्याकडे पाठवून दिला व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार परत विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्याकडे दि. १७.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयाने अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज पोलीस अधीक्षक, बीड यांच्याकडे दि. १८.०५.२००८ रोजी पाठवून दिला. अपिलार्थीचा हा अर्ज पोलीस अधीक्षक, बीड यांना पाठविल्यानंतर त्यांनी दि. १९.०६.२००८ रोजी अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविली, तथापि ही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयाकडे माहिती मागविली असल्यामुळे त्यांना ही माहिती विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्याकडूनच प्राप्त होणे गरजेचे आहे. तसेच त्यांना बीड पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयाच्या ताब्यात नव्हती, ती माहिती पोलीस अधीक्षक,बीड यांच्या कार्यालयाच्या ताब्यात असल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यावरील प्रथम अपील अर्ज जिल्हा पोलीस अधीक्षक, बीड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार पाठवून दिला व अपिलार्थीस माहिती दिल्याचा अनुपालन अहवाल पोलीस अधीक्षक, बीड यांच्या कार्यालयाने त्यांना सादर केलेला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने मूळात जरी विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयाकडे माहिती मागविली असली तरी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे अथवा त्यांच्या भागाकडे उपलब्ध आहे, त्या प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडूनच त्यांना ही माहिती उपलब्ध होऊ शकते. केवळ अपिलार्थीने विशेष पोलीस महानिरीक्षकाकडे अर्ज केला म्हणून ती माहिती, विशेष पोलीस महानिरीक्षकांच्या कार्यालयातूनच देण्याची तरतुद माहिती अधिकार अधिनियमामध्ये नाही. त्यामुळे अपिलार्थीचे, त्यांना विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयानेच माहिती पुरवावी, हे म्हणणे आयोग अमान्य करीत आहे.

अपिलार्थीस पोलीस अधीक्षक, बीड यांनी माहिती दिल्याचा पुरावा आज रोजी पोलीस महानिरीक्षक कार्यालयाने आयोगाकडे सादर केला आहे. तथापि अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की,

त्यांना ही माहिती पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून प्राप्त झालेली नाही. यावर जन माहिती अधिकारी, विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय,औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्याकडे पोलीस अधीक्षक, बीड यांच्या कार्यालयाकडून अपिलार्थीस दि.१०.०४.२००८ रोजीच्या अर्जासंदर्भात जी माहिती प्राप्त झाली आहे, ती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत व्यक्तिशः अथवा रजिस्टर्ड पोस्टाद्वारे, हे आदेश निर्गमित होताच विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयाने अपिलार्थीच्या अर्जावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत कार्यवाही केली असल्यामुळे, या कार्यालयाच्या जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी, पोलीस महानिरीक्षक कार्यालय,औरंगाबाद यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, पोलीस अधीक्षक, बीड यांच्याकडून प्राप्त झालेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत व्यक्तिशः अथवा रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २३-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. साहेबराव देवराव पोटभरे, जम्बोदिप निवास, नवीन भाटवडगाव, मंजरथ रोड,माजलगाव,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक,विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा वाचक पोलीस उपअधीक्षक,विशेष पोलीस महानिरीक्षक,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९५
निर्णय दिनांक: २३-१२-२००९

१. श्री. नामदेवराव पुंडलीक कोल्हे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पैठण, जि.औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,औरंगाबाद.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : १. गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पैठण, जि.औरंगाबाद.
२.ग्रामसेवक, ग्रामपंचायत
टाकळी,ता.पैठण, जि.औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.१२.२००८रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून त्यांच्या दि. २६.१०.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित न केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.११.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे पैठण तालुक्यातील मौ.टाकळी या गावाच्या ग्रामीण पाणीपुरवठा योजनेसंदर्भात एकूण १४ मुद्यांद्वारे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांच्याकडे काही माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण १४ मुद्यांपैकी १३ मुद्दे हे टाकळी ग्रामपंचायतीशी संबंधित असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत ग्रामसेवक टाकळी यांच्याकडे पाठविली व त्यांच्या कार्यालयाशी संबंधित असलेल्या माहितीसाठी अपिलार्थीस दि. ०८.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे रु. ११९/- इतके शुल्क भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने याप्रमाणे कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २६.१०.२००८ रोजी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०१.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील कालबाहय झाले असल्याच्या कारणावरुन फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,मौ.टाकळी,ता.पैठण, जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,पैठण व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी दि. ०८.०९.२००८ रोजीच्या त्यांच्या कार्यालयाच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ११९/- इतके चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न केल्यामुळे त्यांना अपिलार्थीस ही माहिती पुरविता आली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एकूण १४ मुद्यांपैकी १३ मुद्दे हे

ग्रामसेवकाशी संबंधित असल्यामुळे, या मुद्यावर माहिती देण्याची कार्यवाही ग्रामसेवकाने करणे अपेक्षित आहे. संबंधित ग्रामसेवक,मौ.टाकळी ता.पैठण यांनी असा युक्तिवाद केला की अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.५९/- इतके भरण्याचे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १६.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सूचित केले असता, अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न केल्यामुळे त्यांना अपिलार्थीस ही माहिती देता आली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील देय माहिती त्यांच्याकडे तयार असून ही माहिती अपिलार्थीस त्या कधीही सशुल्क पुरविण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोनही जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. टाकळी येथील पाणीपुरवठा योजनेसंदर्भात एकूण १४ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ अंशतः, 'या बाबत शासननिर्णयाप्रमाणे कसे असावे?' हा भाग वगळता मुद्दा क्र. ५ पूर्ण, मुद्दा क्र. ८ पूर्ण तसेच मुद्दा क्र. ११ अंशतः - बांधकाम साहित्याच्या तपासणी अहवालाच्या प्रती व मुद्दा क्र. १३ मधील संपूर्ण माहिती अपिलार्थीस देय होत आहे. उर्वरित सर्व मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाद्वारे त्यांचे स्पष्टीकरण व वैयक्तिक अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे, जी, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे अभिप्रेत नाही. त्यामुळे उर्वरित कोणत्याही मुद्यावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती देय असणार नाही. अपिलार्थीने मागणी केलेली मुद्दा क्र. १३ शी संबंधित माहिती ही, पंचायत समितीच्या कार्यालयाशी सरळ संबंधित असल्यामुळे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास गट विकास अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्याचे सूचित केले

होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने गट विकास अधिकारी यांच्याकडे न केल्यामुळे त्यांना गट विकास अधिकारी यांच्याकडून ही माहिती प्राप्त झाली नाही. गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दिलेला प्रतिसाद पाहता, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १३ शी संबंधित माहिती गट विकास अधिकारी, पंचायत समिती,पैठण यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घेणे त्यांना अनिवार्य आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्यांवरील माहिती संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने ज्या योजनेच्या संदर्भात माहिती मागितली आहे, त्या योजनेच्या अंमलबजावणीचे स्वरुप हे शासनाच्या नियमित विकास कामांच्या अंमलबजावणीच्या स्वरुपासारखे नाही. या योजनेची अंमलबजावणी, संबंधित गावातील ग्रामस्थांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी मिळून स्थापन झ ालेल्या समितीमार्फत केली जाते. या समितीतील सर्व सदस्य खाजगी आहेत. त्यामुळे जरी या माहितीसंदर्भात गट विकास अधिकारी यांनी संबंधित ग्रामसेवकाकडे अपिलार्थीचा मूळ अर्ज अग्रेषित केला असला तरी ग्रामसेवकाकडे ही माहिती संबंधित पाणीपुरवठा समितीने दिल्याशिवाय उपलब्ध असणार नाही. अशा परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी राज्य माहिती आयोगाने शासनाला वेळोवेळी सूचना दिल्या होत्या. आता शासनाने पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि. १८.११.२००९ रोजीच्या आदेशान्वये पाणी पुरवठा समितीची पुनर्रचना केली असून या समितीचे सदस्य सचिव हे संबंधित ग्रामसेवक असतील, असा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे आता मात्र अपिलार्थीस ही माहिती संबंधित ग्रामसेवकाकडून देय होत आहे. सबब ग्रामसेवक, मौ.टाकळी, ता.पैठण यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,५व ११ अंशतः आणि मुद्दा क्र.८ पूर्णतः या मुद्यांवरील माहिती विनामूल्य द्यावी लागेल. ही माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांनी फेटाळल्याबद्दल काही आक्षेप नोंदविले आहेत, तथापि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय आयोगास योग्य वाटतो. त्यामुळे अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या अपील निर्णयावर घेतलेले सर्व आक्षेप आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मौ.टाकळी, ता.पैठण यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना वरील निर्णयाप्रमाणे देय असलेली मुद्दा क्र. २,५,८ व ११ अंशतः या मुद्यांशी संबंधित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नामदेवराव पुंडलीक कोल्हे, राजे संभाजी कॉलनी, प्लॉट नं.२५,२६, जळगांव रोड, पोस्ट हर्सूल, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,मौ.टाकळी,ता.पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण,जि.औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२६२
निर्णय दिनांक २३/१२/२००९

१ श्री. दिनकर हरिश्चंद्रराव सावंत : अपिलार्थी
रा. परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, गंगाखेड, जि. परभणी

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, परभणी

**निर्णय**

श्री. दिनकर हरिश्चंद्रराव सावंत यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०७.०७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १५.१२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १६.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर दिनांक २३.०३.२००९ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश

प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा १४ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. दिनकर हरिश्चंद्रराव सावंत, 'पुष्पक', दत्त नगर, जिंतूर रोड, परभणी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२६३
निर्णय दिनांक २३/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दिनकर हरिश्चंद्रराव सावंत<br>रा. परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती, गंगाखेड, जि. परभणी | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती, सोनपेठ, जि. परभणी | | |

**निर्णय**

श्री. दिनकर हरिश्चंद्रराव सावंत यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २९.०६.२००९ रोजी केलेले दि. ०३.०७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १६.१२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. १६.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. दिनकर हरिश्चंद्रराव सावंत, 'पुष्पक', दत्त नगर, जिंतूर रोड, परभणी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२६४
निर्णय दिनांक २३/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दिनकर हरिश्चंद्रराव सावंत<br>रा. परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती, गंगाखेड, जि. परभणी | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गटशिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>पंचायत समिती, सोनपेठ, जि. परभणी | | |

**निर्णय**

श्री. दिनकर हरिश्चंद्रराव सावंत यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०७.२००९ रोजी केलेले दि. ०७.०७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १६.१२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. १६.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १४ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिनकर हरिश्चंद्रराव सावंत, 'पुष्पक', दत्त नगर, जिंतूर रोड, परभणी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२९३

निर्णय दिनांक २३/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सुरेशकुमार व्दारकादास राजा<br>रा. वैजापूर, जि. औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>व्यवस्थापक,<br>डॉ. हेडगेवार नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,<br>वैजापूर, जि. औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक,<br>सहकारी संस्था, वैजापूर, जि. औरंगाबाद | : | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.०८.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक ०६.०२.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे व्यवस्थापक, डॉ. हेगडेवार नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, वैजापूर, जि. औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेच्या व्यवस्थापकांनी त्यांच्या दि. २१.०२.२००९ रोजीच्या पत्रान्वये, माहितीपोटीचे शुल्क रु. ७०/- इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले व यानंतर अपिलार्थीस दि. ०७.०३.२००९ रोजीच्या पत्राव्दारे सशुल्क माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था, वैजापूर, जि. औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील

कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०९.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर सहायक निबंधक, सहकारी संस्था, वैजापूर, जि. औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि.०७.०५.२००९ रोजी पारित केले व यामध्ये त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती संबंधित पतसंस्थेच्या व्यवस्थापकांनी सुनावणीच्या वेळी पुरविल्याचे नमूद करुन अपिलार्थीस माहितीपोटीचे आकारलेले जादाचे शुल्क रु. १६/- इतके संबंधित पतसंस्थेच्या व्यवस्थापकांना सात दिवसाच्या आत परत करण्याचे आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्याने व प्राप्त माहिती खोटी, दिशाभूल करणारी असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित पतसंस्थेचे व्यवस्थापक व सहायक निबंधक, सहकारी संस्था, वैजापूर, जि. औरंगाबाद  हे उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच संबंधित उपस्थितांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. तथापि अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य

असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २९३ /०९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेशकुमार व्दारकादास राजा, व्दारका टायपींग इन्स्टीट्यूट, टिळक रोड, वैजापूर, जि. औरंगाबाद.

२. व्यवस्थापक, डॉ. हेडगेवार नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, वैजापूर, पुलेवाडी रोड, वैजापूर, जि. औरंगाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, वैजापूर, जि. औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४६६
निर्णय दिनांक २३/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शरद भीमराव दाभाडे<br>रा. औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधिक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद | | |

**निर्णय**

श्री. शरद भीमराव दाभाडे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.०२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २२.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १७.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन दि.१६.१०.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश

प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा २६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. शरद भीमराव दाभाडे, एन-१२, डी-३६/९, स्वामी विवेकानंद नगर, हडको, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४९२
निर्णय दिनांक २३/१२/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ रा. नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०६.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर दि. ३०.०१.२००९ रोजी नियमबाह्य निर्णय दिल्याचे कारण दर्शवून त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाच्या दिनांकापासून ९० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते.

तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, अपिलार्थीने व्दितीय अपील अर्जात दि. ३०.०१.२००९ रोजी निर्णय दिला असल्याचे नमूद केले आहे, पण आदेशाची प्रत जोडलेली नाही. सदर आदेशाची तारीख ही नियमानुसार मूळ प्रथम अपिलाचे दिनांकापासून ४५ दिवसाचे आतील नाही. यापरिस्थितीत जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रथम अपिलावर आदेश पारित केले नाहीत, असा निष्कर्ष काढण्यात येत आहे व त्यासंदर्भात प्रस्तुत अपील हे अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३१ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१३२
निर्णय दिनांक २३/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री.ख्यालीलाल पुनमचंद सालवी,<br>रा. भुसावळ, जि. जळगांव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>चेअरमन,<br>कुबेर अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.,<br>भुसावळ, जि. जळगांव | : | प्रतिवादी |
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक,<br>सहकारी संस्था, भुसावळ, जि. जळगांव | : | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.१०.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक २०.११.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे चेअरमन, कुबेर अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., भुसावळ यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमात विहीत केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था, भुसावळ, जि. जळगांव यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक १२.०१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलासंदर्भात सहायक निबंधक, सहकारी संस्था, भुसावळ, जि. जळगांव यांनी त्यांच्या दि. १७.०९.२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेल्या माहितीने समाधान न झ

ााल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, संबंधित पतसंस्थेचे चेअरमन व सहायक निबंधक, सहकारी संस्था, भुसावळ, जि. जळगांव हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

या प्रकरणी सर्व संबंधित अपिलार्थी, पतसंस्थेचे चेअरमन व सहायक निबंधक, सहकारी संस्था, भुसावळ यांच्या असे निदर्शनास आणण्यात येत आहे की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. तथापि अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील क्र. २१३२ /०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २३-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ख्यालीलाल पुनमचंद सालवी, इन्द्रलक्ष्मी, ब्लॉक नं.३, कस्तुरीनगर, भुसावळ, ता. भुसावळ, जि. जळगांव ४२५ २०१.

२. चेअरमन, कुबेर अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., भुसावळ, ब्राम्हण संघाजवळ, न्यू एरिया वार्ड, भुसावळ, जि. जळगांव ४२५ २०१.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, भुसावळ, जि. जळगांव.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२०

निर्णय दिनांक २३-१२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विनोदकुमार गोविंदराव जोशी,<br>व्दारा, करंजीकर निवास, गणपती चौक, जिंतूर रोड,<br>परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,<br>परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>परभणी | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात | : जन माहिती अधिकारी | : | उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी |
| | जन अपिलीय अधिकारी | : | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी |
| | त्रयस्थ पक्ष | : | श्री. यु. आर. गुंगाने |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक १६-१२-२००८ रोजीच्या अर्जातील अप्राप्त /असमाधानकारक असलेली माहिती समाधानकारक मिळविण्यासाठी अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये या प्रथम अपील अर्जाव्दारे आयोगास नम्र विनंती करण्यात येत आहे. या अपील अर्जाव्दारे त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून समाधानकारक माहिती मिळण्याचे आयोगाकडून अपेक्षिले आहे व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ ते ११ व मुद्दा क्रमांक १३ या मुद्दयावर समाधानकारक माहिती मिळावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १३ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने प्रथम अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०२-२००९ रोजी काही माहिती उपलब्ध करुन दिली. अपिलार्थीच्या दिनांक २२-०१-२००९ रोजीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने ज्या प्रकरणाशी संबंधित माहिती त्यांच्याकडे मागितली आहे त्या सर्व संचिका अपिलार्थीस तपासणीसाठी उपलब्ध करुन दिल्या आहेत. या संचिकामधून त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिली तरी देखील प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती पुरविली गेलेली नाही. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कार्यवाही चालू आहे एवढेच उत्तर दिले. तथापि त्यांना निश्चितपणे कोणती कार्यवाही चालू आहे हे उत्तर अपेक्षित असल्याने त्यांना या मुद्दयावर स्पष्ट माहिती हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी काही माहिती दिनांक १०-०२-२००९ रोजी व उर्वरित माहिती दिनांक ०८-०४-२००९ रोजी पुरविली असून अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १३ च्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस कार्यवाही चालू आहे असे कळविले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १६-१२-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या मुद्दा क्र. १३ चे अवलोकन केले असता, या मुद्दयाद्वारे त्यांनी अत्यंत मोघम स्वरुपाची माहिती मागितली असून त्यांना निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती हवी आहे, याचा कोणत्याही त्रयस्थास बोध होणार नाही. या मुद्दयाव्दारे अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या खुलाशावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही अशा स्वरुपाची त्यांना माहिती हवी असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन, अपिलार्थीच्या त्यांनी तक्रार केलेल्या खुलाशावर जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही केली नसून त्यावर कार्यवाही करण्याचे काम चालू असून स्वतः ती कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

परिषद यांच्या स्तरावर प्रलंबीत आहे असे दिसून येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-१२-२००८ रोजी ही माहिती मागितली आहे त्या दिवशी अपिलार्थीने दाखल केलेल्या खुलाशावर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नव्हती. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी या मुद्दयावर त्यांच्याकडून कोणतीही कार्यवाही झाली नाही असे अपिलार्थीस कळविणे उचित झाले असते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कार्यवाही न करता अपिलार्थीने केलेल्या खुलाशावर अंतीम कार्यवाही होण्याची वाट पाहिली. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १३ वर जर अपिलार्थीने अर्ज करतेवेळी जर कोणतीही कार्यवाही केली नव्हती तर तसे अपिलार्थीस कळविणे त्यांना भाग होते. सबब जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १३ ची दिनांक १६-१२-२००८ ची तत्कालीन स्थिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य कळविण्याचे आदेशित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास प्रतिसाद देण्यासाठी लावलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त अर्जांवर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १३ शी संबंधित दिनांक १६-१२-२००८ रोजीच्या स्थितीची माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विनोदकुमार गोविंदराव जोशी, व्दारा, करंजीकर निवास, गणपती चौक, जिंतूर रोड, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९९

निर्णय दिनांक २३-१२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सांगळे विजयकुमार गोरख,<br>व्दारा, मोराळे वि. कि. एल.आय.सी. ऑफ इंडिया,<br>उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. मोराळे विष्णू किसन

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. मोराळे व्ही. के. यांच्या दिनांक २६-०६-२००७ रोजीच्या, विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था कार्यालयास दिनांक १२-०७-२००७ रोजी प्राप्त झालेल्या

पत्रावर सह निबंधक कार्यालयाने काय कारवाई केली याबाबतची माहिती रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या संदर्भिय अर्जाची छायांकीत प्रत जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्याकडे योग्य त्या कार्यवाहीस्तव पाठविली असल्याचे अपिलार्थीस अवगत केले व त्यांच्याकडील श्री. मोराळे यांचा दि.२६-०६-२००७ चा अर्ज विभागीय सहनिबंधक कार्यालयाकडून दिनांक २४-१२-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयास प्राप्त झालेल्या पत्राची प्रत अपिलार्थीस पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १६-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०३-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस माहिती पुरविल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. अपिलार्थीच्या अर्जावर कार्यवाही करण्याचे अधिकार त्यांच्या कार्यालयाला नसल्याचे व हे अधिकार सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या या निर्णयामध्ये अवगत केले आहे. तथापि या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी, अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष गैरहजर आणि जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक २६-०६-२००७ रोजीच्या पत्राची प्रत त्यांच्या कार्यालयास विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था यांच्या-

कडून दिनांक २४-१२-२००७ प्राप्त झाली व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली आहे. या व्यतिरिक्त इतर कोणतीही कार्यवाही त्यांच्या कार्यालयाकडून केली गेली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १०-१२-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-०१-२००८ रोजी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद दिला असल्याने अपिलार्थीच्या पत्रावर त्यांच्या कार्यालयाने केलेली कार्यवाही त्यांनी या पत्राव्दारे अपिलार्थीस अवगत करुन दिली आहे. या व्यतिरिक्त जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय कोणतीही कार्यवाही करु शकत नाही. कारण अपिलार्थीच्या मूळ अर्जामधील विषयावर कार्यवाही करणे हे त्यांच्या अधिकारकक्षेच्या बाहेर आहे. हे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक ती माहिती दिल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सांगळे विजयकुमार गोरख, व्दारा, मोराळे वि. कि., एल.आय.सी. ऑफ इंडिया,

उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१००

निर्णय दिनांक २३-१२-२००९

१ श्री. संदीप पाटील, : अपिलार्थी

रा. धनसागर, सारा हार्मोनी, आर.एच. नं. ई-१,

कांचनवाडी, नाथपुरम रोड, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग,

नाथनगर (उत्तर), पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता, जायकवाडी

पाटबंधारे विभाग, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रथम लिपीक, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर), पैठण, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : सहायक अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. जी. ए. पाटील

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अयोग्य, चुकीची व न मागितलेली माहिती दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. जी. ए. पाटील, शाखा अभियंता यांना दिनांक ३१ मार्च २००७ रोजीच्या सेवानिवृत्तीनंतर देण्यात आलेल्या देयकाच्या प्रती, त्याची रक्कम, देयक अदा केल्याचा दिनांक व सर्व तपशीलवार माहिती व त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर वरिष्ठ कार्यालय उप अभियंता यांच्या कार्यालयाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या सर्व प्रतीची, माहिती मागितली होती. त्यांचे सदरील देयक विलंबाने अदा करण्यास कोणती कारणे आहेत याचीही माहिती त्यांनी या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता यांच्याकडे दिनांक २०-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता यांनी दिनांक ०८-०९-२००८ रोजी आपले आदेश पारीत करुन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि त्रयस्थ पक्ष गैरहजर आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये सेवानिवृत्तीनंतर स्वग्रामी जाण्यासाठी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास सादर केलेल्या अर्जासंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली आहे असे त्यांना वाटत आहे. तसेच ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने प्राप्त झाल्याचे आयोगास आढळून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती त्यांनी दिनांक १६-१२-२००९ रोजी अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे. त्रयस्थ पक्षाचे कथित टी. टी. ए. बील त्यांच्याकडे प्राप्त झालेले नाही. त्यामुळे ही माहिती त्यांना अपिलार्थीस देता आली नाही. या मुद्दयावर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना उद्देशून याच विषयावर लिहिलेले एक स्मरणपत्र आयोगास दाखविले. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लागल्याची कारणे आयोगास अवगत करतांना जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांचे अधिनस्त श्री. एल. वाय. यादव, वरिष्ठ लिपीक यांच्या ताब्यात होती. त्यांनी ही माहिती वेळेत सादर न केल्यामुळे ते ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत देऊ शकले नाहीत. ही माहिती श्री. एल. वाय. यादव यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी श्री. एल. वाय. यादव यांना तोंडी सूचना दिल्या होत्या परंतु या सूचनांचे अनुपालन श्री. एल. वाय. यादव यांनी केले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील वरिष्ठ लिपीक श्री. एल. वाय. यादव हे जबाबदार असल्याचे आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी श्री. एल. वाय. यादव यांना वेळोवेळी तोंडी सूचना दिल्या होत्या. तथापि श्री. एल. वाय. यादव

यांना तोंडी सूचना दिल्याचा पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नाही. हे पाहता अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी प्रथम लिपीक व संबंधित वरिष्ठ लिपीक श्री. एल. वाय. यादव हे दोघेही एकत्रितपणे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहायक यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपीक आणि श्री. एल. वाय. यादव यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय विलंबाने माहिती पुरवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असा आयोगाचा निष्कर्ष आहे. सबब अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या टी. टी. ए. बीलासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाचे टी. टी. ए. चे बील त्यांना प्राप्त झाले नसल्याचे आयोगास अवगत केले आहे. या मुद्दयावर अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी त्रयस्थ पक्षाकडून या टी. टी. ए. बीलाची व्दितीय प्रत प्राप्त करुन घ्यावी व ती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास सादर केल्यानंतर ते, प्राप्त झाल्यानंतर एका महिन्याच्या आत जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षास या संदर्भातील प्रचलीत नियमाच्या आधीन राहून अदा करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, विनामूल्य पुरवावी.

३.	अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** — **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-१२-२००९** — **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	श्री. संदीप पाटील, रा. धनसागर, सारा हार्मोनी, आर.एच. नं. ई-१, कांचनवाडी, नाथपुरम रोड, औरंगाबाद.

२	जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपीक, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर), पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८४८

निर्णय दिनांक २३-१२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शिवराज बाबाराव धोंडे,<br>अध्यक्ष, श्री. संत शिरोमणी मन्मथ स्वामी शिक्षण प्रसारक मंडळ, शेवडी (बा.), तालुका लोहा, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,<br>विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,<br>विभागीय समाज कल्याण अधिकारी कार्यालय, लातूर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-११-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०५-२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सन २००५-०६ या कालावधीमध्ये नांदेड जिल्हयातील प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळांमध्ये नव्याने नियुक्त केलेल्या व मान्यतेसाठी प्रस्ताव दाखल केलेल्या

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची यादी, त्यापैकी किती नवीन शिक्षकांना वैयक्तीक मान्यता दिलेली आहे व किती शिक्षकांना वैयक्तीक मान्यता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून देणे प्रलंबीत आहे आणि त्यांचे मान्यता देण्याबाबतचे प्रस्ताव प्रलंबीत ठेवण्याचे कारण काय, ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०७-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक ३०-०७-२००७ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या कालावधीत देखील अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता दिनांक २२-१२-२००९ रोजी म्हणजेच विलंबाने व अर्धवट माहिती प्राप्त झाली आहे. त्यांना उर्वरित माहिती त्वरित मिळावी आणि विलंबाने माहिती प्राप्त झाल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या कार्यालयाकडे ज्यावेळी माहिती मागितली

होती त्यावेळी श्री. अविनाश देवसटवार नावाचे अधिकारी जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. ते सध्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण संस्था, पुणे येथे प्राध्यापक या पदावर कार्यरत आहेत. अपिलार्थीस उर्वरित माहिती ते सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देतील, असे त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण तीन मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. त्यातील मुद्दा क्रमांक तीनशी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे वा स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी आपल्या निर्णयाची कारणे व स्पष्टीकरणे अर्जदारास देणे अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. तथापि अपिलार्थीस उर्वरित दोनही मुद्दयांवरील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती अधिनियमातील तरतुदीशी पुरेशी सुसंगत असल्यामुळे, देय होत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितल्यानंतर संबंधित प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहारानंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अविनाश देवसटवार यांना जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे दिनांक ३०-०५-२००७, दिनांक १६-०६-२००७ व दिनांक ११-०७-२००७ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे सूचित करुनही श्री. अविनाश देवसटवार यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही व तसेच या संदर्भातील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील दिनांक १८-०७-२००७ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी देखील ते उपस्थित राहिले नाहीत. दिनांक १८-०७-२००७ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात निर्णय झाला. यावरुन श्री. अविनाश देवसटवार यांना दि.१८-०७-२००७ रोजी

अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत त्यांनी मागणी केलेली माहिती द्यावयाची आहे हे नक्कीच माहिती होते. तथापि एवढे असूनही त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही. यानंतर श्री. अविनाश देवसटवार यांच्या जागी बदलीने नियुक्ती झालेले जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-१२-२००९ रोजी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. अपिलार्थीस सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता त्यामध्ये, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक एक च्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये नांदेड जिल्ह्यामध्ये सन २००५-०६ या काळात नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळात नव्याने नियुक्त केलेल्या व त्यापैकी ज्यांचे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केले नाहीत अशा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची यादी त्यांनी अपिलार्थीस पुरविली नसल्याचे दिसून येत आहे. मुद्दा क्रमांक १ ते ३ च्या संदर्भात आता ही माहिती सात दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासोर मान्य केले आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. अविनाश देवसटवार यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली कोणतीही माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अथवा त्यानंतर जन अपिलीय अधाकरी यांनी आदेशित करुनही, न पुरवून स्वतःला माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. श्री. अविनाश देवसटवार यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती देण्याचे टाळले असल्याचे वरील वस्तुस्थिती पाहता, या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत असल्याने त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे कमाल

एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस त्यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याचे त्यांना मान्य आहे असा निष्कर्ष काढून हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. अविनाश देवसटवार, सध्या प्राध्यापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण संस्था, पुणे) यांना या प्रकरणी एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिवराज बाबाराव धोंडे, अध्यक्ष, श्री. संत शिरोमणी मन्मथ स्वामी शिक्षण प्रसारक मंडळ, शेवडी (बा.), तालुका लोहा, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्री. अविनाश देवसटवार, प्राध्यापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण संस्था, क्वीन्स गार्डन, सर्कीट हाऊसजवळ, पुणे (तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, नांदेड) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

४ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय समाज कल्याण अधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९१

निर्णय दिनांक २३.१२.२००९

१ श्री. सोनटक्के शिवाजी त्र्यंबकराव, : अपिलार्थी

मु.पो. लोहारा, ता. उदगीर, जि. लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

सहायक निबंधक, सहकारी संस्था, उदगीर, जि. लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर

त्रयस्थ पक्ष : डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या., उदगीर, जि. लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.०९.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असतांना देखिल त्यांना जन माहिती अधिकाऱ्याने माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः सहायक निबंधक, सहकारी संस्था, उदगीर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक ०२.०६.२००८ रोजी त्रयस्थ पक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर समिश्र सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., उदगीर या संस्थेच्या संदर्भात एकूण २ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या संस्थेची स्थापना केव्हा झाली, त्यामध्ये कोणकोण चेअरमन होते, त्यांचा कालावधी व चेअरमन कायदेशीर किती दिवस होते व बेकायदेशीर किती दिवस होते? बेकायदेशीर असल्यास त्यांची चौकशी केली का? त्या काळात बेकायदेशीर व्यवहार केले का? केले असल्यास त्यांच्यावर आपण कार्यवाही केली का? केली नसल्यास का केली नाही ? व मुद्दा क्रमांक २ द्वारे संबंधित गृहनिर्माण संस्थेने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १२.०२.२००७ व १२.१२.२००७ रोजी दाखल केलेल्या कागदपत्राची व त्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाच्या कागदपत्राच्या प्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११.०६. २००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन या प्रकरणी अपिलार्थीस संबंधित संस्थेचे सचिव माहिती अधिकारी असल्यामुळे संस्थेच्या सचिवांकडून माहिती घेण्याचे सूचित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था लातूर यांच्याकडे केला. त्यांनी अपिलार्थीचा सदरचा अपील अर्ज सहायक निबंधकांकडे, या प्रकरणी ते जन अपिलीय अधिकारी असल्याने, दिनांक ०८.०८.२००८ रोजी पाठविला. सहायक निबंधकांनी अपिलार्थीचे सदर अपील, गृहनिर्माण संस्थेस शासकीय विभागाकडून कोणतेही अर्थसहाय्य मिळाले नसल्यामुळे माहिती अधिकार

अधिनियम हा कायदा संस्थेस लागू होत नसल्याचे अभिप्राय नोंदवून, अपिलार्थीचे अपील दिनांक २९.०८.२००८ रोजी निकाली काढले. सहायक निबंधकांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे व ही माहिती त्यांना आवश्यक असल्याचे आयोगास अवगत केले. त्रयस्थ पक्षाच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस उघड करण्यासाठी त्यांची कोणतीही हरकत नाही व ही माहिती ते अपिलार्थीस देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था, उदगीर यांच्याकडे माहितीची मागणी केली आहे. अपिलार्थीने ज्या गृहनिर्माण संस्थेविषयी सहायक निबंधकांकडे माहिती मागविली आहे, त्या गृहनिर्माण संस्थेवर सहायक निबंधकांचे प्रशासकीय स्वरुपाचे नियंत्रण आहे, तसेच या संस्थेकडील कागदपत्रे मागवून घेण्याचे अधिकार देखिल महाराष्ट्र सहाकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना आहेत. त्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांनी संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन, नंतर ती अपिलार्थीस देणे या प्रकरणी अभिप्रेत होते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भातील माहिती सरळ जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधित गृहनिर्माण संस्थेच्या संदर्भातील माहिती देण्यासंदर्भात

कोणताही सकारात्मक प्रतिसाद या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस दिला नाही, हे येथे प्रामुख्याने नमूद करण्यात येत आहे.

अपिलार्थीने सहायक निबंधकांकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ मध्ये अपिलार्थीस फक्त संस्थेच्या स्थापनेचे वर्ष, त्यावेळचे अध्यक्ष व त्यावेळेपासून ते दिनांक ०२.०६.२००८ पर्यंत नियुक्त केलेले संस्थेचे अध्यक्ष ही माहिती सहायक निबंधकांकडून देय होत आहे. या परिच्छेदातील उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलचे कारण अथवा त्यांचा अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागणे, अशाप्रकारची माहिती, ही माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्ती बाहेरची असल्यामुळे, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती सहायक निबंधकांच्या कार्यालयाशी सरळ संबंधित व ती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे त्रयस्थ पक्षाच्या सहमतीशिवायही त्यांना ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यासाठी कोणताही प्रत्यवाय नव्हता. तरीही त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने या संपूर्ण घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे, आयोगास आढळून येत नाही. सहायक निबंधक, सहकारी संस्था यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढताना माहिती अधिकार अधिनियम हा कायदा सहकारी गृह निर्माण संस्थांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. परंतु या ठिकाणी एक लक्षात घेतले पाहिजे ते असे की, अपिलार्थीने ही माहिती सहायक निबंधकांकडे मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सहायक निबंधकांच्या ताब्यात आहे, ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ व ९ च्या तरतुदीचा भंग होण्याची कोणतीही शक्यता दुरान्वयाने देखिल संभवत नसल्याने सहायक निबंधकास अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या मुद्दा

क्रमांक १ मधील संस्थेच्या स्थापनेच्या वर्षापासून ते दिनांक ०२.०६.२००८ पर्यंतच्या कालावधीतील संस्थेचे अध्यक्ष यांचा कालावधी व मुद्दा क्रमांक २ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार द्यावी लागेल. ही माहिती सहायक निबंधक, सहकारी संस्था, उदगीर यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. संबंधित गृहनिर्माण संस्थेला जरी माहिती अधिकार अधिनियम लागू होत नसला तरीही अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती ही संबंधित गृहनिर्माण संस्थेला मागितलेली नसून ती सहायक निबंधक यांच्याकडे म्हणजे ज्यांच्या प्रत्यक्ष ताब्यात ही माहिती उपलब्ध आहे, त्यांच्याकडे मागितली आहे. हा मुद्दा येथे विशेष प्रकर्षाने लक्षात घेणे गरजेचे आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी सरळ संबंधित असताना देखिल अपिलार्थीस माहिती नाकारण्याची जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. त्यांनी अपिलार्थीस देय असलेली माहिती देण्याचे या प्रकरणी टाळून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब सहकार आयुक्त यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांना तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, उदगीर यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सहकार आयुक्त यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, उदगीर यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सोनटक्के शिवाजी त्र्यंबकराव, मु.पो. लोहारा, ता. उदगीर, जि. लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, उदगीर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, बी.जे. रोड, पुणे - ४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९२

निर्णय दिनांक २३.१२.२००९

१ श्री. माळकुंजे रेवणसिध्द शंकरराव, : अपिलार्थी
लिंबोणी बाग, शिवाजीनगर, गणपती मंदीराजवळ, तांब्री
विभाग, उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उप सचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राचार्य/संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, उपकेंद्र उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : मानद संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट व चुकीची माहिती दिली असल्यामुळे त्यांच्या हरकतीसह त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उस्मानाबाद येथील विद्यापीठ उपकेंद्रातील सेक्यूरीटी संदर्भात काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती समाधानकारक नसल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०१.१०.२००८ रोजी संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र उस्मानाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जासोबतच्या निवेदनाद्वारे त्यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर आक्षेप नोंदविला. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांना आयोगास त्यांच्या कृतीबद्दलचा समर्थनिय खुलासा करता आला नाही. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१.१०.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर तात्काळ सुनावणी घेऊन अपिलार्थीचे म्हणणे लक्षात

घेऊन, यावर आपला निर्णय देणे उचित होईल, असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा मानद संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र उस्मानाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०१.१०.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाने समाधान न झाल्यास अपिलार्थी, अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ०१.१०.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. माळकुंजे रेवणसिध्द शंकरराव, लिंबोणी बाग, शिवाजीनगर, गणपती मंदीराजवळ,

तांत्री विभाग, उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मानद संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९८

निर्णय दिनांक २३.१२.२००९

१ श्री. रविंद्र पुरुषोत्तम वांगे, : अपिलार्थी
रा. उतार गल्ली, काद्राबाद, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक, भूमी अभिलेख, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.०९.२००८ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जालना यांच्याकडे, मौजे सामनगांव, तालुका जिल्हा जालना येथील सर्वे नबंर ११३ व ११४ चे शेत पुस्तक, पुरवणी शेत पुस्तक, मूळ टिपण या सर्वे नंबरचे पोट हिस्सा, मोजणी नकाशा या मुद्यांची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १७.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ ते ३ ची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात अपिलार्थीस काहीही कळविले नाही. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २०.१२.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, जालना यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७.०१.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. या प्रकरणी जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख यांनी निर्णय देऊनही तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जालना यांनी त्यांना अद्यापपावेतो कोणतीही माहिती पुरविलेली नाही. अपिलार्थीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्र पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे ४ मुद्यांवरील कागदपत्राच्या प्रती मागितल्या

असता, अपिलार्थीच्या मूळ अर्जास दिनांक १७.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ मधील सर्वे नबंर ११३ व ११४ चा मूळ पोट हिस्सा मोजणी नकाशे या मुद्यांवर कोणतेही भाष्य केलेले नाही. यावरुन त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण माहिती दिली असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली कागदपत्रे ही महत्त्वाची कागदपत्रे असल्याने आता ही कागदपत्रे नव्याने तयार करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागतील. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. तसेच संचालक तथा जमाबंदी आयुक्त, भूमी अभिलेख यांना असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचाऱ्यांवर होती, त्या कर्मचाऱ्यांविरुध्द त्यांनी संबंधित कागदपत्रे गहाळ केल्या प्रकरणी त्यांचेवर फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी. तसेच अपिलार्थीस अपूर्ण माहिती देऊन आणि तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाचे पालन न करुन स्पष्ट केलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल संबंधित तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जालना यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रविंद्र पुरुषोत्तम वांगे, रा. उतार गल्ली, कादराबाद,जालना, ता.जि.जालना-४३१ २०३

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख, नवीन प्रशासकीय इमारत, विधानभवनासमोर, साधुवासवाणी चौक, रेल्वेस्टेशनजवळ, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९७

निर्णय दिनांक २३.१२.२००९

१ श्री. शामराव सुंदरराव खरात, : अपिलार्थी
मु. पो. पाथरवाला (बु.), ता. अंबड, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपसंचालक, कृषी खाते संलग्न अधीक्षक
कृषी अधिकारी कार्यालय, जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषी उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.०७.२००९ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही व तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "अप-डाऊन करणाऱ्या, कार्यालयात उशीरा येणाऱ्या व बिना

अनुमती कार्यालयात गैरहजर राहणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द केलेली कारवाई" या विषयावर दिनांक ०१.०४.२००५ ते २०.०७.२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५.१२.२००८ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवाशी आपले आदेश पारित केले. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याचे त्यांनी कबूल केल्याने, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले व या निर्णयाची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि हे आदेश प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्याप कोणतीही माहिती उपलब्ध झाली नसल्याचे आयोगास अवगत केले. यावेळी अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचा जो कबूली जबाब दिला आहे, त्याची प्रत अपिलार्थीस दाखविली असता, अपिलार्थीने या कबूल जबाबावर त्यांची सही आहे, हे मान्य केले. परंतु त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही, हे आपले म्हणणे कायम ठेवले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिनांक २४.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे शीघ्र पोस्टाने पाठविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी आयोगासमोर आवश्यक तो पुरावा सादर केला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक

१९.०७.२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देता, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५.०८.२००८ रोजी प्रथम अपील केल्यानंतर अपिलार्थीस दिनांक २४.०९.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. तथापि ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. अपिलार्थीने त्यांना माहिती प्राप्त झाल्याचा कबूली जबाब जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी दिनांक १५.१२.२००८ रोजी दिला आहे. परंतु आता आपली भूमिका बदलून त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली कथित माहिती ही त्यांनी विस्कळीत स्वरुपात पुरविली असून, अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये जे मुद्दे उपस्थित केले आहेत, त्यांची मुद्देनिहाय माहिती अपिलार्थीस दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या प्रकरणी एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागविली आहे. तथापि मुद्दा क्रमांक ५ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे भविष्यकाळातील माहिती मागविली आहे, ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या दिनांक १९.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ४ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस मुद्देनिहाय, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १९.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस कृषी आयुक्त, पुणे यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ४ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त (कृषी), यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शामराव सुंदरराव खरात, मु. पो. पाथरवाला (बु.), ता. अंबड, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे-०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २७३/०९, २७४/०९ व २७६/०९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२७३,२७४ व २७६
निर्णय दिनांकः २४-१२-२००९

१. सौ. एस.पी. नैण, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

१. **अपील क्र.२७३/०९:**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>मॉडेल ऊर्दू प्राथमिक शाळा,नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | :प्रतिवादी |

२. **अपील क्र.२७४/०९:**

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>मौलाना आझाद ऊर्दू प्राथमिक<br>शाळा,मुदखेड, जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड |

३. **अपील क्र.२७६/०९:**

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>सय्यद फारुक पाशा ऊर्दू प्राथमिक<br>शाळा,नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०१.२००९ रोजी नोंदविलेली अपील क्र. २७३/०९, २७४/०९ व २७६/०९ ही तीन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मॉडेल ऊर्दू प्राथमिक शाळा, नांदेड, मुख्याध्यापक, मौलाना आझाद ऊर्दू प्राथमिक शाळा, मुदखेड, जि.नांदेड व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने उपरोक्त तीन अपील प्रकरणासंदर्भात आयोगास उद्देशून लिहिलेली त्यांची दि.२४.१२.२००९ रोजीची तीन स्वतंत्र पत्रे आयोगास सादर केली असून या पत्रांमध्ये, त्यांची विचाराधीन तीनही अपिले क्र. २७३/०९, २७४/०९ व २७६/०९ ही ते स्वखुषीने मागे घेत असल्याचे नमूद करुन त्यांची विचाराधीन अपिले रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेली उपरोक्त तीनही द्वितीय अपिले आता मागे घेतली असल्याने त्यांची उपरोक्त विनंती मान्य करण्यात येऊन अपील क्र. २७३/०९, २७४/०९ व २७६/०९ खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. २७३/०९, २७४/०९ व २७६/०९, दि.१३.०१.२००९ खारीज करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २४-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. एस.पी.नैण, द्वारा मुख्य कार्यालय, अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ,

शिवमंदिराच्या पाठीमागे,सहयोगनगर, नांदेड, ता.जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,मॉडेल ऊर्दू प्राथमिक शाळा, राज कॉर्नर रोड,नांदेड (अपील क्र. २७३/०९) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,मौलाना आझाद ऊर्दू प्राथमिक शाळा,पोलीस स्टेशनजवळ, मुदखेड, जि.नांदेड (अपील क्र. २७४/०९) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,सय्यद फारुक पाशा ऊर्दू प्राथमिक शाळा, उमर कॉलनी, देगलूर नाका,नांदेड (अपील क्र. २७६/०९) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २८०/०९ व २८१/०९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२८०,२८१
निर्णय दिनांक २४/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल<br>रा. जाफ्राबाद, जि. जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>जाफ्राबाद, जि. जालना | | |

**निर्णय**

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १८.०५.२००९ केलेली दि. १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०८.२००८ रोजीच्या दोन स्वतंत्र माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दोन स्वतंत्र प्रथम अपिले केली होती. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलांवर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेली व्दितीय अपिले आयोगाकडे दाखल केली आहेत.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपिलांची प्राथमिक तपासणी केली असता, ही अपिले अपिलार्थीने प्रथम अपिलांच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७१ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केली आहेत. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीची प्रस्तुतची अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील क्र. २८०/०९ व २८१/०९ फेटाळण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजार गल्ली, मेनरोड, जाफ्राबाद, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२८२
निर्णय दिनांक २४/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शंकर दिगंबरराव रणवीर<br>रा. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहसंचालक हिवताप व हत्तीरोग,<br>विश्रांतवाडी पोलिस स्टेशन समोर,<br>आळंदी रोड, पुणे-६ | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहसंचालक हिवताप व हत्तीरोग,<br>विश्रांतवाडी पोलिस स्टेशन समोर,<br>पुणे-६ | | |

**निर्णय**

श्री. शंकर दिगंबरराव रणवीर यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दि. १६.०८.२००९ रोजी केलेले दि. १७.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०७.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०६.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री.  शंकर दिगंबरराव रणवीर, व्दारा- श्री. डी.के. नरवाडे (लिपीक), कृषि विद्यालय, पावडेवाडी नाक्याजवळ, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२९४
निर्णय दिनांक २४/१२/२००९

१ श्री. पुंडलिकराव चिंगळाबा काजे : अपिलार्थी
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

१ व्यवस्थापक, : प्रतिवादी
आदर्श महिला नागरी सहकारी बँक मर्यादित,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०५.२००९ रोजी नोंदविलेले व दि.०१.१०.२००९ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक ०५.०२.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे व्यवस्थापक, आदर्श महिला नागरी सहकारी बँक मर्यादित, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर अर्जास संबंधित बँकेच्या सरव्यवस्थापकांनी त्यांच्या दि. १४.०२.२००९ रोजीच्या पत्राव्दारे, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या दि. ०६.०१.२००६ रोजीच्या पत्रानुसार नागरी बँका या माहितीचा कायदा २००५ अंतर्गत येत नसल्यामुळे आरबीआयच्या मार्गदर्शक तत्वानुसार माहिती देता येणार नसल्याचे अपिलार्थीस कळविले. या प्रतिसादाने समाधान न झ ाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०४.०३.२००९ रोजी जन

अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर दि. ०१.०४.२००९ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील मान्य करुन, अपिलार्थीस सात दिवसाच्या आत निःशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्याचे सरव्यवस्थापक, आदर्श महिला नागरी सहकारी बँक मर्यादित, औरंगाबाद यांना आदेशित केले. परंतु यानंतरही माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित बँकेचे कर्मचारी व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद हे उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच सर्व उपस्थितांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे.

अशाप्रकारे मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित बँकेस लागू होत नसल्याने, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांचे दि. ०१.०४.२००९ रोजीचे आदेश अधिक्रमित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २९४ /०९ फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पुंडलिकराव चिंगळाबा काजे, रंजनवन हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. ६४, एन-९, हडको, औरंगाबाद.

२. व्यवस्थापक, आदर्श महिला नागरी सहकारी बँक मर्यादित, मुख्य कार्यालय, ३१, शिवज्योती कॉलनी, एन-६, सिडको, औरंगाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२९५
निर्णय दिनांक २४/१२/२००९

१ व्यवस्थापक, : अपिलार्थी
आदर्श महिला नागरी सहकारी बँक लि., सिडको,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३.०६.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी श्री. पुंडलिक चिंगळाबा काजे यांनी दिनांक ०५.०२.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे व्यवस्थापक, आदर्श महिला नागरी सहकारी बँक मर्यादित, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर बँकेच्या सरव्यवस्थापकांनी त्यांच्या दि. १४.०२.२००९ च्या पत्राव्दारे माहिती अधिकार अधिनियम त्यांच्या बँकेस लागू होत नसल्याचे कळविले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने श्री. काजे यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०४.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन दि. ०१.०४.२००९ रोजी आपले आदेश पारित केले. याव्दारे त्यांनी श्री. काजे यांचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना नि:शुल्क सात दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याचे सरव्यवस्थापक,

आदर्श महिला नागरी सहकारी बँक मर्यादित, औरंगाबाद यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द व्यवस्थापक, आदर्श महिला नागरी सहकारी बँक मर्यादित, औरंगाबाद यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच सर्व उपस्थितांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे.

या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर सरव्यवस्थापक, आदर्श महिला नागरी सहकारी बँक मर्यादित, औरंगाबाद यांनी या प्रकरणी घेतलेली भूमिका योग्य आहे. त्यामुळे त्यांना मूळ अर्जदार श्री. काजे यांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार माहिती देणे बंधनकारक असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र. २९५/०९ मान्य करण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांचे दि. ०१.०४.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पुंडलिकराव चिंगळाबा काजे, रंजनवन हौसिंग सोसायटी, प्लॉट क्र. ६४, एन-९, हडको, औरंगाबाद.

२. सरव्यवस्थापक, आदर्श महिला नागरी सहकारी बँक मर्यादित, मुख्य कार्यालय, ३१, शिवज्योती कॉलनी, एन-६, सिडको, औरंगाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२९६
निर्णय दिनांक २४/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मो. मोईज खान पठाण<br>रा. नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी,<br>फैजुल उलुम हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज,<br>गोकुळ नगर, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. मो. मोईज खान पठाण यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २१.०३.२००९ रोजी केलेले दि.३१.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०२.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २२.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ८९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मो. मोईज खान पठाण, व्दारा- राम संगनवार, “ओम निवास”, कैलास नगर, नांदेड ४३१ ६०५.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२७५

निर्णय दिनांक २४-१२-२००९

१ सौ. एस. पी. नैण, : अपिलार्थी
व्दारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व
विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे,
सहयोगनगर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक,
निजामुल उलूम उर्दू प्राथमिक शाळा, खुसरोनगर, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे दिनांक ०१-०८-२००८ रोजी माहितीची मागणी केली असता विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक ११-०९-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या

प्रथम अपील अर्जाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबित ठेवल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मुख्याध्यापक, निजामुल उलूम उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित काही माहिती मागितली होती. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी आणि जन माहिती अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या प्रतिनिधीने आपल्या मूळ माहितीची मागणी त्यांच्या युक्तिवादामध्ये कायम ठेऊन त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे माहितीसाठीचा मूळ अर्ज सादर केल्याचा पुरावा आयोगास दाखविला. यावरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज प्रथमतः दाखल केला होता हे सिध्द होत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतली नसल्याचे आयोगासमोर कबूल केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ११-०९-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे इष्ट राहील, असे आयोगास वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-०९-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ११-०९-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस. पी. नैण, व्दारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, निजामुल उलूम उर्दू प्राथमिक शाळा, खुसरोनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२७७

निर्णय दिनांक २४-१२-२००९

१ सौ. एस. पी. नैण, : अपिलार्थी
व्दारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व
विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे,
सहयोगनगर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, ईकरा उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मुख्याध्यापक, ईकरा उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज प्राप्त पाठवून दिला असता विहित मुदतीत मुख्याध्यापकाने कोणतीही माहिती न दिल्याने त्यांनी दिनांक १६-०९-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. परंतु जन अपिलीय

अधिकारी यांनी कोणताही निर्णय न देऊन त्यांचे प्रथम अपील प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेत कायमस्वरुपी कार्यरत असलेले एकूण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या आस्थापनाविषयक बाबींची शाळा स्थापन झाल्यापासून ते ३० जून २००८ पर्यंतच्या कालावधीशी संबंधित अशी व्यापक व्याप्ती असलेली माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यासाठी एक महिन्याची मुदत मागवून घेतली. परंतु अपिलार्थीने हे पत्र स्वीकारण्यास नकार दिला आणि अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः दिनांक १०-११-२००८ रोजी माहिती देऊ केली असता अपिलार्थीने ही माहिती घेण्याचे नाकारले. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक १२-११-२००८ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पुरविली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस माहिती पुरविल्याचा योग्य तो

पुरावा आयोगास सादर केला आहे. अपिलार्थीस पाठविण्यात आलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली असून ती सर्वसाधारणपणे अपिलार्थीच्या मागणीशी सुसंगत असल्याचे सकृतदर्शनी आयोगास आढळून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिका-याने दिनांक १२-११-२००८ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे. तथापि या मुद्दयावर अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांचे कोणतेही भाष्य केलेले नाही. अपिलार्थीची आजच्या सुनावणीच्या वेळेची अनुपस्थिती पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अनुमान काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस. पी. नैण, व्दारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ईकरा उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड-हैद्राबाद रोड, सुशिल पेट्रोल पंपाजवळ  नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२७८

निर्णय दिनांक २४-१२-२००९

१ सौ. एस. पी. नैण, : अपिलार्थी
व्दारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व
विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे,
सहयोगनगर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, एकता उर्दू प्राथमिक शाळा, अर्धापूर,
तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार मुख्याध्यापक, एकता उर्दू प्राथमिक शाळा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांच्याकडे त्यांच्या शाळेविषयी काही माहिती दिनांक ०१-०८-२००८

रोजी मागितली असता विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक ११-०९-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जो पोस्टामार्फत जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०९-०८-२००८ रोजी प्राप्त झाला, त्याअन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेत कार्यरत असलेल्या एकूण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची आस्थापनाविषयक शाळा स्थापन झाल्यापासून ते ३१ जुलै २००८ पर्यंतच्या कालावधीतील विस्तृत प्रमाणात काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अपील अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५०० इतके डी. डी. व्दारे संस्थेकडे पाठविण्याचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेतल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज दिनांक ०९-०८-२००८ रोजी त्यांना प्राप्त झाल्यानंतर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक ०८-०९-२००८ रोजी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीस कळविले होते. परंतु या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न केल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी त्यांना १५ दिवसांचा कालावधी पुरेसा होईल, असे त्यांनी आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जरी मुख्याध्यापकाने अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५०० कळविले असले तरीही सदर शुल्क कळवितांना त्यांनी या शुल्काचा तपशील, जो त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे अपिलार्थीस देणे आवश्यक आहे, तो दिलेला नाही. म्हणून तपशीलाअभावी माहिती अधिका-याचे दिनांक ०८-०९-२००८ रोजीचे पत्र अवैध होत आहे. त्यामुळे आता ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, एकता उर्दू प्राथमिक शाळा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय

अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस. पी. नैण, व्दारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, एकता उर्दू प्राथमिक शाळा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२७९

निर्णय दिनांक २४-१२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सौ. एस. पी. नैण,<br>व्दारा अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ,<br>शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, राजर्षी शाहू प्राथमिक शाळा, मुदखेड,<br>तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार मुख्याध्यापक, राजर्षी शाहू प्राथमिक शाळा, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड यांच्याकडे पोस्टाने अर्ज पाठवून दिला असता विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक १८-०९-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. तथापि या

अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेतील कायमस्वरुपी कार्यरत असलेल्या एकूण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या संदर्भात शाळा स्थापन झाल्यापासून ते ३० जून २००८ पर्यंतच्या कालावधीतील व्यापक स्वरुपाची काही माहिती मागितली होती.

तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक १८-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी , जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी मुख्याध्यापक, राजर्षी शाहू प्राथमिक शाळा, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांची शाळा ही कायमस्वरुपी विनाअनुदानित असल्यामुळे आणि त्यांच्या शाळेस राज्य शासनाचे कोणतेही प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे वित्तीय सहाय्य मिळत नसल्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ हा लागू होत नाही. तसेच या प्रकरणी अपिलार्थीचा दिनांक ०८-०७-२००८ रोजीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे मूळात प्राप्तच झाला नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचा कोणताही प्रश्न उद्‌भवत नाही. त्यांच्या या

विधानाच्यापृष्ठ्यर्थ त्यांनी आवश्यक ती कागदपत्रे आयोगास सादर केली आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांच्याकडील कायमस्वरुपी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या संदर्भात माहिती मागितली होती. तथापि त्यांच्या शाळेमध्ये कायमस्वरुपी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-याची नेमणूक केलेली नाही. त्यांच्या शाळेत एकूण दोन शिक्षकांची नेमणूक केली असून त्या नेमणुका ठोक मानधन या तत्वावर केलेल्या आहेत त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी घेतांना यासंदर्भात यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय, वनडोंगरी, नागपूर विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर याचिका क्रमांक ५१३२/२००८ या याचिकेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या दिनांक २०-०८-२००९ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन करणे आयोगास गरजेचे आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येवर, प्राधिकरणावर "नियंत्रण" व "वित्तीय सहाय्य" या मुद्दयावर सविस्तर भाष्य केले असून माहिती अधिकार अधिनियम २००५ हा, शासनाकडून अनुदान प्राप्त होत नसलेल्या संस्थांना लागू होत नसल्याचा अंतिमतः निर्णय दिलेला आहे. या प्रकरणी मूळात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज संबंधित संस्थेस प्राप्त झालेला नाही, याही उपर अपिलार्थीने ज्या संस्थेकडे माहिती मागितली आहे ती संस्था कायमस्वरुपी विना अनुदानित असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले आहे व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा

परिषद, नांदेड कार्यालयाच्या प्रतिनिधीने जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादास दुजोरा दिला आहे, हे पाहता, या संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी सध्या लागू होणार नाहीत. अशा प्रकारे अपिलार्थीने ज्या संस्थेकडे माहिती मागितली आहे ती संस्था अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या संज्ञेच्या व्याप्तीबाहेरची असल्याचे सिध्द होत असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस. पी. नैण, व्दारा अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राजर्षी शाहू प्राथमिक शाळा, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २६८/२००९, २६९/२००९ व २७०/२००९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२६८,२६९ व २७०

निर्णय दिनांक २४.१२.२००९

१ सौ. एस.पी.नैण, रा. नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

**१ अपील क्रमांक २६८/२००९**

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, फैजुल उलुम उर्दू प्राथमिक शाळा,
नांदेड

**२ अपील क्रमांक २६९/२००९**

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, सर सय्यद अहेमद उर्दू प्राथमिक
शाळा, नांदेड

**३ अपील क्रमांक २७०/२००९**

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, हजरत उमर फारुख उर्दू प्राथमिक
शाळा, नांदेड

**४ अपील क्रमांक २६८, २६९ व २७०/२००९**

जन अपिलीय अधिकारी तथा

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,

नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०१.२००९ रोजी नोंदविलेली तीन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या तीनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित मुख्याध्यापकांकडे अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे माहितीचा अर्ज पाठवून दिला असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुदतीच्या आत माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक १६.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. तथापि त्यांनी या संदर्भात कोणतीही सुनावणी न घेता निर्णय प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या तीनही विचाराधीन अपील प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०८.०७.२००८ रोजीच्या तीन स्वतंत्र अर्जांद्वारे संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकाकडे एक सारखी व प्रचंड व्याप्ती असलेली माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १५.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे तीन स्वतंत्र प्रथम अपिले केली. तथापि या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, मुख्याध्यापक, फैजुल उलुम उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड व जन अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी तीनही शाळांच्या मुख्याध्यापकांकडे अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे माहिती मागविली असता, त्यांना माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि त्यांनीही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत. त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. मुख्याध्यापकांकडे अर्ज केल्यासंदर्भात अपिलार्थीकडे काही पुरावा उपलब्ध आहे का, असे विचारले असता, अपिलार्थीने या तीनही मुख्याध्यापकांकडे अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे अर्ज पाठविल्याच्या पुराव्याची छायांकित प्रत आयोगासमोर सादर केली आहे. तसेच अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जाची जी झेरॉक्स प्रत त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेली आहे त्यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्या कार्यालयाच्या संबंधित लिपिकाची पोचसही उपलब्ध आहे. यावरुन अपिलार्थीच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज व अपील अर्ज सर्व संबंधितांना प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, फैजुल उलुम उर्दू प्राथमिक शाळा यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांना मूळात प्राप्त झाला नाही, त्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपले

आदेश पारित करणे, आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड तथा जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५.०९.२००८ रोजीच्या तीनही प्रथम अपील अर्जांवर हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशांनी समाधान न झाल्यास अपिलार्थी, माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची विचाराधीन तीनही अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २६८/२००९, २६९/२००९ व २७०/२००९ निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त तीनही प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १५.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस.पी.नैण, द्वारा मुख्य कार्यालय, अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, फैजुल उलुम उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सर सय्यद अहेमद उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, हजरत उमर फारुख उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २७१/२००९ व २७२/२००९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२७१ व २७२

निर्णय दिनांक २४.१२.२००९

१ सौ. एस.पी.नैण, रा. नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, खुरेशिया उर्दू प्राथमिक शाळा,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०१.२००९ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले क्रमांक २७१/२००९ व २७२/२००९ ही आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, खुरेशिया उर्दू प्राथमिक शाळा यांच्याकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज सादर केला असता, त्यांना विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०६.०९.२००८ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील सादर केले आहे.

तथापि त्यांनी या प्रकरणी सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये एकाच शाळेची एकच माहिती दोन वेगवेगळ्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती खुरेशिया उर्दू प्राथमिक शाळा या शाळेसंदर्भात असून, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी हा शाळेच्या स्थापनेपासून ते अपिलार्थीने अर्ज करेपर्यंतच्या दिनांकापर्यंतचा असा आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे, अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०६.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित व जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी मुख्याध्यापक, खुरेशिया उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड यांच्याकडे दिनांक ३०.०६.२००८ रोजी माहितीचा अर्ज पाठविला आहे. या संदर्भात मूळ अर्ज पाठविल्याचा पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीचा अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे. तसेच अपिलार्थीच्या दिनांक ०६.०९. २००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर देखिल शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्या कार्यालयाची पोचसही देखिल

उपलब्ध आहे. यावरुन अपिलार्थीचा अपील अर्ज शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झाल्याचे आयोगास आढळून येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेणे या टप्प्यावर आयोगास गरजेचे वाटते. सबब शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६.०९.२००८ रोजीच्या अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय द्यावा.

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने एकाच माहितीकरिता एकाच दिवशी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दोन प्रथम अर्ज व अपिलीय अधिकारी यांच्याकडे दोन प्रथम अपील अर्ज केले आहेत. त्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलांपैकी अपील क्रमांक २७२/२००९ हे खारीज करण्यात येत आहे, जन अपिलीय अधिकारी यांना वरील दिलेले आदेश हे फक्त अपील क्रमांक २७१/२००९ च्या संदर्भात आहेत, याची नोंद घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अपिलार्थीच्या दिनांक ०६.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर पारित केलेल्या निर्णयाने जर अपिलार्थीचे समाधान झाले नाही तर ते, माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती अयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील क्रमांक २७१/२००९ निकाली काढण्यात येत आहे व अपील क्रमांक २७२/२००९ हे खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २७१/२००९ निकाली काढण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक २७२/२००९ खारीज करण्यात येत आहे.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०६.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस.पी.नैण, द्वारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, खुरेशिया उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.